श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ११ अंक ] १२-१३ माघ-फाल्गुन [ श. १८५६

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... | १-९ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... | १०-१२ |
| चतुर्थावतार दत्तगुरु कालाग्निशमन ... ... ... | |
| श्रीसाई दत्तजन्म कीर्तनाख्यान ... ... ... | १३-६४ |


# विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V.P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

५१ E, पाली रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान**

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं कै. म्हाळसापति अंक वेगळा प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. किंमत ३ आणे. तरी जिज्ञासूंनीं त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

— प्रकाशक

# अनुभव

## ( १ )

सोलापूर ता. ६–३–३५

रा. रा. संपादक श्रीसाईलीला यांसी

सा. न. वि. वि.

आपल्या श्रीसाईलीलेंत श्रीबाबांचे अनुभव आपणांकडे पाठवीत आहें, सवडीप्रमाणें छापण्याची कृपा व्हावी. आपणास कांहीं मजकूर कमी रणें असेल तर करावा; पण महत्त्वाचा गाळूं नये; कळावें लोभ असावा विज्ञापना.

आपला

**श्रीधर गणेश भांडारे,**

हेडक्लार्क, जाम मील, सोलापूर

मी ता. १३–१–३५ रोजीं एकाएकीं आजारी झालों व दुसऱ्या वशीं संधिवातानें सांधे सुजले व दम्यानें छाती, व पाठ पाण्यानें भरून ली. शिवाय मला मधुमेहाचा रोग, व त्यामध्यें ताप भरला. लगेच दा. वैशं-यन व. दा. पीतांबरे या उभयतांनीं मला वाडिया दवाखान्या-ध्यें नेण्याचें ठरविलें. पण आज पलंगावर न निजवितां खालीं निज-वें म्हणून मला सर्वांनीं धरून खालीं उतरवीत असतांना समोर माउली साईमहाराजांची तजबीर हातांनीं काढलेली आहे व त्यावर माझी जर गेली. त्या साईमाउलीकडे पाहतांक्षणीं मला एकदम रडें कोसळलें. तें तकें कीं, मोठमोठयानें हंबरडा फोडून श्रीमाउलीस मीं प्रार्थना केली कीं, कदिलानें मी २० वर्षे आपली सेवा करींत असतांना माझ्यावर असा प्रसंग

यावा ! मर्जी तुमची ! अशी करुणा भाकून मनास थोडें शांत करून बिछान्यावर निजलों. उशाकडे कुटुंब व पायाकडे गडी व बाजूस इतर मंडळी अशी बसली होती. अजमासें सकाळी १०।११ चा सुमार होता. मला बिछान्यावर निजतांक्षणीं झोंप लागली व त्यामध्यें खालीलप्रमाणें देखावा दिसला. काळे कपडे घातलेला एक मनुष्य आला व म्हणाला, "चलो, तुमको बाबांनी बोलाविलें आहे." मी "बरें, चल" असें म्हणून त्याच्यामागून चालूं लागलों. त्यानें खूप डोंगराच्या पायऱ्या चढून वर नेलें. तेथें माथ्यावर साईबाबा पूर्वेकडे तोंड करून उभे. त्यांच्यामागें शिपाई व त्यांच्यामागें मी. तोंच बाबांनी हातांनीं मला परत जा म्हणून खूण केली. त्याबरोबर मी निघालों तो पुन्हा मला हाक मारली. मागें पाहतों तों त्या शिपायास रागावले कीं, मीं दुसऱ्यास बोलाविलें असतांना यांस कां घेऊन आला? असें म्हणून मशिदीमधील कोनाड्यामध्यें गुप्त झाले व लगेच त्या कोनाड्यावरील फुलांचे हार बाजूस करून तोंड बाहेर काढून एक डबी जोरांत माझ्या अंगावर फेकली ती माझ्या छातीमध्यें गडप झाली.जा ! म्हणून सांगतांक्षणीं जो हसत पळत सुटतों, तो खालीं आलों. व फार मोठ्यानें हसूं लागलों. त्यामुळें सर्व मंडळी घाबरून गेली कीं वात झाला काय? पण दोन मिनिटांमध्यें जागा होऊन सर्व हकीकत सांगितली. नंतर श्रीमाउलीची उदी लाऊन दवाखान्यामध्यें नेलें. तो ८ दिवसांत बरा होऊन घरीं आलों. उत्तम बरा होऊन कामावर जाऊं लागलों. कळावें, लोभ असावा, गलतीची माफी असावी.

श्री. ग. भांडारे

# अनुभव

## ( २ )

श्री विठ्ठलराव[1] कल्याणपूर कांहीं दिवसांमागें भेटावयास आले होते त्यांनीं सांगितलेला अनुभव. श्री कल्याणपूरकर हे अनेक वर्षें ताडदेव जवळच्या चिकलवाडीत राहत आहेत. सुमारें १७।१८ वर्षांमागें त्यांच्या खोली शेजारीं एक परभू जातीचे तरुण गृहस्थ डॉक्टरच्या परिक्षेचा अभ्यास करीत होते. शेजार या नात्यानें दोन्ही तरुणांत परस्पर दृढ स्नेह उत्पन्न झाला होता.

हे परभू गृहस्थ अत्यंत परिश्रम घेऊन अभ्यास करीत होते. परिक्षेंत उत्तीर्ण झाल्यास कांहीं विशेष सेवारूपि संकल्प ( नवस ) त्यांनीं श्रीसाई-बाबांच्या चरणापाशीं आपल्या मनांत केला, पण तो त्यांनीं विठ्ठलरावांना अतिपरिचयाचे स्नेही असूनही कळविला नव्हता.

पुढें परिक्षेच्या तयारींत गढून गेल्यामुळें वरील नवसाची त्यांना आठवणही राहिली नाहीं. परिक्षेच्या पहाटेस त्यांना स्वप्न पडलें कीं, एक वयोवृद्ध फकीर त्यांच्याकडे आला व त्यांना म्हणाला,

" अरे, तूं डॉक्टर ना !"

" मी अजून परिक्षा पसार झालों नाहीं. "

" पण तुला दवा देणें करणें कळतें ना ? तर बघ बघ माझ्या पोटांत लई दुखतें. मी बेजार झालों आहें. कांहीं तरी त्यासाठीं मला

---

१ श्री विठ्ठलराव मुंबईत अनेक सद्‌गृहस्थांच्या परिचयाचे आहेत. त्यांची संगीतरूपि पारायण करण्याची शैली अप्रतिम व मोहक आहे. आवाज गोड, भजनाकडे स्वाभाविक ओढ, व संगीत आणि सौजन्याची जोड, यामुळें त्यांचें पारायण ऐकणारा तन्मय होऊन जातो. हे स्वतः कर्नाटकचे असूनही मराठी भाषेवर त्यांचा इतका ताबा आहे कीं ते महाराष्ट्रीय नसावे असें ऐकणाराला कधींही भासत नाहीं.

त्यांनीं अनेक कथानकें स्वतः रचलीं आहेत. —संपादक

285

आत्तांच्या आत्तां दवा दे. देतोस कीं नाहीं ? नाहीं तर मी दुसऱ्या डॉक्टराकडे जातों. ''

" जरा थांबा मी दवा आणतों. '' असें म्हणून कळवळ्यानें घरांत धांवलों. आणि कांहीं औषध घेऊन बाहेर येतों तों फकीर नाहींसा झालेला.

त्यानें अशी भयंकर उतावीळ केली होती,–आणि अशा प्रकारचें विव्हळणें मांडलें होतें कीं, हे श्रीसाईबाबा असतील असें त्या वेळीं वाटलें नाहीं. परंतु ते नाहींसे झाल्यावर हे साईबाबाच खास होते, असें वाटलें. जागे होऊन व ह्या स्वप्नातला सर्व प्रकार काय असावा म्हणून माझ्या खोलींत धांव घेऊन आणि मला जागें करून त्या गृहस्थानें तें स्वप्न मला सांगितलें. त्या स्वप्नाचा विचार करून मी त्यांना विचारलें, " श्रीसाईबाबांना परिक्षेसंबंधानें कांहीं नवस तुम्हीं केला आहे !''

"होय ! परंतु तुम्हीं आतां आठवण देईपर्यंत तो साफ विसरलों होतों.''

" मला असें वाटतें, या स्वप्नद्वारें श्रीसाईबाबांनीं तुम्हाला असें सुचविलें आहे कीं, सर्व प्रकारच्या पोटांतल्या विकारांचा तपास करून त्यांवर काय इलाज व औषधाची योजना करावी याचा अभ्यास अवलोकनांत घेऊन त्या विषयाकडे खास ध्यान ठेवावें. आणि आजच्या पेपरमध्यें या संबंधानें जरूर प्रश्न येणार. सबब इकडे तिकडे मन चलित न ठेवतां याच विषयाकडे खास लक्ष द्यावें. त्याप्रमाणें त्या सद्गृहस्थांनीं त्याच विषयाचें अध्ययन करून ते परिक्षेस बसले. आश्चर्याची गोष्ट ही कीं, याच संबंधानें त्या दिवसाच्या कागदांत पृच्छा येऊन ते माझे स्नेही त्या परिक्षेंत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले.

ही श्रीसाईबाबांची लीला मी १७।१८ वर्षांमागें अनुभवली आणि अद्यापिही अनेक प्रकारांनीं अनुभवित आहें.

खार, ता. १४ फेब्रुवारी १९३५ संपादक

# अनुभव

## ( १ )

आज ता. १० फेब्रुवारी १९३५ च्या दिवशीं पार्ल्याचे एक श्रीसाईभक्त भेटावयास आले होते. त्यांनीं सांगितलेला त्यांचा अलीकडे घडलेला एक अनुभव.

ह्या गृहस्थांनीं आपलें नांव प्रसिद्ध करूं नये म्हणून आग्रह केला आहे आणि ती त्यांची विनंती यथासांग आहे, हें पुढील हकीगत वाचल्यावर वाचकवृंद मान्य करतील.

गेल्या विजयादशमीच्या पहाटेस त्यांना स्वप्न पडलें:—

स्वप्नाची हकीगत सांगण्यापूर्वी त्या संबंधाची पूर्वपिठिका अशी घडलेली होती:—

सध्यांच्या परिस्थितीप्रमाणें त्यांच्याही कचेरींत कापकूप व कारकून वगैरे कमी करणें हा प्रकार चाललेला होता. आपली नोकरी एकतीस वर्षांची येत्या जानेवारी ( म्हणजे जानेवारी १९३५ ) अखेर व्हावयाची असल्यामुळें आणि आपल्या वयाची पंचावन्न वर्षें पुरीं झाल्यामुळें आपणांस नोकरीमुक्त व्हावयाची सूचना मिळवयाचीच; असें समजून व त्याप्रकारची सूचना पदरांत पडण्यापूर्वींच आपण होऊन राजीनामा देणें युक्त वाटून आणि हाताखालचे तसेंच उपरीवर्ग तसें जाणूनबुजून न करण्याची सल्ला देत असतांही त्यांनीं विजयादशमीपूर्वीं अनेक महिने त्याप्रमाणें राजीनामा लिहून पाठविला होता; व त्यासंबंधीं निश्चित मनानें होते.

विजयादशमीच्या पहाटेस त्यांना स्वप्न पडलें कीं, त्यांच्या अमेरिकन मुख्य कचेरीचे प्रमुख म्यानेजिंग डायरेक्टर जे पूर्वींच रिटायर्ड होऊन सध्या केवळ हौसेनें त्या कचेरीचे कामकाज पाहत असतात, ते त्यांच्या भेटीस पार्लें मुक्कामीं आले.

हे मोठे साहेब एकाएकीं घरीं आल्यामुळें लगबगीनें उठून आपण आपल्या बिछान्याची वळकटी केली. साहेब चटईवरच बसले, आणि खिशांतून काडयांची पेटी काढून तीन दमडीचें घासलेटचें टिन जवळ होतें, तें त्या साहेबानें पेटवून त्याच्या मिणमिण जळणाऱ्या उजेडांत खिशांतले कागद काढून वाचूं लागले.

हे साहेब पूर्वी इकडील मुंबईच्या कचेरींत वर्क म्यानेजरच्या हुद्यावर होते. माझ्यावर त्यांचा लोभ होता. पुढें त्यांचा हुद्दा वाढत जाऊन ते मुंबईच्या कचेरींत उपरी झाले. नंतर अमेरिकेंत मुख्य कचेरीचे ते एक डायरेक्टर होऊन पुढें म्यानेजिंग डायरेक्टर या सर्व श्रेष्ठ हुद्यावर त्यांची बढती होऊन नंतर रिटायर्ड होऊन, केवळ स्नेहबुद्धीनें कांहींही लवाजम न घेतां ते कामकाज पाहतात व सल्ला मसलत देत असतात.

म्हणून असा मोठा माणूस आंपल्यासारख्या यःकश्चित मनुष्याच्या घरीं अचानक येतो काय ! चटईवर बसून त्या मिणमिण जळणाऱ्या तीन दमडीच्या घासलेटाच्या दबड्याच्या उजेडांत कागदपत्र वाचतो काय ! याचें राहून राहून मला आश्चर्य व दुःखही वाटलें.

साहेब कागद वाचीत असतां आपण पाठविलेल्या राजीनाम्याचें काय झालें म्हणून हिंय्याकरून त्यांना विचारतां " तूर्त विचारांत घेतां येत नाहीं." असें बोलून ते साहेब व तो सर्व देखावा नाहींसा झाला.

खडबडून जागा झालों. " बाबासाहेब ! कुठला साहेब आणि कुठलें काय ! तो पलीकडच्या खोलींतला मोठा साहेब ( देव्हाऱ्यांतील श्रीसाईबाबा ) येऊन त्यानें हा सर्व खेळ दाखविला नि दुसरें काय !" असें गहिंवर येऊन ते सेवकाला बोलले !

खार, ता. १० फेब्रुवारी १९३५

संपादक

# अनुभव

## ( ४ )

श्री. लक्ष्मण विठ्ठल नाडकर, माहीम बाजार, मुंबई ता. १ ली जानेवारी १९३५ च्या दिवशीं श्रीसाईलीलेची वर्गणी देण्यासाठीं आले होते. त्यांच्या-बरोबर श्री. गोविंदराव अमृत मुळे हे होते. श्री. नाडकरानीं त्यांच्या एका स्नेह्याच्या व स्वतःचा असे दोन अनुभव सांगितले ते असेः—

**स्नेह्यांचा अनुभवः**-त्यांचे स्नेही एक उद्यमशील गृहस्थ आहेत. आपला उद्योग आणि आपलें घर याखेरीज त्यांना दुसरा कांहीं व्यवसाय नाहीं. हे स्नेही श्रीसाईबाबांचे उपासक आहेत. एके वेळीं त्यांनीं रुपये पांचची एक नोट श्रीसाईबाबांच्या प्रीत्यर्थ पाठविली. ती होती १० रुपयांची. तेव्हां ही नोट कांहींतरी सूचक हेतूनें आली असावी असें वाटून त्यांतले पांच रुपये जमेस होऊन बाकीचे पांच रुपये आपल्या देव्हाऱ्यांत जपून पूजेच्या साहित्यांत ठेवा अशी त्यांना सूचना झाली होती आणि त्याप्रमाणें ते पांच रुपये त्यांनीं जपून देव्हाऱ्यांत ठेवलें होते. त्या वेळीं त्यांची सांप-त्तिक स्थिती बरी होती.

पुढें कांहीं अकल्पित प्रकारामुळें त्यांची स्थिती खालावत गेली. ती इतकीं कीं, एके दिवशीं त्यांना बाहेरगांवाहून मालाची मागणी आली असतां आणि त्या व्यापारांत त्यांना प्राप्ति असूनही आगगाडी भाडें रु. ४ अकरा आणे भरण्याला त्यांच्याजवळ पैसे नव्हते. जीव व्याकूळ झाला. पैसे भरण्याची वेळा भरत आली. आतां काय करावें " बाबा ! हे तुमच्या पूजेंतले रुपये दुःखित मनानें घ्यावे लागत आहेत, काय करूं !" असें म्हणून ते पांच रुपये हातांत घेऊन खोलीतून बाहेर पडतात, तों हे अमृतराव मुळे माझ्या स्नेह्याला अचानक दारांत भेटले. " अहो, हे तुमचे दहा रुपये मी कांहीं महिन्यांपूर्वीं उसने घेतले होते आपले ते परत घ्या पाहूं. इतके दिवस परत करूं शकलों नाहीं, क्षमा असावी. " असें ते म्हणाले.

काय श्रीसाईमाउलीची ही लीला तरी ! माझ्या स्नेह्यानें ते पांच रुपये देव्हाऱ्यांत परत ठेऊन, आगगाडीचे माल भाडें रुपये ४॥≈ भरले आणि "बाबा ! आज ऐन वेळेवर अब्रू बचवलीस !" असें बोलून ते घरीं परत आले.

## स्वतःचा अनुभव

श्री. लक्ष्मण विठ्ठल नाडकर मुलांलेंकरांसहित श्रीसाईबाबांच्या दर्शनास सन १९१५ सालीं गेले होते. श्रीच्या सेवेंत आनंद वाटला. इतका खर्च करून व दगदग सोसून श्रीचरणांपाशी आल्याचें सार्थक झालें असें वाटून इकडून हालूं नये असेंही वाटलें.

याप्रमाणें आम्ही सर्व आनंदांत असतां एके दिवशीं सकाळीं आम्हाला परत जाण्याची आज्ञा झाली. परत जाण्याची आज्ञा न मागतां झालेली. आणि शिर्डीस श्रीचरणांजवळ राहण्याची उत्कंठा यामुळें वाईट वाटलें.

माध्यान्हीच्या आरतीच्या वेळीं आम्ही सर्व हजर होतों. बाबा त्या वेळीं कांहीं बोलले नाहींत. दोन प्रहरीं तीन वाजतां दर्शनाच्या वेळीं पण कांहीं बोलले नाहींत. त्यानंतर सायंकाळपूर्वीं बाबा फिरावयास निघतात, त्या वेळीं पायां पडतांना "अरे तूं अजून राहिला आहेस? तुला सकाळींच जा म्हणून सांगितलें होतें ना ? जा आताच्या आतां; जा तुला गाडी मिळेल."

संध्याकाळचा सुमार ! पावसाळीचे दिवस ! नदीला नांव ! बाबांचा हुकूम ! आतां कसें ? बाबांचा हुकूम मोडवेना. एक टांगा कर्मधर्मसंयोगानें मिळाला. त्यांत बसून दुःखित मनानें आम्ही शिर्डी सोडली. जेमतेम करून नदीकिनारा गांठला. अंधार पडावयास लागलेला. नांव पैलतीरावर. हांका मारून नांव इकडे आणा म्हणून पुकार करतां, नावाडी "सांज पडली, नांव चालविण्याचा हुकूम नाहीं" म्हणून बोलले. घोर विवंचनेंत पडलों. बाबांचा धांवा केला. इतक्यांत थोडया वेळानें एक टांगा आला, त्यांत कोपरगांवचे मामलतदारसाहेब होते. त्यांनीं आम्हाला धीर दिला. साहे-

त्यांच्या शिपायानें पुकार करतांच नावाड्यांनी नाव आमच्या तीरावर आणली; आम्ही सर्व मंडळी पैलतीरावर गेलों.

एक तर अंधार पडलेला, नावेसाठीं पाऊण तासाचा आणखी विलंब. टांगेवाल्यानें व इतर मंडळीनें आतां गाडी चुकलीच. तुम्हीं आज रात्रीं पुरते देवळांत मुक्काम करा, व सकाळीं जा अशी सल्ला दिली. गांव परकें, अनोळखीचें, बरोबर स्त्री व मुलें, मुली.. अंगावर थोडेंतरी खिडुकमिडुक. विवंचना सुरू झाली. बेचैन झालों. परंतु बाबांचें आश्वासन "स्टेशनवर जा ! तुला गाडी आहे." या शब्दांवर पूर्ण भरंवसा ठेवून तसाच टांगा स्टेशनकडे हांकला. रस्त्यांत अंधार गुडुप, व चोरांचीं भीति. पण बाबांच्या शब्दांवर विश्वास ठेवून तो तीन मैलांचा भयंकर रस्ता कापून एकदांचें कोपरगांवचें आगगाडीचें स्टेशन गांठलें. सामान उतरलें. पुढें काय करावयाचें याचा विचार करतां, स्टेशनवर बरीचशी उतारू मंडळी दिसली. धीर आला, मास्तराकडे तपास करतां त्यांनीं आश्वासन दिलें कीं गाडी दोन तास लेट आहे, आतां येईल. त्यांनीं टिकिटें दिलीं. गाडी थोड्यावेळानें आली. अत्यंत आश्चर्य करीत सर्व मंडळी सप्रेम भावनेनें शिर्डीकडे तोंडें करून, श्रीसाईबाबांच्या नांवाचा जयघोष करीत गाडींत बसलों. एका तासानें मनमाड गांठलें. तेथें यथेच्छ फराळ करून मध्यरात्रीं नंतर एक वाजतां मेलगाडी गांठून आम्ही सर्व मंडळी सकाळ उजाडतांच मुंबईस पोंहचलों. काय ही बाबांची लीला ![1]

---

१ अशा प्रकारें ध्यानीं-मनीं स्वप्नीं ही गाडी नसतां श्रीसाईबाबांच्या आश्वासना-प्रमाणें गाडी मिळाल्याचे दोन दाखले लेखकाच्या खास परिचयाच्या मंडळीचे आहेत. ते पुष्कळांना ठाऊक आहेत. परंतु श्री. नाडकर यांच्यासारखे इतरांचे अनुभव आल्यास ते आधीं प्रसिद्ध करून तदनंतर आपल्या परिचयांतले अनुभव प्रसिद्ध करणें हें उचित होय असें वाटल्यावरून ज्या इतरांस असे अनुभव आले असतील त्यांनीं कृपा करून ते लिहून पाठविल्यास वाचकवृंदांवर उपकार होतील.

खार, ता. २ जानेवारी १९३५ —संपादक

श्रीसाईबाबा

# फेब्रुवारी १९३५ चें शिर्डीवृत्त

फेब्रुवारी महिन्यांत शिर्डी येथें श्रीसाईबाबा-समाधि दर्शनाकरितां, मुंबई, पुणें, अहमदनगर, सातारा, सिंगवी, नाशिक, व पंढरपूर, ह्या ठिकाणाहून ३७ संतप्रेमी बांधव व श्रीसाईभक्त आले होते. कांहीं भक्तांनीं श्रीस अभिषेक व नैवेद्य केले. एका भक्तानें अर्धोदयपर्व या दिवशीं श्रीद्वारकामाई–मशिदींत सकाळीं तुपाचीं निरांजनें व रात्रीं तेलाच्या पंत्या लाविल्या.

## २ देणगी जिन्नस वगैरे आल्या त्या

१ रा. रा. विठ्ठल बा. कुंभकर्ण, अहमदनगर–१ श्रीस शुभ्रकांठी उपरणे.

२ रा. रा. नीलकंठ नारायण क्षीरसागर, पुणे २–रु. ७५ सभा मंडपाकरितां.

३ रा. रा. दत्तात्रय दा. रासने, पुणें–१ श्रीस वायलचा गुलाबी गलेफ.

४ रा. रा. सुरेंद्र आ. तर्खड, पुणें–१ श्रीस आस्मानी रंगाचा मखमली पांढरी फीत लावलेला गलेफ.

५ रा. रा. व्ही. जी. भोलगीर, पुणे–रु. ३ कायमनिधीस.

३ दासगणूमहाराज यांचे एक शिष्य रा. रा. किसनराव आबाजी पार्थीकर यांची संस्थानच्या जागेवर तात्पुरती नेमणूक झाली होती व त्याप्रमाणें ते कामावर ता. ८।१२।३४ ला रुजू झाले, हें डीसेंबर १९३४ च्या शिर्डीवृत्तांत प्रसिद्ध झालें होतें. ते ता.१-२-३५ पासून कामावर हजर नसून गांवीं गेले आहेत.अद्याप परत आले नाहींत.

## ३ सभामंडप

सभामंडपाच्या पायाचे काम सुरू करण्याकरितां संस्थानचे ऑ. चिटणीस रा. रा. सुंदरराव दि. नवलकर हे शिर्डी येथें मुंबईहून ता. ११।२।३५ ला गेले व ता. १६।२।३५ रोजीं परत आले. सभामंडपाच्या पायाचे काम वगैरे शिर्डी येथील पब्लिक वर्क्सचे इरिगेशनचे कॉन्ट्रॅक्टर रा. रा. एस. पी. गोरे, B. E. यांना दिलें आहे. पाया खोदून तयार झाला आहे. चुना मळण्याच्या कामासही सुरवात झाली असून तो भरण्याचे काम आतां सुरू होईल. लोखंडी खांब व त्रिम्स याचें काम मुंबईतील रा. रा. के. ल. आधारकर यांच्या धी व्हलकन इंजीनिअरिंग वर्क्स, भायखळा, यांजकडे दिलें आहे. पायाचें काम व जोते व लोखंडी खांब व बीम्स श्रीरामनवमी उत्सवापूर्वी तयार होईल.

५ रा. रा. दामोदर सावळाराम रासने, अहमदनगर, एक श्रीचे जुने साईभक्त व शिष्य यांनीं सभामंडपाच्या कामास निधि जमवून देतों म्हणून त्याप्रमाणें रा. रा. नि ना. क्षीरसागर, पुणें, यांजकडून रु. ७१ पाठविले.

६ रा. रा. दत्तात्रय दा. रासने व संस्थानचे गवयांचे चिरंजीव जगन्नाथ किसनराव पार्थीकर हे साईपुढें गायनाची हजेरी देत होते व रा. रा. जगन्नाथ किसनराव पार्थीकर रोज श्रीपुढें दोनप्रहरीं श्रीसाईसच्चरिताचा अध्याय वगैरे वाचीत होते.

७ शिर्डी येथें ग्रामपंचायतीनें श्रीसाईबाबांच्या उत्सवाच्या दिवसांत रथ ज्या रस्त्यानें निघतो तो रस्ता करण्याचें काम प्रथम करण्याचें हातांत घेतलें आहे. त्यामुळें पावसाळ्यांत गुरुपौर्णिमेच्या उत्सावांत केव्हां केव्हां पावसामुळें रथ काढण्यास अडचण पडत होती, ती आतां दूर होईल.त्या कामाबद्दल सर्व श्रेय कोपर गांवचे मामलतदार रा. रा. फडके व शिर्डीच्या गांवपंच यांस दिलें पाहिजे.

## ८ सॅनिटेरियम

शिर्डी येथें सॅनिटेरियमच्या दोन खोल्यांचा पक्क्या इमारतीस दीड हजारपर्यंत खर्च येतो. कच्च्या इमारती बांधल्यास खर्च कमी येईल, परंतु थोडया जास्त खर्चाकरितां कच्च्या इमारती बांधणे श्रेयस्कर होणार नाहीं. जोंपर्यंत दीड हजार रुपयेपर्यंत रक्कम देणारा श्रीसाईभक्त मिळेल, तोंपर्यंत सॅनिटेरियमचें काम सुरू करण्याचें हातांत घेतां येणार नाहीं.

९ मुंबईचे डॉ. धीनाथ सीतानाथ अजिंक्य, ॲसोसिएट प्रोफेसर सुंदरदास कॉलेज यांनीं सॅनिटरियमकरितां त्यांच्या कै. भगिनीच्या नांवें विहीर बांधण्याकरितां श्रीसाईबाबांस रु. २५० पर्यंत अर्पण करण्याचें आश्वासन दिलें आहे.

## १० श्रीसमाधिमंदिर व श्रीद्वारकामाई–मशीदमधील पेट्यांतील जमा

दोन्ही पेटया मिळून माघ महिन्यांत जमा. रु. ९३–१३–१. श्रीमंदिर-पेटींत रु. ८५–१२–९ व श्रीद्वारकामाई पेटींत रु. ८–०–६ रकमा आल्या. ता. ४–२–३५.


११ श्रीसाईसच्चरिताच्या ८० प्रती बांधून तयार झाल्या आहेत. ज्या भक्तांस प्रत पाहिजे असेल त्यांनीं खालील पत्त्यावर रु. ३–८–० भरून प्रत घेऊन जावी.

१२ शिर्डी येथें हवापाणी उत्तम आहे. ह.भ.प. दासगणू महाराज पंढरपुरात आहेत ते बार्शी लातुर मार्गानें नांदेडास लवकरच जाणार आहेत.

साईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.
ता. ४ मार्च १९३५

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डीसंस्थानकमिटी

२८१




टिप.

 = हंडी (नक्षत्र हीच हंडी)


 = दीप. (नक्षत्र तेज हाच दिवा)

 = झुंबर (तीन ताऱ्यांच्या तीन देवता
म्हणजेच दत्त रूप व
दत्तरूप हेच तीन शामदानाचे झुंबर)

ॐ

तारकापुंजात्मक वेदरूपीं गोश्वानयुक्त, रोहिणी, मृग,
आर्द्रा, नक्षत्रपुंज देवता ( ब्रह्मा, विष्णु, महेश ) स्वरूपीं
अत्यंत तेजस्वी, मनोवेधक, चित्ताकर्षक, नयनसुभग, वैभवशाली,
अपूर्व, अश्रुत, अदृष्ट

## आकाशस्थ त्रिमुखी दत्तगुरुमूर्ति




टिप.

= हंडी (नक्षत्र हीच हंडी)

= दीप.(नक्षत्र तेज हाच दिवा)

 = औंबर (तीन ताऱ्यांच्या तीन देवता
म्हणजेच दत्त रुप व
दत्तरुप हेच तीन शामदानाचे औंबर )

श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योन्नमः

# श्रीदत्तजन्म कीर्तनाख्यान

श्रीयुत श्रीसाईलीला संपादक महाशय यांस सप्रेम कृ. शि. सा. न. वि. वि.

श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट्ट अन्या ऊर्फ बुवासाहेब मोने शिरवळकर यांचें टक चरित्र आपल्या श्रीसाईलीलेच्या चालू वर्षाच्या २–३–४ या जोड कांत प्रसिद्ध झालें आहे. अन्या समाधिस्थ झाल्यास ६३ वर्षे झालीं. ांचा फोटो किंवा हातानें काढलेली त्यांची तसबीर कोठें तरी उपलब्ध होईल णून २—३ वर्षे मी सतत श्रम करीत होतों. परंतु व्यर्थ. शेवटीं शिरवळ ांतील व माझ्या घरांतील ज्या मंडळींनीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें होतें व त्यांच्या डोळ्यांसमोर अजूनही दिसत आहेत, अशा मंडळीकडून अन्यांच्या ायष्टीची, चेहऱ्याची, बैठकीची, रंगारूपाची जी विश्वसनीय माहिती ळाली, त्यावरून त्यांचा फोटो तयार करावा असें मनांत आलें. विविध संत- दापैकीं कोणत्या तरी संतविभूतींत अन्यांचें सादृश्य थोडया तरी प्रमाणांत मिळेल, अशा समजूतीनें शें दीडशें फोटो जमा केले. परंतु फुकट. आपल्याच हाय्यानें श्रीक्षेत्र शिर्डी येथील बाबांच्या भक्तांपैकीं थोडें साम्य दिसत असलेल्या कांहीं भक्तांचे फोटो घेतले. परंतु अस्सल वैराग्यशील, पूर्ण ज्ञानी ंतास साधारण कोटींतील अज्ञानी यःकश्चित भक्तांचा पेहराव चढवून यांना अन्या म्हणणें ही कल्पना माझ्या व आपल्या मनास मुळींच पटेना. त्या- ंतर माझ्या घरीं श्रीपरमहंस भास्करानंद सरस्वतींचा फोटो आहे, त्यांत व म्ही वर्णन देतां यांत बरेंच साम्य असावें; करितां तो फोटो तुम्ही पाहा से म्हणून आपण मला प्रेमाग्रहपूर्वक सांताक्रूझहून खार येथें आपल्या घरीं त्री ८-९ वाजतां नेऊन अडगळीच्या सामानांत पडलेला फोटो महाप्रया- सानें शोधून काढून मला दाखविला. तो मला कांहीं अंशीं पटला. त्यांत कांहीं फेरफार करून त्याचा ब्लॉक तयार करवून घेऊन हल्लीं हयात अस लेले ७९–८० वर्षे वयाचे अन्यांच्या शेजारीं राहणारे, अन्या निवर्तले तेव्हा ७ वर्षांचे असणारे, विनोदानें अन्यांच्या हातच्या डोक्यावर टापऱ्या खाणारे

सद्गृहस्थ अप्पाजी गोविंद ऊर्फ आपासाहेब देशपांडे यांना अन्यांच्या ब्लॉकचा लहान फोटो इतर फोटोंत मिसळून दाखविला. त्यांनीं बाकीचे फोटो बाजूस ठेवून भास्करानंदांच्या फोटोंत कांहीं साम्य आहे असें मला सांगून त्यांत कांहीं फेरफार सुचविले, त्याप्रमाणें श्री वागळे फोटोग्राफर यांच्या खोलींत आपल्या समक्ष वागळयांना ते फेरफार सांगितले. विस्तृत फोटो ( Enlarged ) तयार झाल्यावर तो व दुसरे दोन विस्तृत फोटो घेऊन मी दत्तजयंतीकरितां शिरवळास ता. १३-१२-३४ रोजीं गेलों व तो फोटो त्याच दिवशीं आपासाहेब देशपांडे यांना दाखविला. त्यांनीं पसंत करून फोटोंत दिसणाऱ्या अन्यांच्या चेहऱ्याच्या, आजानुबाहु हातांच्या, योगासन घातलेल्या बैठकीच्या व दोन्ही बाजूंच्या मोजतां येण्यासारख्या स्पष्ट दिसणाऱ्या बरगड्यांच्या व डोळ्यासमोर दिसणाऱ्या अन्यांच्या प्रत्यक्ष मूर्तीच्या विलक्षण साम्यतेची व अचानक साधलेल्या हुबेहुब पणाची फारच तारीफ केली व अत्यंत आश्चर्य प्रकट करून ते त्या फोटोकडे कांहीं काळपर्यंत पाहतच बसले व आपण केलेल्या श्रमांचें चीज झालें असें ते म्हणाले.

नंतर आम्ही बाबांचा, शिरवळदत्तप्रभूंचा व अन्यांचा असे तीन मोठे ( Enlarged ) विस्तृत सारख्या लांबीरुंदीचे फोटो मंदिरांतील गाभाऱ्याच्या दर्शनी भिंतीच्या दोन बाजूंच्या दोन गजांच्या मोठ्या खिडक्या व त्यांच्या मधील गजांचाच सुशोभित दरवाजा यांच्यावर आलेल्या तक्तपोशीच्या भागाखालीं ( under the gallery part ) अनुक्रमानें बसविले.

ता. १९-१२-३५ पासून उत्सवाकरितां मंडळी येऊं लागली; त्यांत भोरजवळील विंगगांवचे श्रीयुत गंगाधर वामन ऊर्फ बाबा जोशी आचार्य, वय ७९-८० वर्षांचें, ज्यांच्या घरीं अन्या नेहमी जावयाचे व ज्यांचें वय अन्यांच्या मरणसमयीं १६-१७ वर्षांचें होतें. ते आपल्या चिरंजीव व पुतण्यासह शिरवळास उत्सवाकरतां आले होते. त्यांची नजर सहज अन्यांच्या फोटोकडे गेली आणि 'अरे, हा मोरूमामाचा (बाबा जोशी अन्यांना मोरूमामा म्हणून म्हणत) फोटो

येथें कसा व कोठून आला?' म्हणून ते एकदम आश्चर्यचकित व विस्मयापन्न झाले व मला येऊन विचारूं लागले कीं, हा मोरूमामांचा फोटो तुम्हांस कोठें मिळाला? मीं म्हटलें, 'अहो, हा तुम्ही व इतर मंडळींनीं दिलेल्या माहितीवरून मीं मुंबईहून तयार करून आणला.' ते म्हणाले, तुम्हीं अगदीं कमाल केलीत! अहो, यांत व मोरूमामांत इतकें आश्चर्यकारक साम्य व हुबेहुबपणा आहे कीं, आजच्या उत्सवांत प्रत्यक्ष मोरुमामा हजर आहेत व ते आपल्या देवखोलींत त्यांच्या नेहमीच्यापद्धतीप्रमाणें योगासन घालून जप करीत बसले आहेत असेंच मला वाटतें. काय हो हा अपूर्व व कपिलाषष्ठीचा योग! मोरूमामाच्या वेळीं या उत्सवांत श्रीदत्तमूर्तीची पूजा करण्याचें काम आमच्याकडे होतें. पुढें कांहीं कारणांनीं ती पूजा आमच्याकडून होईना। म्हणून मोरूमामाच्या बंधूचें चिरंजीव श्री. पांडुरंगभटजी ती करूं लागले व हल्ली पांडुरंग भटजींचे चिरंजीव दत्तात्रय उर्फ बगोबा मोने ती करतात; पण तो हक्क आमचा आहे व तो हक्क आतां (फोटो आल्यामुळें) आम्ही बजावणार असें बाबा जोशी उद्गारले. त्यांच्या उद्गारण्यास व तशी प्रत्यक्ष कृति होण्यास एकच गांठ पडली. चमत्कार असा कीं बाबा जोशांच्या कनिष्ठ बंधूच्या (श्रीयुत दिगंबरराव ऊर्फ भाऊसाहेब पेन्शनर पोलिस प्रॉसिक्यूटर चिरंजीवांची) आय. सी. एस्.ची परीक्षा गेल्या सालीं पास झाली. परीक्षा पास झाली म्हणजे आपण येथें दरसाल एक प्रयोजन घालीत जाऊं असा भाऊसाहेबांचा संकल्प. परंतु गुदस्तां तो योग न येतां यंदा फोटो आल्याबरोबर मोरुमामा फार वर्षांनीं उत्सवांत दिसले व आता ते कायमचेच येथें राहणार या उदात्त भावनेनें म्हणा, अगर इतर दुसऱ्या कोणत्याही इच्छेनें म्हणा, पण भाऊसाहेबांनीं या वर्षी उत्सवांतील एका दिवशी श्रीसाईदत्तप्रभुमूर्तीची स्वतः महान्यास व लघुरुद्रपूर्वक षोडशोपचारे पूजा करून दणदणीत व सुंदर प्रयोजन घातलें व पुढेंही दरवर्षीं अशीच पूजा करण्याचें व प्रयोजन घालण्याचें आश्वासन दिलें. संतांच्या हुबेहुब फोटोंत किती तरी जोर व चित्ताकर्षक शक्ति असते! अन्यांच्या फोटोनें कित्ये-

कांच्या अंतःकरणांत कर्तव्य विस्मृतीची जागृती, नवीन कर्तव्यबुद्धीची प्रेरणा उद्दीपित करून ज्यांनीं अन्यांना मुळींच पाहिले नाहींत, पण सत्पुरुष या नात्यानें ज्यांच्या अंतःकरणांत त्यांच्यासंबंधानें एक प्रकारची पूज्यबुद्धि वास करीत होती, अशा गांवांतील व परगावांतील शेंकडों स्त्रीपुरुषांच्या मनांतील अन्यांबद्दलचे कुतूहलपूर्ण धन्योद्गार बाहेर पाडिले.

याच उत्सवाकरतां सालाबादप्रमाणें या वर्षीं भोरचे सधन सावकार व सद्गृहस्थ कोंडोपंत आण्णा धवडगांव आले होते. यांनीं ते फोटो पाहून एका गृहस्थास प्रश्न केला कीं, "कां हो हा नारायणभट्टांचा फोटो का?" ते म्हणाले नाहीं;तो देव मामलतदारांनीं अन्यांचा फोटो तयार करून आणिला आहे ते म्हणाले, मीं अन्यांना पाहिलें नाहीं; पण नारायणभट्टांना चांगले पाहिले आहेत व नारायणभट्टांचा तोंडावळा हुबेहुब अन्यांच्या तोंडावळ्या सारखाच होता. ते अन्यासारखेच उंच, काळे किडकिडीत होते. नंतर कोंडापंतअण्णांनीं मलाही हीच गोष्ट सांगितली व म्हणाले कीं, एके दिवशीं ते रस्त्यानें जात असतां त्यांना एक अनोळखी गृहस्थानें सहज विचारलें कीं, कां हो, आपण कुशाबानानांचे चिरंजीव का? त्यांनीं म्हटलें होय. पण तुम्ही मला हें कशावरून विचारलेंत असें अण्णांनीं त्या गृहस्थांना विचारलें, तेव्हां ते म्हणाले, 'अहो तुमच्या तोंडवळ्यावरून. तुमचा चेहरा अगदीं हुबेहुब कुशाबा नानांच्या चेहऱ्यासारखा दिसतो. यावरून अन्यांचा फोटो किती हुबेहुब निघाला आहे याची कल्पना करतां येईल.

उत्सव संपल्यानंतर सुमारें १५-२० दिवसांनीं भोर संस्थानचे युवराज सरकार श्रीमंत भाऊसाहेब श्रीदत्तदर्शनाकरतां शिरवळास आले, व नवीन लावलेल्या फोटोकडे पाहतां पाहतां या फोटोकडे पाहून मला विचारलें कीं, हा फोटो कोणाचा? मीं सांगितलें, हें मंदीर ज्या संतविभूतींच्या स्मरणार्थ बांधलें आहे त्या श्रीमोरभट्ट अन्या मोन्यांचा. हा तुम्हास कसा मिळाला म्हणून त्यांनीं पुन्हा प्रश्न केला. मिळालेल्या उपलब्ध माहितीवरून तयार करवून आणिला म्हणून मीं सांगितलें. फोटो फारच सुंदर साधला आहे म्हणून त्यांनीं त्याची तारीफ केली. नंतर युवराजसाहेब श्रीदत्तमूर्तीच्या

विस्तृत फोटोकडे वळले, व 'कां हो, मी जो ह्या दत्तमूर्तीचा काढलेला लहान फोटो तुम्हास दिला होता, त्यावरून हा विस्तृत (enlarged) केला आहे काय ?' असें त्यांनीं मला विचारलें. मीं म्हटलें होय, त्यावर श्रीमंत म्हणाले, 'अहो, माझ्या फोटोपेक्षां हा विस्तृत फोटो कितीतरी सुबक व सुंदर साधला आहे.' असें म्हणून त्यांनीं त्याची फार राखाणणी केली. मुळापेक्षां हा विस्तृत फोटो फारच छान वठला आहे असे जे आपण उद्गार काढले होते, त्याची सत्यता पटली. असो. यावरून अन्यांचा फोटो व दत्तगुरुमूर्तीचा विस्तृत फोटो, हे किती हुबेहुब साधले आहेत याची कल्पना आपल्यास येईल.

ही पहिली महत्त्वाची गोष्ट झाली.

आतां दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या सातारच्या कनिष्ठ भगिनी कै. श्रीमती सुंदराताई किराणे यांनीं शिरवळास तिगस्त सालीं कांहीं महिने मुक्काम केला असल्या वेळीं ता. १५–१२–३२ उजेडता गुरुवार रोजीं पहाटें त्यांच्या स्वप्नांत अशाच बैठकीची, उंच, सडपातळ किडकिडीत, काळ्या रंगाची, सरळ नाकाची, मंदिराच्या गाभाऱ्यावरील पुढें आलेल्या तबकडीच्या भागाखालीं अधांतरी ध्यानस्थ हल्लींच्या आसनासारखें आसन घालून बसलेली त्यांनीं पाहिली. आपण तेथून पडाल, आपण खाली जमीनीवर बसा, अशी त्यांनीं त्या मूर्तीची प्रार्थना करतांच, **माझी नेहमी बसण्याची हीच जागा आहे.** मी येथून खाली पडणार नाहीं, कोणतेंही शस्त्र माझी खांडोळी करूं शकणार नाहीं, पाणी मला बुडवूं शकणार नाहीं, व अग्नि मला जाळूं शकणार नाहीं, तुम्ही घाबरूं नका, **मी येथेंच बसणार,** असें त्या मूर्तीनी सुंदराताईस सांगितलें. नांव विचारतां माझें नांव आनंदराशि आहे. असें सांगितलें. ज्या अधान्तरी जागेवर सुंदराताईनीं ही मूर्ति बसलेली पाहिली, त्याच जागेवर हल्लीचा अन्यांचा फोटो सहजासहजीं व अचानक बसला आहे. हा तरी विलक्षण योग व चमत्कार नव्हे का ! कांहीं दिवसांनीं विवस्त्र परमहंस भास्करानंद

२१३

विग्रहांत सवस्त्र संसारी पण पूर्ण वैराग्यशील आनंदराशि मी याच ठिकाणं येऊन बसणार आहें अशी अगाऊ सूचना अन्यांनीं दृष्टांतरूपानें देऊन तिची सत्यता अन्यांच्या या फोटोनें प्रत्यक्ष पटविली नाहीं का ?

आतां तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण मला जो भास्करानंदाच फोटो दाखविलात त्यांत त्यांची पार्श्वभूमिका( Back Ground ) काय होतं याकडे त्या वेळीं आपलें किंवा माझें मुळींच लक्ष गेलें नव्हतें. परंतु श्री. वागळे यांनीं जेव्हां सर्व सुचविलेल्या फेरफारांसह अन्यांचा फोटो विस्तृत तयार केलेला मीं आपल्यासमक्ष त्यांच्या आलेख्यशाळेंत पाहिला, तेव्हां त्यांतील पार्श्वभूमिकेकडे माझें सहज लक्ष गेलें व या पार्श्वभूमिकेत शिरवळच्य दत्तमंदिरांतील अर्धगोलाकृति घुमटाचा भाग अचानक कसा उमटल याचें राहून राहून मला आश्चर्य वाटलें व खरोखरच बाबांच्या अगाध लीलेचें कौतुक वाटलें ! कारण वर्णनावरून तयार केलेल्या फोटोला पार्श्वभूमिक कसली तरी कल्पनेनेंच काढावयाची तर ती कोठली तरी निघेल. पण य ठिकाणीं ती शिरवळमंदिरातील घुमटाचीच हुबेहुब कां निघावी ! नंतर न्हाहाळून पाहतां भास्करानंद कोठल्या तरी मंदिरात बसले असतांना ह त्यांचा फोटो घेतला आहे असें दिसलें. पण मंदिरांचीं शिखरें व घुमट नानाप्रकारचे व नाना आकाराचे असतात. मग भास्करानंदस्थित मंदिराच घुमट व शिरवळदत्तमंदिराचा घुमट यांच्यांत तंतोतंत साम्य येऊन तीच पार्श्वभूमिका अन्यांचे फोटोस मिळाली कशी ?

हा काकतालीय न्याय का ! व हा जर काकतालीय न्याय असेल, तर वरील सर्व वर्णित गोष्टींतही काकतालीय न्यायच म्हणावा लागेल. खात्रीनें हा न्याय काकतालीय नव्हे. निसंशय यांत श्रीसाइदत्त प्रभु बाबाची अतर्क्य व कल्पनातीत जादू भरलेली आहे !

इलोंच्या पार्श्वभूमिकेमुळें अन्यांना जणूं हलीं नवीन बांधलेल्या शिर-वळ दत्तमंदिरांत बसवून त्यांचा प्रत्यक्ष फोटो घेतला आहे कीं काय, असें भासतें. ही साईमाउलीची अगम्य करणी नव्हे तर काय !!!

असो. श्रीयुत वागळे फोटोग्राफर यांचा मीं या कामीं फारफार आभारी आहें. तथापि याचें श्रेय मुख्यत: आपल्याकडेच आहे.केवळ माझ्या मनीषेचे लाड पुरविण्याकरतां हा कपिलाषष्ठीचा योग जुळवून आणण्यांत आपल्यास अत्यंत मेहनत, श्रम व कष्ट पडले व साईलीलेचा २–३–४ हा जोडअंक काढण्यास विलंब लागला. त्यामुळें साईसद्भक्तांचा ठपका आपल्यास खावा लागला. पण याचा आपल्यास योग्य मोबदला मिळून,आपल्या प्रयत्नाचें चीज झालें; हें लिहिण्यास मला अत्यंत आनंद वाटतो " नहि कल्याण कृत्कश्चित् दुर्गतिंतात गच्छति " या श्रीमद्भगवद्गीतेंतील परमात्मवचनाप्रमाणें कोणतेंही सत्कृत्य ( फोटोरूपि संतसेवा ) केव्हांही फुकट जात नाहीं. शेवटीं "क्लेश: फलेनहि पुनर्नवतां विधत्ते" या पुराण गीर्वाण कविश्रेष्ठ कालिदासोक्तीप्रमाणें क्लेशाचें फल मिळालें म्हणजे पुन्हा तसेच नवीन श्रम करण्यास अधिक बळ येतें. त्याप्रमाणें आपल्यासही येवो अशी त्या साईदत्तमाउलीच्या पवित्र चरणीं नम्र प्रार्थना करून आपली रजा घेतों.

ठाणें, मिति माघ शु. ५ गुरुवार
शके १८५६. ता. ७–२–३५

आपला नम्र सेवक
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

२९५

श्रीदत्तचित्साइसद्गुरुभ्योनमः

# प्रस्तावना

परमात्मनिर्मित विश्वांत प्रत्येक जीवाची, जन्मापासून मरेपर्यंत, आत्यंतिक व अक्षय सुखाकरतां रात्रंदिवस धडपड चालू आहे. तें सुख, कोणी अलौकिक विद्यार्जनांत, कोणी प्रचंड द्रव्यार्जनांत, कोणी लोकोत्तर मल्लगिरींत, कोणी सौंदर्य व गुणसंपन्न कामिनीविलासांत, कोणी कुग्राम-निवासांत, कोणी नगरोपनगरांश्रयांत, कोणी निर्जन व गर्द तपोवनांतील शिवालयांत किंवा मठांत, कोणी पुण्यतटिनीतीरावर उभारलेल्या तृणकुटींत वा पर्णशाळेंत, कोणी गिरिगुहाविवरांत वा पर्वतदरीकंदरांत वा सह्य-विंध्य-हिमाचलादि नगाधिराज शिखरांवर मिळेल अशा समजुतीनें देशोधडी रानोमाळ भटकत हिंडत फिरत असतात. परंतु त्या त्या विषय किंवा वस्तु किंवा स्थानप्राप्तींत, त्या सुखाचा अभाव दिसून आल्यामुळें, त्यांना शेवटीं या सुखाकरितां, निर्गुण, निराकार, निरामय, निरंजन परमात्माचे प्रत्यक्ष सगुणावतार संतरत्न सद्गुरुरायांच्या दिव्य, पुण्य व पवित्र चरणकमलीं "सर्वधर्मान् परित्यज माझेकं शरणं व्रज" या श्रीमद्भगवद्गीतेंतील श्रीकृष्ण परमात्मो परमात्मोक्तीप्रमाणें त्यांनीं शरण जाऊन, त्यांच्यावर नितांत श्रद्धा ठेवून, त्यांची धैर्यानें शांततेनें, चिकाटीने व दमानें, अंतःकरणपूर्वक अनन्य भक्तिभावानें सतत सेवा करून त्यांची अनर्घ्य कृपा संपादन करून त्या सुखाचा लाभ करून घ्यावा लागतो, हें निश्चित.

ह्या सद्गुरुमणिमालिकेपैकींच श्रीदत्तप्रभु हे आद्य सद्गुरु चूडामणि आहेत, हें सर्वश्रुत आहे. सद्गुरुसेवा करण्याची जीं निरनिराळीं अनेक अंगें आहेत, त्यांपैकींच कीर्तन हें एक अंग आहे.

शिरडीचे श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा, शिरवळचे श्री मोरभट्ट अन्या मोने, अक्कलकोटचे श्रीस्वामीमहाराज, केडगांवचे श्रीनारायणमहाराज,

गरुडेश्वरचे श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंभेमहाराज, आदिकरून ह्या सर्व एकमुखी दत्तावतार संतविभूति होत.

श्रीटेंभेस्वामीकृत श्रीदत्तात्रयषोडशावतारजयंतिकल्पनामक संस्कृत पुस्तकांत दत्ताच्या सोळा अवतारांचें वर्णन देऊन त्या त्या अवताराच्या जयंतीचा महिना, वार, तिथि, नक्षत्र, प्रहर, काल देऊन जयंतीकालीं प्रसाद म्हणून जो पदार्थ वांटावयाचा त्यांचीं नांवें दिलीं आहेत.

सोळा अवतारांपैकीं दुसऱ्या अवतारांत दत्तप्रभूंनीं तीन शिरें व सहा हात व तिसऱ्या अवतारांत तीन शिरें व चार हात व इतर १४ अवतारांत एक मुख व दोन हात धारण केले होते, असें त्याच जयंतिकल्पावरून दिसतें.

तसेंच सोळा अवतारांपैकीं १५ अवतार अयोनिसंभव व फक्त एकच कालाग्निशमन चवथा अवतार योनिज असा झाला व तो श्रीसाध्वी-चुडामणी अनसुया मातेच्या उदरांतून झाला, असेंही त्याच जयंतिकल्पा-वरून दिसतें.

हल्लीं सर्वत्र ठिकाणीं दत्तजयंतीच्या दिवशीं कीर्तनांत जें दत्त-जन्माख्यान लावण्यांत येतें, तें तृतीय अवताराचें कथानक आहे. या अव-तारीं दत्तप्रभूंनीं अनसूयामातेच्या पोटीं प्रत्यक्ष जन्म घेतलेला नाहीं. फक्त पूर्वींच्या दोन अवतारांतील सवस्त्र षोडशवर्ष तरुण पुरुषाकृतिऐवजी अतिबाळ म्हणजे सद्यः प्रसूत झालेल्या विवस्त्र तान्ह्या मुलाचें रूप धारण केलें, इतकेंच.

दत्तभक्तांत दत्तभक्ति तीन प्रकारची आढळून येते. एकमुखी दत्ताची, दत्तपादुकांची, व त्रिमुखी दत्ताची. एकमुखी दत्त फार क्वचित ठिकाणीं आढळतात. श्रीक्षेत्र काशी, पंढरपूर, नगर, खडकी व शिरवळ वगैरे ठिकाणीं एकमुखी दत्तमूर्ति आहेत. पादुका व त्रिमुखी दत्तमूर्तींच विशेषेंकरून

सर्वत्र आढळतात. त्यामुळें एकमुखी दत्ताचे भक्त कमी. पादुकांचे व त्रिमुखी दत्तांचे भक्त असंख्य.

त्रिमुखी अयोनिसंभव बालरूप दत्तजन्माचें आख्यान अनेकांनीं अनेक तऱ्हेनें रचलेलें आहे, व तेंच कथानक सर्वत्र ठिकाणीं दत्तजयंतीच्या दिवशीं लावण्यांत येतें. खरें उदरगर्भजन्माख्यान म्हणजे फक्त कालाग्निशमन एकमुखी दत्तजन्माख्यानच होय असें स्पष्ट दिसतें, व कालाग्निशमन जन्माख्यान आजपावेतों कोणी तयार केल्याचें माझ्या वाचनांत किंवा ऐकिवांत नाहीं. म्हणून प्रसंगास साजेल असा मुळांत थोडा फेरफार करून अत्यल्पबुद्धीनें व श्रीसमर्थसद्गुरु साईबाबांच्या प्रेरणेनें मीं हें आख्यान रचण्याचा प्रयत्न केला आहे. हें आख्यान श्रीदत्तावतार बाबांचेंच आहे.

दोन्हीं कथानकें रम्य, रसाळ व हृदयंगम असून एकाच दत्तप्रभूचीं असल्यामुळें व अखिल महाराष्ट्रांत दत्तजयंतीच्या तिथि फक्त दोनच म्हणजे मार्गशीर्ष शु. १४ व १५ असल्यामुळें ज्यांस जें कथानक रुचेल व मास, तिथि काल व प्रसाद म्हणून वांटण्याची वस्तु यांस अनुसरून जें युक्त दिसेल तें त्यांनीं लावावें. म्हणजे प्रसंग व आख्यान यांची विसंगतता भासणार नाहीं.

## आख्यानाचा सारांश

**पूर्वरंगः**—त्रित्वाची कल्पना विश्वारंभापासून आहे. नवी नाहीं. याच त्रित्वाची त्रिगुण, त्रिपुटी अशीं निरनिराळीं नांवें आहेत. प्रथम परमात्मा फक्त ऐनजिनसी एकटेच होते. मी एकटा आहें, मला पुष्कळ व्हावयाचें आहे असें त्या निर्गुण स्वरूपास स्फुरण झालें. स्फुरण झाल्याबरोबर प्रकृति ( माया, द्वैत, अज्ञान, अव्यक्त, आभास ) निर्माण झाली व प्रकृतीनें त्रिगुणान्वित विश्वखेळ निर्माण केला. कोणताही खेळ एकांत, किंवा दोघांत केव्हांही होतच नाहीं; त्यास तिघांची जरूर असते; खेळणारा, खेळगडी व खेळसामग्री.

त्रित्वाची कल्पना वेदांत आहे, व ती "एकोऽहं; बहुस्याम् नान्यदस्तीति," अशा वचनांनीं व ब्रम्हा, विष्णु, महेश या त्रिमूर्ति स्वरूपांनीं ठिकठिकाणीं दर्शविली आहे व त्यावरूनच ती आपल्या हिंदुस्थानांत हिंदुधर्मीय आर्य लोकांत रूढ झाली आहे. आतां ही त्रिमूर्तींची कल्पना आपल्याच देशांत व आपल्याच लोकांत आहे असें नव्हे. ती ज्या ज्या देशांत ( तिबेट, जपान वगैरे ) बुद्ध धर्म चालू आहे त्या त्या देशांत, तसेंच ख्रिस्तीधर्मीय युरोप व अमेरिका खंडांत, तसेंच चीन, इजिप्त, ( आफ्रिका ) असीरिया व पर्शिया या देशांतील तद्धर्मीय लोकांतही आढळते. त्याचप्रमाणें ही कल्पना केवळ भूलोकांतच आढळते असें नाहीं. ती स्वर्गलोकांत व तेजोमय खगोलांतील तारकापुंजांत ही दक प्रत्ययास येते व ही गोष्ट पनवेलचे श्रीयुत फडके यांचे श्रीदत्तभक्तरहस्य व मुंबईचे श्रीयुत ओगले यांनीं ओरायनच्या आधारें लिहिलेल्या वेदकालनिर्णय या पुस्तकावरून सिद्ध होते.

आतां त्रित्वाची कल्पना जशी नवी नाहीं, तशी या त्रित्वास जें "दत्त" हें सुंदर नांव मिळालें आहे, तेंही नवें नाहीं. श्रीदत्तगुरूंनीं तिसऱ्या अवतारांत आपण स्वतः होऊनच तें पुण्य नामाविधान धारण केलें आहे. भूगोलांतील दत्तमूर्तीपेक्षां खगोलांतील ( आकाशांतील ) गोश्वानयुक्त तारकामयी तेजःपुंज दत्तमूर्ति खरोखरच अत्यंत प्रेक्षणीय व मननीय असून सर्वव्यापी परमात्मा विश्वांत कोठकोठें कसकशीं स्वरूपें धारण करून वावरत आहेत, हें प्रत्यक्ष दर्शविणारी आहे, व हीच मूर्ति जगदुद्धारार्थ मानवरूप धारण करून खालीं आली आहे कीं काय असें वाटतें.

हा विश्वखेळ म्हणजे त्रित्वाचा किंवा त्रिमुखी दत्तमूर्तीचा खेळ ऊर्णवाभि ( म्हणजे कोळी spider ) याच्या खेळाप्रमामाणें आहे. कोळी प्रथम आपल्याच उदरांतून काळसर तंतु काढून त्याचें जाळें विणतो. नंतर त्यांत जिवंत क्रिमी, कीटक माशा वगैरे लहान लहान जीवजंतु पकडून

शेवटीं त्या सर्वांसह त्या जाळ्याचा ग्रास करून टाकून फक्त आपण एकटाच उरतो. त्याचप्रमाणें निर्गुण वस्तूस स्फुरण होण्याबरोबर ती माया (प्रकृति) रूपि जाळें निर्माण करते व त्यांत विश्वांतील चराचर जीवजंतु पकडून कल्पांतीं विश्वरचनेसह मायेचा ग्रास (लय) करून टाकते. यावरून त्रिमुख हें परमात्माचें आभासिक अतएव मिथ्या स्वरूप आहे व एकमुख हें आभासशून्य अतएव सत्य स्वरूप आहे असें होतें, तथापि श्रीमद्भगवद्गीतेंत लिहिल्याप्रमाणें चतुर्भुज (अवतारसगुण) व विश्वरूप (अवतारशून्य मूळचें निर्गुण) हीं अनुक्रमें आभासिक व सत्य स्वरूपें त्याच परमात्माचीं असल्यामुळें (व आपण परमात्मसत्तेच्या उच्च कोटींतील माणसें नसल्यामुळें) जशी आपल्यास सारखीच सत्य व वंद्य, तशीच येथें ही त्रिमुख व एकमुख हीं त्याच दत्तगुरूंचीं स्वरूपें असल्यामुळें आपल्यास दोन्हींही सारखीच सत्य व वंदनीय आहेत.

या आकाशस्थ आपल्या मस्तकावर उभे असलेल्या हुबेहुब दत्तमाउलीच्या गोश्वानयुक्त त्रिमुखी दैवताचें नक्षत्रपुंजात्मक तेजःपुंज सौंदर्य पाहून त्या श्रीसाईदत्तचरण कमळांतील ब्राम्हानंदरूपि मधुर मकरंदाचा आस्वाद घेण्यांत बाल मधुकराचें मन त्यांच्या पुण्यचरणीं गुंग झालें आहे असें विनम्रपणें व अत्यादरपूर्वक सांगून पूर्वरंग समाप्त केला आहे.

**उत्तररंगः**—विश्व निर्माण करण्याकरितां परमात्मांनीं प्रथम जे सात मानसपुत्र निर्माण केले, त्यांपैकीं महर्षि अत्री हे एक होत. ह्या मानसपुत्रांना प्रजापति अशी संज्ञा आहे. सर्व प्रजापतींत अत्रि ऋषि हे एक महातेजस्वी व वन्हिप्रभावी विद्वद्रत्न होते. श्रीकर्दम महामुनि हेही एक प्रजापतीच होते. कर्दमऋषींचें लग्न प्रख्यात स्वायंभु मनूची कन्या श्रीदेवी देवहुती ह्यांच्याशीं झालें. ह्या जोडप्यास श्रीपरमात्म विभूति कपिल महामुनि व साध्वीचूडामणी जगदंबा अनसूयामाता आदिकरून अपत्यें झालीं. ह्या अनसूयामातेचा विवाह महर्षि अत्रींबरोबर झाला. हें ऋषिदंपत्य दंडका-

रण्यांत फार प्रेमानें व आनंदानें कालक्रमणा करीत असे. परंतु त्यांना संतति नसल्यामुळें पुत्रचिंतेनें त्यांचें चित्त नेहमीं जळत असे.

प्रत्यक्ष ब्रह्मदेवास सुद्धा तप केल्यावांचून सृष्टि निर्माण करतां येईना. करितां आपणही तप केल्यावांचून आपल्यास संतति होणार नाहीं अशी अनसूयामातेची पूर्ण खात्री झाल्यावरून त्यांनीं तुम्हास स्वतःलाच संतति नाहीं, तर तुम्ही प्रजापति कसले, असें आक्षेपगर्भ ( Taunting किंवा sarcastic ) कटु-पण विनयशीलतेनें अत्रिऋषींजवळ भाषण करून हिमाचलावर घोर तपश्चर्या करून परमात्माला वश करून घेण्याचा हट्ट धरला. ऋषिवर्यांनीं आपल्या लाडक्या सहधर्मचारिणीच्या प्रेमागृहास मान देऊन तीं उभयतां हिमालयावरील ऋक्ष नांवाच्या शिखरावर गेलीं व तेथें घोर तप करूं लागलीं. त्यांच्या उग्र तपसामर्थ्यानें आदिमावतार दत्तगुरु **योगिराज** यांची रम्य १६ वर्षांची मूर्ति त्या ऋषिदंपतीसमोर प्रत्यक्ष उभी राहिली.

या प्रत्यक्ष दर्शनानें त्यांच्यापैकीं कोणाचेंच समाधान झालें नाहीं. अत्रिऋषींनीं योगिराजांना फार दूषण दिलें. अनसूयामातेला तर देवाच्या या मायावीपणाबद्दल फार राग येऊन त्यांनीं देवाची चांगलीच निर्भत्सना केली, व रागानें त्या उभयतांनीं त्याच पर्वतशिखरावरच्या परम नांवाच्या तीर्थावर पुन्हा शंभर वर्षें उग्रतर तपश्चार्या केली. त्या तपश्चर्येच्या योगानें अत्रिऋषींच्या मस्तकातून एक भयंकर तेज बाहेर पडलें. त्या तेजाची प्रखरता विश्वास सहन होईना. म्हणून सर्व चराचर विश्व ब्रम्हा विष्णु महेश या तीन देवांकडे आश्रयाकरितां गेलें. त्या त्रैमूर्तींनीं जगतास अभय देऊन ते तिघे देव अत्रिऋषींच्या आश्रमांत गेले. मी एकाच देवाचें ध्यान करीत असतां तुम्ही कोण व तिघे येथें कशाकरतां आलां म्हणून अत्रींनीं त्यांना सविस्मय प्रश्न केला. तूं ज्या एका देवाचें चिंतन करीत आहेस तोच एक देव आम्ही आहों. तूं आमच्यांत भेद न मानतां त्या एकाचेंच चिंतन करीत बैस. असें बोलून ते तिघे अंतर्धान पावले व पुन्हा

२९

**अत्रिवरद** नामक दत्तगुरूंचा दुसरा अवतार घेऊन पूर्वीप्रमाणें दिव्य तरुण १६ वर्षांचा तीन शिरें व सहा हाताचा देह धारण करून त्या ऋषिदंपतीच्या पुढें येऊन उभे राहिले व त्रैलोक्यांत जो दुर्मिळ वर असेल तो मागा असें म्हणाले. या दर्शनानेंही त्या ऋषिदंपतीचें समाधान झालें नाहीं. तथापि वरच देत असाल, तर तुमच्यासारखें पुत्ररत्न द्या अशी अत्रींनीं त्यांच्याजवळ याचना केली. परंतु देवाच्या या जादुगिरीबद्दल अनसूयामातेनें देवाची सणसणीत कानउघाडणी करून त्याच्या या ऐंद्र-जालिक कृत्याबद्दल पूर्ण नापसंती, निराशा, क्रोध व तिटकारा दर्शविला. अत्रींनीं त्यांचें सांत्वन केलें. इतक्यांत परमात्म्यांनीं त्यांना आणखी एक हुलकावणी देऊन निसटून जाण्याची निराळीच युक्ती काढली.

तुमच्या कठिण व खडतर तपाला मी भुललों व आतां मी स्वतः-लाच तुम्हास देऊन टाकून तुमच्या अधीन होऊन तुमच्या इच्छेप्रमाणें बालरूप धारण करतों. असें म्हणून दत्तगुरूंनीं तृतीय अवतारांतील सद्यः प्रसूत असें बालस्वरूप धारण करून दत्त हें नामाभिधान धारण केलें. तें दिव्य मोहक बाळ दिगंबररूप पाहून अत्रि ऋषि इतके शांत तरी सुद्धा खिन्न झाले. मग अनसूया मातांच्या संतापाला तर विचारावयासच नको ! त्यांनीं देवाच्या या नटवेगिरी व फसवेगिरीबद्दल देवाचा खरपूस समाचार घेतला व पुन्हा उग्र व भयंकर तप करून मी आपल्या पातिव्रत्य तेजानें तुझ्या हातावर तुरी देऊन तुलाच माझ्या उदरांत जन्म घेण्यास लावून तुला चांगली शिक्षा करीन व आजवर केलेल्या अशा प्रकारच्या अपराधांची तुझ्याकडून कबुली घेऊन तुला पायां पडावयास लावीन अशी परमात्मास सणसणीत तंबी दिली.

आतां आपण पुन्हा अति उग्र तप करूं व तो देव आपल्यास कसा औरस पुत्र देत नाहीं तें पाहूं असें म्हणून त्या ऋषिदंपतीनें स्वतःच्याच आश्रमांत तिसऱ्या वेळीं तप करण्यास प्रारंभ केला. त्या तपाच्या उग्रतमते-मुळें अत्रिऋषींच्या मस्तकांत असह्य असा कालाग्नि उत्पन्न झाला व त्यांना तप करण्याचें सुचेना. त्यांच्या अंगाची लाही लाही झाली, व प्राण व्याकुळ

झाले. अनसूयामातेनें परमात्माचा धांवा केला. परमात्मास दया आली. नंतर लागलीच परमात्मा स्वतःच वायु व मेघ बनून अत्रींच्या शरीरांत करुणामृताची वृष्टि करण्याकरतां शिरले. तत्क्षणीच अत्रींचा दाह शांत झाला व त्यांनीं ऋतुमती अनसूया मातेकडे सकाम दृष्टीनें पाहिलें. त्याही सकाम झाल्या.इतक्यांत अत्रिऋषींच्या नयनांतून एक दिव्य भयंकर तेज बाहेर पडलें. तें तेज पाहून अनसूया मातेला अत्यानंद झाला. हें तेज सहन करण्यास आपल्यावांचून श्रीलक्ष्मी, पार्वती सावित्री आदिकरून कोणीही पतिव्रता समर्थ नाहींत व हें आतां सर्व विश्वाची राखरांगोळी करील असें समजून त्यांनीं तें विश्वदाहक तेज वरच्यावर झेलून आपल्या उदरांत सांठवून ठेविलें त्यापासून त्या तत्क्षणींच गरोदर राहिल्या. त्यांना वैराग्याचे डोहळे लागले. नऊ मास पूर्ण झाल्यावर त्या मार्गशीर्ष शु. १४ बुधवार, रोहिणी नक्षत्र प्रदोषकालीं प्रसूत झाल्या. त्यांना जगदुद्धारक चतुर्थावतार **कालाग्नि-शमन** नामक पुत्ररत्न झालें. तें दिव्य व अत्यंत सौंदर्यवान पुत्रमुख पाहून त्यांना अत्यानंद झाला. त्यांनीं त्या बालकाचें अमर्याद चुंबन घेतलें व त्याला स्तनपान दिलें व तूं जरी पहिलें आद्यतत्त्व आहेस, तरी मला तूं तुझी आई म्हणून मानिलें आहेस. करितां माझें सर्व कोडकौतुक पुरीव, असें सांगून त्यास पाळण्यांत घालून गाणें म्हणून झोंके देऊन निजविलें. याप्रमाणें वर्णन करून येथें आख्यान समाप्त केलें आहे.

मिति श्रावण कृ. १३
गुरुवार शके १८५६
ठाणें

श्रीसाईपदरज दासनुदास
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

295

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

# चतुर्थावतार दत्तगुरु श्रीकालाग्निशमन साईदत्तजन्म कीर्तनाख्यान

## नमन

श्रीगणेशायनमः। सजयति सिंदुरवदनो देवो यत्पाद पंकज
स्मरणं वासरमणिरिव तमसां राशिं नाशयति विघ्नानाम् ।

## नमन व प्रार्थना

१ पद

( रामदास माउली० या चालीवर )

दयाघन माउली गे । माय माझी दत्तराज माउली ॥
दत्तराज माउली गे । माय माझी ज्ञानराज माउली ॥
ज्ञानराज माउली गे । माय माझी साइराज माउली ॥
साइराज माउली गे । माय माझी दयाघन माउली ॥

लपुनी जगतीं सूत्र ओढिते । हलवि चराचर बाहुली ॥ गे माय माझी ॥१॥
भवभय तापें तप्त दास हा । करि करुणेची साउली ॥ गे माय माझी ॥२॥
काममदादिक गांजिति निशिदिनीं । दूर करी अंहितावली ॥
गे माय माझी ॥ ३ ॥
दीन बाळ तव, नमुनी विनवी । ठाव देइं तव पाउलीं ॥ गे माय माझी ॥४॥

---

१ अहित म्हणजे शत्रु, अरि, रिपु. आवलि म्हणजे पंक्ति, समुदाय, समूह. संघ, वृंद. अतएव अहितावलि म्हणजे काम-क्रोधरूपि शत्रूंचा समुदाय.

भूत्वा यःस्वयमेव नृत्यति सदा ब्रह्मांडरंगावनौ ।
नित्यं नौमि नमामि तं नटवरं श्रीसाइनं सद्गुरुम् ॥

**अर्थः**—नाटककंपन्या, पांच व सात अंकी नाटकें, दोन किंवा तीन अंकी नाटिका ( नाटकांत काम करणारीं ) पुरुष व स्त्रीपात्रें, गायन, वादन व नर्तन आदि करून ( नाटकांस लागणाऱ्या ) सर्व कला, नाटक शास्त्र, नाटकास लागणाऱ्या यच्चावत् इतर सर्व वस्तु, नाटकापासून प्राप्त करून घेण्याची वस्तु ( ध्येय) व नाटकास लागणारीं सामग्री, हीं सर्व आपणच होऊन ब्रह्मांडाच्या रंगभूमीवर रात्रंदिवस स्वतःच यैमान करणारे नटश्रेष्ठ श्रीसद्गुरु साइनाथमहाराजांचें मी निरंतर स्तवन व नमन करतों.

## आद्य कालापासूनच एकामध्यें त्रित्वाचा अंतर्भाव

श्रुतिः (समष्टिः)

आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् । नान्यत्किंचन मिषत् ।
स ईक्षत लोकान्नु सृजा इति । —ऐतरेयोपनिषद् प्रथम खंड मंत्र १

५. भुजंगप्रयात

आधीं एकला एक आत्मा अरूपें[१] । तदिच्छोद्भवें[२] द्वैत माया स्वरूपें ।
तियेपासुनी[३] त्रित्वें[४] त्रैगुण्यें[५] झालें । अशी ऐतरेया श्रुती बोलें[६] बोले ।

## मूळ वस्तुलाच स्फुरण होऊन तिला तीन मुखें निघून त्यापासून तीन निरनिराळीं स्वरूपें म्हणजेच दत्त-त्रिमुखत्वाचें प्रगटीकरण.

---

१ कोणत्याही प्रकारचा आकार, वर्ण नसलेला. २ त्याच्या इच्छेनें उत्पन्न झालें. ३ मायेपासून. ४ तीनपणा. ५ तीन गुणपणा ( रज, सत्त्व, तम. ). ६ वचन.

२९१

श्रुतिः (व्यष्टिः)

एकोऽहं बहुस्याम नान्यदस्तीति ॥

—तैत्तिरियोपनिषद् ब्रह्मवल्ली ६, अनुवाक् बृहदारण्यकोपनिषद् अध्याय १, ब्राह्मण ४

६ दिंडी

अहा " एकोऽहं " एकमुख गुरूंचें । द्वितियानन[1] तें " बहुस्याम "त्यांचें ।
" नान्यदस्तीति " तृतीयास्य[2] सांचें[3] । दत्तत्रिमुखत्व श्रुतिमुखीं कसें नाचे॥

७ स्रग्धरा

मी एकोएक होणें मज बहु, पहिली निर्गुणी स्फूर्ति[4] झाली ।
सद्वस्तु स्फूर्ति संगें प्रकृति गुण अशा द्वैत[5] भासास[6] ब्यांली[7] ।
आभासें आत्मरूपीं नयनसुभगशा[8] विश्वखेळासि खेळे ।
खेळीं ना लिप्त, तीचें नवल ! नच कदा अद्वितीयत्व[9] मैळे[10] ॥

दत्तभक्तांची दत्तभक्ति प्रायः तीन प्रकारची आढळते. एकमुखी दत्तांची ( मूर्ती, प्रतिमा, संतावतार सगुण परमात्मा ) दत्त पादुकांची व त्रिमुखी दत्ताची. पैकीं एकमुखी दत्त क्वचित्, तसेंच त्याचे भक्तही विरळा. दत्तपादुकांचीं स्थानें बरींच, तसे त्यांचे भक्तही पुष्कळ. त्रिमुखी दत्तमूर्ति व प्रतिमा असंख्य तसे त्यांचे भक्तही अगणित.

कोणत्याही खेळास तिघांची जरूर लागते. खेळणारा, खेळगडी व खेळसामग्री. खेळ एकांत कधींच होत नाहीं. परमेश्वराच्या जगरूपि खेळास ही त्रित्वाची, त्रिपुटीची त्रैमूर्तीची म्हणजे दत्त-त्रिमुखत्वाची आवश्यकता आहे.

१ दुसरें मुख. द्वितीय=दुसरें, आनन=मुख. २ आस्य=मुख. ३ खरोखर. ४ स्फुरण Inspiration. ५ दोन. ६ मिथ्यात्व, खोटेपणा. ७ निर्माण केले. ८ डोळ्यास सुंदर दिसणारा. ९ एकपण. १० मलिन होत नाहीं, बिघडत नाहीं; नाहींसें होत नाहीं.

अद्वैत हें खेळास नालायक, द्वैत हें लंगडे, फक्तत्रिपुटी मात्र समर्थ. सृष्टि निर्माण करणें, तिचें पालन करणें व तिचा संहार करणें हाच परमात्म्याचा खेळ. हीं तीन स्वरूपें सृष्टि निर्माण करण्याच्या पूर्वीपासून त्यांच्या ठिकाणीं स्वत:सिद्ध आहेत.

**विश्व प्रारंभाचे वेळीं विश्वकार्यार्थ परमात्मांनीं स्वतःचेच तीन भाग पाडून त्यांस तीन निरनिराळीं नांवें दिलीं.**

८ अनुष्टुभ्

अस्य त्रैलोक्यवृक्षस्य। भूमौ विटप शाखिनः।
अग्रं मध्यं तथा मूलं। विष्णुर्ब्रह्मा महेश्वरः॥ —रुद्रहृदयोपनिषद्

**एकाचे तीन विभाग करण्याचें प्रयोजन व त्यांचीं कार्यें**

९ अनुष्टुभ्

कार्यं विष्णुः क्रिया ब्रह्मा। कारणं तु महेश्वरः।
प्रयोजनार्थं रुद्रेण। मूर्तिरेका त्रिधाकृता॥ —रुद्रहृदयोपनिषद्

## विश्वांतील पंचतत्त्वात्मक प्रत्येक वस्तूंत गुप्त त्रित्व म्हणजे गुप्त दत्तस्वरूप

१० आर्या

[1]कांचन, [2]कंज, [3]कृशानु, [4]कलकॅलकलॅकंठि [6]कृत्तिका [7]कांता।
इति [8]पंच भूतजात [9]त्रिगुणान्वित दत्त, चिंति एकांता॥

वर वर्णन केल्याशिवाय अ, ऊ, म ॐकार, ऋग्, यजु, साम, ब्रह्मा,

---

१ सोनें. २ कमळ. ३ अग्नि. ४ अस्पष्ट मधुर शब्द. ५ मधुर शब्द करणारी कोकिला. ६ कृत्तिका नक्षत्र. ७ रमणीय. ८ पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश यांपासून निर्माण झालेले पदार्थ. ९ सत्त्व-रज-तम गुणांनीं युक्त.

३००

विष्णु, महेश, अधिभूत, अधिदैव, अध्यात्म, क्षर, अक्षर, पुरुषोत्तम, गंगा, यमुना, सरस्वती, गार्हस्पत्य, आहवनीय दक्षिणाग्नि, ध्याता, ध्येय, ध्यान, उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा, सकाळ, दुपार संध्याकाळ, वगैरे वगैरे ह्या सर्व त्रिपुट्यांत दत्त स्वरूपच सामावलेलें आहे.

## इतर देशांतील व धर्मांतील त्रिमूर्तींची

## म्हणजे दत्त-कल्पना

११ शार्दुलविक्रीडित

मंजुश्री, अवलोकितेश्वर तथाऽसीमप्रकाशा[1] बुधां[2]।
ख्रिस्तांची[3] त्रिनिटी पिता, सुत, पवित्रात्मा च एवं[4] विधां।
चीनांच्या शुभ फो, सनो समप सपमओ, प्राचीन, ह्या देवता।
आसीरीस इसीस होरस अशा ईजिप मूर्ती मता॥

१२ द्रुतविलंबित

अँसिरिया अनु, चेल हिया इति। अहुरमझ्झद मिथ्रऽ सभा इति।
अँनल अमृत अर्क[10] तथैव वा। भजति पारसिका तिन्हि या शिवा[11]॥

आतांपर्यंत त्रिस्वाची, त्रिमूर्तींची किंवा त्रिमुखी दत्तकल्पना अति पुरातन म्हणजे आद्य कालापासून स्वर्गांत, वेदांत, मृत्युलोकांत, हिंदुस्थानांत व ज्ञात (माहित असलेल्या) जगांतील बहुतेक सर्व देशांत कशी रूढ झाली आहे, याचें संक्षिप्त विवेचन केलें. म्हणजे आतांपर्यंतचें विवेचन भूगोलांतील

---

१ असीम प्रकाश. २ बुद्धांच्या मंजुश्री, अवलोकितेश्वर व असीमप्रकाश ह्या तीन देवता. ३ त्रिनिटी Trinity त्रिमूर्ति Father, son & the holy Ghost; (पिता पुत्र व पवित्र आत्मा सैतान). ४ याप्रमाणें. ५ अस्माइति हें देवतेचें नांव आहे. ६ मानल्या गेल्या आहेत. ७ असीरिया देशांतील त्रिमूर्ति अनु, चेल व हिया. ८ अग्नि. ९ पाणी. १० सूर्य. ११ कल्याणकारक.

हे. आतां ह्या त्रित्वास म्हणजे त्रिमुखी दत्तकल्पनेस खगोलांतही मूर्तिमंत प्रत्यय मिळतो व तो अत्यंत आल्हादकारक, प्रेक्षणीय व अनुभवसिद्ध आहे.

## खगोलांतील म्हणजे आकाशांतील नक्षत्र-स्वरूप त्रिमूर्तित्व म्हणजे गोश्वानयुक्त अभिनंदनीय, प्रेक्षणीय, वंदनीय मननीय दत्तमूर्ति

र्गशीर्ष महिन्यांत येत असलेला वसंत ऋतु व मार्गशीर्षापासून होत असलेला वर्ष-प्रारंभ.

१३ आर्या

प्राचीन वेदकाळीं एके वेळीं वसंत संपातें
मृगनक्षत्रीं होता वर्षप्रारंभ ही तसा त्यांत ॥

---

१ क्रांतिवृत्त व विषुव वृत्त (The ecliptic & the Sun's equinoctia sage) हीं दोन वर्तुळें (circles) ज्या दोन बिंदूंत (points) एकमेकांस छेदतात, ा त्या प्रत्येक छेदनबिंदूस संपात (meeting together) म्हणतात. हीं दोन वृत्तें ा वर्तुळें म्हणजे सूर्याचे (वस्तुतः पृथ्वीचे) नक्षत्रांतून फिरण्याचे मार्ग आहेत. या दोन वरच्या सत्तावीस (हल्लीं अठ्ठावीस) नक्षत्रांचीं स्थानें आहेत. हे संपात दोन आहेत. तसंपात व शरत्संपात. यांपैकीं ज्या नक्षत्राजवळ सूर्य आला म्हणजे वसंत ऋतूला भ होतो, तो वसंतसंपात, व दुसरा शरत्संपात. या बिंदूपासून ९० अंशांवर असलेले दुसरे बिंदु, त्यांस अयनबिंदु म्हणतात. त्यांपैकीं एकास उत्तरायण व दुसऱ्यास दक्षिणन बिंदु असें म्हणतात. क्रांतिवृत्त स्थिर आहे. विषुववृत्त चल आहे. त्यामुळें त्यांना दणारे संपातबिंदूही चल आहेत व अयनबिंदूही चल आहेत.

१४ लावणी ( जाउं नको रे विषयारविंची० या चालीवर )

त्रिभुवनसुंदर विश्वमंदिरीं नीलांबर[1] हें वितान[2] ॥
त्यावरि तारागण–हंडयामधि रत्न[3]दीप जणु छान ॥
तयांत मणिमय झुंबर सदृश तीन पुंजें शोभती ॥
ज्याते रोहिणी मृग आरद्रा ज्योतिर्विद बोलती ॥

## दत्त–त्रिमुखांपैकीं पहिलें नक्षत्र–मुख

### ब्रह्मदेव

१५ साकी

ह्या ताऱ्यांच्या तीन देवता वसंत समयीं दिसती ॥
पहिली यज्ञाब्दा[5]रंभाची रोहिणि[6] रजः[7] प्रजापती[8] ॥
दृष्टी नभिं फेंका । प्रभुची लीला अवलोका ॥

## दुसरें नक्षत्र–मुख

### विष्णु

१६ साकी

क्षीरोदधि जणु नभगंगा[9] ही मृग[10]शिर सन्निध वाहे ॥

१ नील=निळें अंबर=आकाश=निळ्या रंगाचें आकाश. २ छत, चांदवा. ३ ( नक्षत्र किंवा तारा ह्या हंडया ) त्यांत नक्षत्रांचें तेज हेच रत्नांचे दिवे. ४ राशि समूह. ५ पूर्वी नव्या वर्षास सुरवात झाली कीं, यज्ञ करण्यास सुरवात होत असे म्हणून वर्षप्रारंभाला यज्ञ-वर्षारंभ म्हणत. ६ रोहिणी नक्षत्राचा पुंजका. ७ रजोगुण ८ ब्रह्मदेव. ९ आकाशगंगा. याच आकाशगंगेला इंग्रजींत milky way असें म्हणतात. आकाशगंगा म्हणजेच क्षीरसागर व वैतरणा नदी. १० मृग नक्षत्राचा पुंजका.

मृगशिर सात्विक विष्णु देवता क्षीरसागरीं राहे ॥
दृष्टी नभिं फेंका। प्रभुची लीला अवलोका ॥

## तिसरें नक्षत्र–मुख

## शंकर

१७ साकी

तमोगुणी जी रुद्र देवता आर्द्रापुंजीं विलसे ॥
नवल पहा हें त्रिमुखी दैवत नभिं कैसें तें शोभतसे ॥
दृष्टी नभिं फेंका। प्रभुची लीला अवलोका ॥

## वरील आकाशस्थ नक्षत्ररूप दत्तगुरुजवळ असलेले वेदरूप कुत्र्यांचे दोन नक्षत्रपुंज व त्यांचें कार्य

१८ दिंडी

तीन पुंजासन्नीध दोन श्वानें[1]। पुंज दिसती रक्षिती देवयान[2] ॥

---

१ कुत्र्यांच्या आकृतीचे दोन नक्षत्रपुंजके. ह्या दोन कुत्र्यांस संस्कृतांत श्वन् व श्वन् म्हणजे लहान कुत्रा व मोठा कुत्रा असें म्हणतात. ग्रीक भाषेंत क्यान, प्रोक्यान इंग्रजींत कॅनिस मायनॉर व कॅनिस मेजॉर असें म्हणतात. (अथर्ववेद ६–८०–३). २ देवयान व पितृयान हीं देवलोकांत व पितृलोकांत जाण्याचीं दोन द्वारें आहेत. देवयान (देवलोक) (देव=अमर, यान=मार्ग) म्हणजे आकाशाच्या वरचा भाग. तो प्रकाशित ज्ञात प्रदेश आहे व तेथें इंद्राचें राज्य आहे. पितृयान (पितरलोक) (पितृ=पितर, यान=मार्ग) म्हणजे आकाशाच्या खालचा भाग. हा अंधःकारमय व जलमय प्रदेश आहे, व तेथें यमाचें राज्य आहे.

देवयान ऊर्फ देवलोक व पितृयान ऊर्फ पितरलोक या दोन गोलार्धांना जोडण्याचें काम वसंत व शरत्संपात करतात. म्हणजे हीं संपातस्थानें देवयानाचीं ऊर्फ स्वर्गाचीं द्वारें होत.

हीं दोन द्वारें संरक्षण करण्याकरतां दोन द्वारांवर म्हणजे वसंत व शरत्संपात बिंदूंजवळ वरील दोन कुत्रे (श्वानपुंज) आहेत.

302

एक मोठा[1] लघु दुजा अनुपमेय । वेदरायांचें चिन्ह सारमेयं[2] ॥

## त्याचप्रमाणें दत्तगुरुजवळ असलेली गाय

१९ इंद्रवज्रा

गंगा[3] नभीं वैतरणा[4] तराया । नौका[5] तिथें ठेविलि देवराया ॥
गोरूप[6] नौभार[7] पडे भराया । मर्त्यां[8] वदे तार्क्ष्य[9] पुराण राया ॥

२० पद. राग धनाश्री, ताल दादरा

( मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली, या चालीवर )

मूर्तिमंत भासत ही मज शिरावरी नभीं[10] ॥

---

१ आसामान्य, अलौकिक. २ कुत्रा.

३–४ वेदांत व पुराणांत वर्णिलेली आकाशगंगा व क्षीरसागर गरुडपुराणां सांगितलेली वैतरणा नदी व इंग्रजींत म्हटला जात असलेला Milky way ( दुग्धमार्ग दुधाचा रस्ता ) हीं एकाच आकाशगंगेचीं निरनिराळीं नांवें आहेत. ५ नाव ( दैवी नावम् ऋग्वेद १०–६३–१०). ६ गाईच्या रूपानें. ७ नावेचें भाडें. ८ मेलेल्या मनुष्यांस ९ तार्क्ष्य=गरुड. पुराणराया=पुराणांचे राजे,कर्ते, व्यास. मृत मनुष्यास यमलोकांत जाण्या करतां वैतरणा नदी तरून जावी लागते. ती तरून जाण्याकरतां तेथें देवानें एक नौका ठेविली आहे, तिला संस्कृतांत दैवीं नावम् असें म्हणतात व ग्रीक लोकांत आर्गोनेव्हिस असें म्हणतात व हा नावेचा तारा मोठ्या कुत्र्याच्या ताऱ्याजवळ अगदीं हुबेहुब नावेच्या किंवा जहाजाच्या आकाराचा आहे. ह्या नावेंत बसून जाण्याचें भाडें गाईच्या रूपानें द्यावें लागतें, म्हणून मृताच्या नांवानें एक गाय द्यावी म्हणजे त्याला या नदीपलीकडे जाण्याचा नावेचा खर्च देतां येतो, असें गरुड-पुराणांत सांगितलें आहे. १० आकाशांत.

तारकामयी सुरम्य *दत्तमाउली उभी ॥
उद्धरावयासि जगा मनुजरूप घेउनी ॥
मेदिनी तलीं आली, भक्त-सुरभि सौरभी ॥ मूर्तिमंत० ॥

## त्रित्वाचें पुन्हा एकत्व किंवा तीन मुखांचें पुन्हा एक मुख अथवा त्रिमूर्तीची पुन्हा एक मूर्ति

२१ स्वागता

र्णनाभि उदरांतुनि काळें । सूत्रैं काढुनि विणी मग जाळें ॥
थांत तो धरि क्रिमी जित माशा । ग्रासि त्यासकट दावि तमाशा ॥

१ नक्षत्रस्वरूप. २ सुंदर. ३ मनुष्याचें रूप. ४-५ भक्तांची आवडती कामधेनु. कोळी Spider. ७ सूत. ८ सूक्ष्म जीवजंतु. ९ जिवंत. १० गिळून ाकतो.

* याप्रमाणें रोहिणी, मृग, आर्द्रा,नक्षत्रपुंजांच्या तीन देवता ब्रह्मा,विष्णु,महेश,देव-ानाचीं दोन द्वारें राखणारे दोन कुत्रे,वैतरणा नदी उतरून पलीकडे घेऊन जाणाऱ्या नावेस ार किंवा भाडें (freight) भरण्याकरितां मृतांना द्यावी लागणारी गाय,या सर्व चिन्हांनीं ंकित असें आकाशस्थ तारकापुंजात्मक श्रीदत्तगुरूंचे हुबेहुब अत्यंत मोहक मूर्तिमंत स्वरूप र्णपणें दृक्प्रत्ययास येतें. यावरून त्रिमुखी दत्तगुरु हे केवळ भूगोलांतील सर्व प्रदेशांत याप्त आहेत असें नाहीं; ते खगोलांत अतएव अखिल विश्वांत व्याप्त आहेत असें सिद्ध ोतें. " ओरायन " च्या अभावीं खगोलांतील या रम्य दत्तगुरुमूर्तीच्या अलौकिक प्रभु-लीलेच्या पत्ताही लागला नसता व ही मूर्ति आकाशाच्या कुशींत आणखी किती असंख्य कालपर्यंत अडकून पडली असती कोण जाणे ! ! ! ओरायनकारांनीं या बाबतींत सर्व ज्ञात जगास निःसंशय अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे. ११ तमाशा=खेळ व खेळास ग्रासून टाकणें म्हणजे प्रलयकाळीं त्रिमुखाचें पुन्हा एकच मुख धारण करून ग्रसणें =खेळ संपविणें.

303

टाळी महाराजः—

दत्तचिदीश्वर साईराज। विरिंचि हरिहर श्रीगणराज.
( त्याप्रमाणें नामघोष १० वेळ करावा )
श्रीसच्चिदानंद सद्गुरु दत्तमहाराज की जय।
„ „ „ ज्ञानेश्वर महाराज „ „
„ „ „ साईनाथ महाराज „ „
„ „ „ सर्व साधुसंतमहाराज „ „
श्रीकालाग्निशमन दत्तप्रभूस हार घालणें व बुका लावणें.

## आकाशस्थ दत्तगुरुचरणकमलांतील मकरंद खाण्यांत बालभृंगाचें लौलुप्य

( बुका लावण्याच्या वेळीं म्हणण्याचें पद. )
२२ पद. राग हमीर-कल्याण; ताल त्रिवट

( ब्रम्ह पाहिलें० या चालीवर )

ओरायन[1] बोलें। अहाहा ओरायन बोलें॥
अगणित निशिदिनिं कुशिं[2] सांकडली[3]। प्रणवरूप[4] दत्तगुरु मूर्ति ही।
नीलांबरं[5] खोलें[6] ॥ अहाहा ॥ ध्रु.॥
वेदराशि हे बहुवस भाग्यें। नक्षत्रोदरिं शिरुनी धैर्यें। श्वांङ्गों[7] होउनि

१ ओरायन हा ग्रीक शब्द आहे. हा मूळ आग्रहयण या संस्कृत शब्दावरून झाला आहे. आग्रयण हें मृगशीर्ष नक्षत्रपुंजाच्या आग्रहायण या नांवाचें मूळ स्वरूप आहे. आग्रहायण हें मार्गशीष महिन्याचें नांव आहे. २ पोटांत. ३ अडकून राहिली. ४ ओंकाररूप म्हणजे अ, उ, म रूप म्हणजे अ=तमोगुण, उ म्हणजे रजोगुण व म=सत्व गुण. तमाची देवता शंकर,रजाची ब्रह्मदेव, व सत्त्वाची विष्णु म्हणजे प्रणवरूप ओंकारांत दत्तरूप भरलेलें आहे. ५ निळे रंगाचें आकाश. ६ प्रकट केले. ७ श्वन् कुत्रा व गो=गाय.

अति चातुर्यें । सन्निध त्यां[1] ठेले । प्रभूच्या, सन्निध त्या ठेले हरीच्या, ।
देवाच्या अगणित निशिदिनिं० ॥ १ ॥

नैसर्गिक हीं अगम्य लीला । दावित साई-शंकर भोला । निरखुनि
वाटे मोद मनाला । विद्वज्जन डोले ज्योतिर्विद, डोले
प्रेक्षकजन, साधूजन । अगणित निशिदिनि ॥ २ ॥

आकाशाच्या ब्रह्मानंदीं । साईदत्तांघ्रीं[2] अरविंदीं[3] । बालीली[4] मन मधु[5]
म[6]करंदीं । गुंगचि हो झालें । लुब्धचि हो झालें
मग्नचि, दंगचि । अगणित निशिदिनीं ॥ ३ ॥

पूर्वरंग समाप्त

---

१ त्या दत्तप्रभूजवळ. २ दत्तचरण. ३ कमलीं. ४ बालभृंग, मधुकर, षट्पद भृंगा=५ गोड. ६ मध.

# उत्तरंग-आख्यान प्रारंभ

## श्रीसाईदत्तगुरुचरित्र लीला वर्णन करण्यांत बालाचा अनधिकार

२३ मंदाक्रांता

क्वाऽसौ श्रीमानतुल भगवान्साइच्चिच्चक्रवर्ती
क्व श्रीसाईचरितजलधि र्दुस्तरोऽनंतपारः ॥
क्व श्रीलीला गहनमधुरास्तस्य कल्लोल मालाः ॥
क्वाऽयं बालः प्रकृतविषये दीन शून्याधिकारः

**अर्थः**—ज्ञानसम्राट् (बादशहा) श्रीमंत, अनुपमेय, षड्गुणैश्वर्य भगवान श्रीसाईदत्तगुरु कोणीकडे ! अमर्याद व तरून जाण्यास कठीण असा श्रीसाईदत्तगुरुचा चरित्ररूपि समुद्र कोणीकडे ! त्याच समुद्राच्या श्रीसाइदत्तगुरूंच्या गूढ व गोड रसाळ लीलारूपि लाटांचा समुदाय कोणीकडे ! व श्रीसाईदत्तगुरूंचें जन्माख्यान वर्णन करण्याचा जो हल्लींचा प्रसंग त्यांत दरिद्री व अनधिकारी हा बाल कोणीकडे !

परंतु परमात्माचेच मनांत आल्यावर काय होत नाहीं !

२४ अभंग

आले देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना

(तु. गाथा ३१०६)

विश्वखेळास प्रारंभ करिते वेळीं प्रथम चार लोक व आठ लोकपाल (दिक्पाल) निर्माण केले.

## श्रुति : मंत्र २-३

सइमाँल्लोकान सृजत। अंभो मरीची मर मापोऽदोंऽभः
परेण दिवं द्यौ प्रतिष्ठांतरिक्षं मरीचयः। पृथिवी मरो या
अधस्तात्ता आपः ॥ २ ॥

सइक्षतेमेनु लोका लोकपालान्नु सृजाइति। सोऽद्भयः
एव पुरुषं समुद्धृत्या मूर्छयत् ॥ ३ ॥

—ऐतरेयोपनिषद् प्र. अध्याय, प्र. खंड

२५ अनुष्टुभ्

इंद्रो वन्हिः पितृपतिः। नैऋतो वरुणो मरुत् ॥
कुबेर ईशः पतयः। पूर्वादीनां दिशां क्रमात् ॥

—अमरकोश प्र. कांड, श्लोक ८५

नंतर मानसपुत्र, सात ऋषि व चार मनु निर्माण केले.

२६ अनुष्टुभ्

महर्षयः सप्त पूर्वे। चत्वारो मनवस्तथा ॥
मद्भावा मानसा जाता। एषां लोक इमाः प्रजाः॥

—श्री. भ. गी. अ. १०, श्लो. ५

## अत्रींचा जन्म योग्यता शक्ति व विद्वत्ता

२७ स्रग्धरा

पूर्वी सप्तर्षि, चारी मनु मग सृजिले, मानसापासुनीया ॥
निर्माया विश्व ईशें, निज, अतुलें वैभैश्वर्य ही दाउनीया, ॥

१ मनापासून (परमात्माचा) यांनाच मानसपुत्र किंवा प्रजापती म्हणतात.
विलक्षण, अलौकिक. ३ शक्ति व मोठेपणा.

305

सप्तर्षीमाजि अत्री, [1]ग्रहिं जणु रवि जे, वन्हि [2]जन्म प्रदाते ॥
ऋग्वेदाथर्व [3]सूक्त, [4]स्मृति इति विविध, ग्रंथ[5]राज [6]प्रणेते ॥

२८ पृथ्वी

ऋषीवर मरीचि, अंगिरस, रत्न अत्रि, क्रतु, ॥
वशिष्ठ, हि पुलस्त्य, वै पुलह, सप्त [7]नामांकितु ॥
प्रसिद्ध मनु चार त्या मधिल [8]आद्य [9]स्वायंभुवा ॥
[10]स्वरोचिष हि औत्तमी विबुध[11] तामसा[12] भैरवा ॥

## अनसूया मातांचें कुल, जन्म व योग्यता.

२९ दिंडी

मनूमाजी स्वायंभु मनु विराजे । देवहूती कन्यका तया साजे ॥
देवहूती [13]पर्णिली कर्दमासी[14] । कपिल[15] अनसूया [16]अपत्यें तयासी ॥

३० आर्या

श्री रुक्मिणि मातुःश्री, चूडालांबा[17] अरुन्धती[18] जननी
सम[19] अनसूया माता [20]यन्नामैव [21]क्षमाघ-अरि-हननीं ॥

---

१ ग्रहांमध्यें म्हणजे रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु, केतु, य नवग्रहांत. २ अग्नीला जन्म देणारे. ३ वेदमंत्र. ४ परंपरागत कायद्याचें पुस्तक किंवा कायद्यांच्या नियमाचें पुस्तक. ५ विश्ववंद्य नानाप्रकारचे राष्ट्रधर्मग्रंथ. ६ करणारे, रचणारे. ७ प्रख्यात. ८ पहिले. ९ स्वायंभू. १० स्वारोचिष. ११ ज्ञानी, सुज्ञ. १२ तामस नांवाचे परंतु अ=नाहीं. भैरव=रागीट, क्रोधी. रागीट नाहींत म्हणजे शांत. १३ लग्न लागलें. १४ प्रजापति कर्दम महामुनी १५ कपिल महामुनी ( सिद्धानां कपिलो मुनिः—श्री. भ. गी. अ. १० श्लो. २६) १६ मुलें. १७ शिखीध्वज राजाची राणी. १८ वशिष्ठ ऋषींची पत्नी. १९ सारख्या. २० ज्यांचें फक्त नांव. २१ क्षम=समर्थ; अघ=पातक, अरि=शत्रु; हननीं=नाहींसें करण्यास=पातकरूपि शत्रूंचें निर्दालन करण्यास यांचें केवळ नाम समर्थ.

३१ आर्या

सुगुणा, सुजना, सुभगा, सति साध्वी सुंदरा सुशीलाऽर्या[1] ॥
अचला[2], अनघा[3], अमला[4], अनसूया अत्रि अंगना[5]ऽचार्या[6] ॥

## अत्रि व अनसूया यांच्या लग्न-पत्रिकेचें अद्वितीयत्व

३२ मालिनी

घटित[7] वधुवरांचें अद्वितीय[8] त्रिलोकीं[9] ॥
मिळति सुगुण छत्तीसैकराशी[10] विलोकीं[11] ॥
[12]म्हणुनिरत सदा जीं[13] प्रेम आनंदजाळीं[14] ।
परि हृदिं[15] शिशुचिंता[16] नित्य चित्तास जाळी[17] ॥

## अनसूयामातांची उद्विग्नता; दुःखनिवेदनश्लेषगर्भ भाषण, व तपश्चर्येकरितां पर्वतावर जाण्यास अत्रिऋषींना प्रेमाची विनंती

३३ पद ( उद्धवा शांतवन० या चालीवर )

वल्लभा शांत मन करुनी । परिसावी माझी विनती ॥
प्रार्थिते हस्त जोडोनी । दासींची चरणीं प्रणती[18] ॥ ध्रु० ॥
तुम्हि प्रजापति[19] ऐसी ख्याति[20] । परि संज्ञा[21] सार्थ[22] न दिसती ॥

---

१ श्रेष्ठ. २ स्थिरबुद्धीची. ३ निष्पाप. ४ निर्मल. ५ स्त्री. ६ उपदेश करण्य योग्य. ७ लग्नपत्रिका. ८ असाधारण. ९ त्रैलोक्यांत. १० एक राशि. ११ पह १२ मग्न. १३ तीं दोघें. १४ जाळ्यांत. १५ अंतःकरणांत. १६ पुत्र. १७ जाळीत असे. १८ नमस्कार. १९ प्रजा उत्पन्न करणारे. २० कीर्ति. २१ पदवी, नाव २२ खरे, अर्थपूर्ण.

306

संततीविण तुमची युवती[1] । जन सारे तुम्हा हसती ॥ २ ॥
ज्या पुत्रवती कीं युवती । त्या मजला वंध्या[2] म्हणती ॥ ३ ॥
हे बोल शल्यासम[3] खुपती । परि खंति न तुमचे चित्तीं ॥४॥
चालः—हे बोल कितीतरी सोहूं[4] । प्रियकरा हिमाचीं[5] जाऊं ॥
दृढ[6] तपें प्रभूला आळवूं
चालः—करुणाघनें[7] विभु तैं[8] सन्मुख[9] येती वर्षति[10] येती वर्षति॥
मग [11]कलंक-मल धुवुनी जाती ॥ ५ ॥ वल्लभा शांत ॥

## अनसूया माता तपश्चर्येस जाण्याचें कारण सांगतात

३४ ओंवी

पैं सृष्टीचिया उपक्रमा[12] । पूर्वीं गा वीरोत्तमा[13] ।
वेडा ऐसा ब्रह्मा[14] । एकला होता ॥ ३२६ ॥

३५ ओंवी

मज इश्वरातें नोळखे । ना सृष्टी ही करूं न शके
तो थोरू केला एकें । नामें[15] येणें ॥ ३२७ ॥

श्रीज्ञानेश्वरी अ. १७ ओं. ३२६-३७

## अनसूया मातांची समजूत व त्यांच्या म्हणण्यास अत्रींची संमति.

३६ दिंडी

प्रिये प्राणेश्वरि खिन्न नको होऊं । अद्रि राजा[16]च्या उच्च शिखरिं जाऊं ॥

---

१ बायको. २ वांझ. ३ काट्याप्रमाणें. ४ सहन करूं. ५ हिमालयावर. ६ घोर. ७ करुणारूपि पाण्यानें भरलेला मेघ. ८ त्या वेळीं. ९ समोर. १० वर्षाव करील. ११ कलंक=डाग; मल चिखल. आपल्या कपाळावरील डागरूपि चिखल. १२ प्रारंभाचे वेळीं. १३ अर्जुना वीरश्रेष्ठा. १४ ब्रह्मदेव. १५ फक्त देवाच्या एका नांवानें म्हणजे तपश्चर्येनें. १६ हिमालयाच्या.

वृक्षमूलीं पाषाणतली[1] राहूं । तांप,[2] वृष्टी,[3] अति शीतें[4] सुखें साहूं ॥

३७ दिंडी

पिऊं निर्झर[5] जल कंदमुळें खाऊं । तपाचरणें जगदीशचरण सेवूं ॥
[6]ईशविस्मृत्यपराध पदरिं[7] घेऊं । देवकृपया लोकांना[8] धुवुनि दावूं ॥

उभयतां अत्री व अनसूया माता तपश्चर्येस जातात

३८ घनाक्षरी

उभयहि गेली ऋक्षशृंगा[9] । आळवूनी श्री रुक्मिणिरंगा[10]
असंगसंगा,[11] भवभयभंगा[12] । वश करूनी घेती ॥

दत्तगुरूंचा योगिराजनामक प्रथमावतार.

३९ आर्या

तपसामर्थ्यें [13]आदिम दत्तगुरूयोगिराज अवतरले
सन्मुख दोघांपरी ते स्त्रीगर्भजशिशुसुखासि[14] अंतरले[15] ॥

## दर्शनापासून आनंदाऐवजीं अत्रींस असमाधान मात्र वाटलें.

४० शार्दूलविक्रीडित

[16]स्फाटीकी तव रम्य मूर्ति बघुनीवाटे समाधान ना ॥
राहे मच्छुभ पुण्य पत्नि जठरीं[17] यावत्[18] सुताधान[19] ना ॥

---

१ दगड. २ ऊन. ३ पाऊस. ४ थंडी. ५ झऱ्याचें पाणी. ६ ईश्वरास विसरण्याचा अपराध गुन्हा, प्रमाद. ७ कबूल करूं. ८ जगाला. ९ ऋक्षा नांवाच्या शिखरावर. १० पांडुरंग, विष्णु. ११ असंग=वैराग्य; संग=संगती=वैराग्य आहे संगतीला ज्याच्या, अशा वैराग्यशील पुरुषाचा सोबती. १२ भव=संसारभय=भीति, भंग=नाश=संसार भयाचा नाश करणारा. १३ प्रथम. १४ स्त्री=बायको, गर्भज= गर्भापासून उत्पन्न झालेला; शिशु=मुलगा=स्वतःच्या बायकोच्या गर्भापासून झालेल्या पुत्रसुखास. १५ मुकले=या दर्शनानें त्यांना प्रत्यक्ष पुत्रसुख मिळालें नाहीं. १६ स्फटिका प्रमाणें तेजस्वी. १७ पोटीं. १८ जोंपर्यंत. १९ पुत्रगर्भ.

307

दुग्धेच्छा कशि तृप्त होईल वदे अंप्पिष्ट[1] संमिश्रणें[2] ॥
किंवा कांच करील काय मनिषा[3] पूर्ती[4] मण्यां[5] कारणें ॥

## अनसूया मातेला आनंदाऐवजी संताप

४१ पद

किति किति किति कपट करिशि कुटिल[6] केशवा ॥
मधु मधु मधु मधुर मु[7]खर मलिन[8] माधवा ॥
रम रम रम रमसि रहसि[9] रुदसि[10] राघवा ॥
वद वद वद विमल[11] वचन विफलवैभवा[12] ॥

## दोघेंही रागावून पण निराश न होतां पुन्हा अति घोर तप करितात.

४२ पद. ठुमरी ( जलभरन जात या चालीवर )

जाणुन देत, न सत्फल केशव[13] कल्पतरू किल कल्पित[14] काले ॥
त्या रुषिता ऋषिदंपतिनीं मुहू[15] वर्षशतोग्र[16] तपा तपियेले[17] ॥
त्याच गिरिवर[18] त्याच शिखावरि[19] पुण्यजलें परमाख्य[20] सुतीर्थी ॥
कृच्छ्रबलें[21] मग अत्रि शिरांतुनि[22] भीषण तेज निघे परमार्थी[23] ॥

## घोर तपाचा परिणाम

४३ शालिनी

ना त्रैलोक्या चंड[24] तें तेज साहे । त्रैमूर्तींच्या[25] संश्रया[26] विश्व पाहे ॥

---

१ अप्=पाणी, पिष्ट=पीठ. २ उत्तम मिश्रण. ३ इच्छा. ४ पूर्ण. ५ रत्नाची. ६ अप्रामाणिक. ७ बोलका, वाचाळ. ८ दुरात्मा, पातकी. ९ एकांतांत. १० रडतोस. ११ खरे. १२ व्यर्थ ऐश्वर्य. १३ परमात्मा कल्पवृक्ष. १४ निश्चित. १५ पुन्हा. १६ शंभर वर्षे उग्र तप. १७ केले. १८ पर्वतावर. १९ शिखरावर. २० परम नांवाच्या. २१ तपाच्या शक्तीनें. २२ भयंकर. २३ परमात्मप्राप्ति करुन देणारे, परमात्मरूप पुत्रप्राप्ति करुन देणारे. २४ भयंक. २५ ब्रम्हा, विष्णु, महेश. २६ आश्रयाकरितां.

[1]नाभीकारा देउनी [2]त्यासि, गेले । [3]ब्रम्हाजेशा अत्रिच्या [4]पर्णशाले ॥

## अत्रींचा त्रैमूर्तीस प्रश्न

### ४४ साकी

करीत असतां ध्यान निरंतर श्री एकचि देवाचें ॥
कोण तुम्ही कां तिथे आला ? हें सांगा आपुल्या शुभ वाचें ॥
विस्मित होउनी, अत्री पुसती कर जोडुनी ॥

## अत्रींच्या प्रश्नास त्रैमूर्तींचें उत्तर

### ४५ पद ( प्रीति जी दुजावर मोठी० या चालीवर )

ज्यां[5] एका चिंतिसि[6] चित्तीं । तोचि एक आम्ही निभ्रांती[7] ॥ मुनिवरा ।ध्रु.
जगिं एकचि वायु असतो । परि देहीं दशविध[8] बनतो ॥ मुनिवरा ॥ १ ॥
उत्पत्ति[9] स्थिति[10] लयं[11] [12]कार्यां। आम्हि एकचि त्रित्वें[13] नटतों॥ मुनिवरा,॥२
चाल--आम्हि जरी तिघे। भेद[14] ना रिघे । द्वैत[15] तूं न घे॥-धरुनि मनिं शांती।
धरुनि मनिं शांति । तूं ध्यायि एकचि एक एकांतीं ॥ मुनिवरा ॥ ज्यां ॥ ३

नंतर ह्या त्रिमूर्ति अत्रीवरद नामक दत्तगुरूंचा दुसरा
अवतार घेऊन अत्रि व अनसूया माता यांच्यापुढें
उभे राहून वर मागा म्हणून सांगतात.

### ४६ कटाव

ऐसें देवत्रय तें वदलें, वदुनी अंतर्धान पावलें, पावुनि मग त्या
ती र्तीनी एकामाजी विलीन होउनि पुनरपि बनुनी एकचि मूर्ती, तसें[16]

---

१ अभयाला. २ विश्वाला. ३ ब्रम्हदेव. अज=विष्णु, ईश=महादेव. ४ पानांची झोपडी.
५ एका देवाचें. ६ चिंतन करतास. ७ निसंशय. ८ दहा प्रकार. ९ उत्पन्न करणें
१० पालन करणें. ११ संहार करणें. १२ कामाकरितां. १३ तीन प्रकारें. १४ फरक.
१५ दुजाभाव. १६ तापलेल्या सोन्यांच्या कांतीप्रमाणें.

308

कनकरुचि, नील मणिश्री[1] नक्षत्रासम कायाकांती[2] शमच्छांती[3] सत्सं
पत्ती,[4] मंदस्मितमुखें[5] विश्वविरक्ती, माणिकमाला[6] कांतकमंडलु[7] डाम
डमरू, त्रिशूल त्रिगुणी[9] चक्र चकाकी,[10] कंबु[11] केतकी, एवंगुण अयुधान्वित[12]
षडभुज,[13] जगसंरक्षक मंडित दक्षिण[14] अंग विलक्षण. त्रिमाह विभ्रम
विध्वंसक[15] वर,[16] वामांग[17] विमलें[18] विभु[19] साक्षाद्दत्तगुरु श्री अत्रीवरद
द्वितीय, अवतार घेऊनी, प्रगट होउनी ऋषिदंपतिच्या येउनी पुढती, उभे
राहती, म्हणती रे रे दंपति सिंहा, प्रचंड तुमची तप संपत्ती पाहुनि भुललों.
प्रसन्न झालों, त्रैलोक्यामधि, दुर्लभ वर जो मागा मागा, देत तुम्हां तो ।
प्रेमे वंदावा ॥ जगवंचक तो, जगदुद्धारक तो, अत्रीवरद प्रभु तो ॥१॥

### अत्रीवरदांच्या दर्शनानें अत्रींचें समाधान झालें नाहीं, पण दत्तगुरूंच्या आग्रहास्तव त्यांनीं वर मागून घेतला.

#### ४७ मंदाक्रांता

[20]देवोक्तीला, परिसुनि मुनी, पाहुनी आदरानें ॥
[21]वामांगीच्या [22]वदन विधुला, प्रेम उत्सुकतेनें ॥
प्रार्थी ईशा[23] जरि तुम्हि वरा देतसा हो आम्हातें ॥
द्यावा तुम्हांसम[24] सुतम[25]णी उद्धरी जो जगातें ॥

---

१ नील रत्नाचे शोभेप्रमाणें. २ शरीर ३ अखंड शांती. ४ सत्य हेंच धन ५ गालांतल्या गालांत हसणें. ६ माणिक रत्नाची माळ. ७ सुंदर. ८ सुरेख. ९ सत्व रज-तम दाखविणारा. १० चकाकणारें. ११ शंख. १२ शस्त्रासहित १३ सहा हात १४ उजवा. १५ नाश करणारा. १६ श्रेष्ठ. १७ डावे अंग. १८ शुद्ध. १९ परमात्मा २० अत्रीवरदांच्या मुखांतून निघालेल्या वाणीला. २१ अर्धांगी, स्त्री. वाम=सुंदर आहे अंग=शरीर जिचें ती=स्त्री. २२ वदन=मुख, तोंड, चेहरा; विधु=चंद्र=चंद्रासारखें मुख आहे जिचें तिजकडे. २३ अत्रीवरद प्रभुला. २४ तुमच्यासारखा. ५२ पुत्ररत्न.

अत्रिवरदांच्या दर्शनानें अनसूयामातेला उलट जास्त संताप झाला.

४८ पद (व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं० या चालीवर )

निष्फल जाहलीं चंडें तपें ॥ धृ० ॥

कवणासाठीं षड्भुज रुपडें ?। कपट तुझें न छुपे । अरे देवा कपट०॥१॥
भरलें[1] मंदस्मित तव जेहरें[2]। जगिं न कदापि लपे । अरे देवा जगिं ॥ २ ॥
नैटनं[3] शाठ्यं[4] शीलें[5] तुझें हें । मम हृदिं[6] फार खुपे । अरे देवा मम ॥ ३ ॥

अत्री अनसूयामातेची पुन्हा समजूत करतात.

४९ दिन्डी

परुषं[7] वचनें[8] भामिनी[9] त्या[10] न [11]ताडी । [12]दैन्य रोषा[13] नच ग्रे
न [14]आस सोडी ॥
इष्ट वर तो[15] देत कीं कसें पाहूं । तपः सिद्ध्यै[16] अतिकाल[17] अधिक साहूं॥

दत्तगुरूंनीं तृतीय दत्त अवतार घेऊन बालरूप धारण केलें.

५० घनाक्षरी

[18]कठोर [19]तपसा मोहुनि गेलों । मी मज तुम्हा स्वयं[20]च दिधलों[21] ॥
अधीन[22] होउनि बाल जहालों । इच्छेस्तव तुमच्या ॥

त्या बालरूप दत्तदर्शनानें समाधान न होतां इतके जरी शांत तरी
अत्रींना फारच वाईट वाटलें व तेही रागावले.

---

१ घोर, भयंकर. २ विषानें. ३ नटणें. अवतार घेणें. ४ शठपणा, लुच्चेगिरी करणें. ५ स्वभाव, धंदा. ६ अंतःकरणांत. ७ कठीण. ८ शब्दांनीं. ९ रागानें लाल झालेले स्त्रिये. १० त्या परमात्म्याला. ११ प्रहार करूं नको, मारूं नको. १२ विचारदरिद्र, खिन्नता. १३ राग. १४ आशा. १५ तो परमात्मा. १६ तपाची सिद्धि होण्याकरतां. १७ उशीर, जास्त उशीर. १८ घोर, भयंकर. १९ तपानें. २० स्वतःलाच २१ देऊन टाकलें आहे. २२ तुमच्या स्वाधीन.

५१ साकी

पाहुनि मोहक बाल [1]दिगंबर दत्तरूप मुनि शिणला[2]
म्हणे न ऐसा औरस सुत जंव मिळे, न सोडूं[3] कुच्छाला[4] ॥
चल उठि प्रिय दयिते[5] । आचरूं भीम[6] तपा परतें[7] ॥

या बालरूप दत्तदर्शन हुलकावणीनें अनुसूया मातांच्या संतापाची तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली.

**५२ पद** (आतां बघ जाते, आतां बघ जाते० या चालीवर)

ठका यदुराया, ठका यदुराया । कां शिणविशि माझी काया ॥धृ॥
ठकविशि अनुदिनि कितीतरि बाया । शिशुविण सुकविशि त्यांची काया
धाडिसि त्यांना वन सेवाया । मिरविशि प्रभुपण वाया ॥ कां शिण ॥१॥
ब्रह्मा[10] तव पद सेवक देवा । निर्मित निशिदिनिं[9] अगणित जीवा ॥
लक्षवरी तव गृहिं शिशु ठेवा[11] । शिशु दुष्काळ आम्हा ध्याया ॥कां शिण॥२॥
मुनिवर अत्रिऋषींची जाया । कर्दम देवहुतींची तनया ॥
कपिल महामुनि बंधूराया । मी पतिव्रता अनसूया ॥ कां शिणविशि ॥३॥

तुझ्यासारख्या शिफारसी आमच्याजवळ पुष्कळ आहेत; पण त्यांना विचारतो कोण ? असें यदुरायप्रभु अनसूयामातेला म्हणाले.

५३ ओवी

घरीं चाले ज्ञानेश्वरी । [12]गृहिणी संसार चिन्ता करी ॥
अ[13]मर-सिंह मरणाघरीं[14] । लक्ष्मी[15] वेंचीत गोंवऱ्या॥

---

१ नग्न, नागवें. २ वाईट वाटलें व राग आला. ३ आम्हीं सोडणार नाहीं. ४ तपाला तप करण्याचें (सोडणार नाहीं). ५ प्रिये. ६ भयंकर ७ पुन्हा. ८ लुच्चा, फसव्या, दुष्टबुद्धे, दुरात्मा, खला. ९ दररोज. १० ब्रह्मदेव. ११ संचय, सांठा. १२ बायको. १३ अमर=देव; सिंह=श्रेष्ठ=इंद्र किंवा मरण नाहीं ज्याला, त्यांत श्रेष्ठ असें नुसतें नांव. १४ यमाच्या घरीं=मरतो, यमसदनास जातो. १५ फक्त लक्ष्मी हें नांव. नांवाची लक्ष्मी-खरी नाहीं.=असल्या नुसत्या नांवाच्या शिफारसी काय कामाच्या ?

५४ अनुष्टुभ्

यस्य माता पिता सिंधुः । बंधुर्यस्य सुधाकर :
इंदिरा भगिनी यस्य । आचुत्तः कमलापति : ॥

५५ अनुष्टुभ्

कामधेनो : पय : पानं । नित्यं पीयूष भोजनम् ॥
तथापि भ्राम्यति पृष्टे । जंगमस्य सदा दर :

वरील दृष्टांत देऊन देवांनीं आपली थट्टा केली असें पाहून अनसूया मातेच्या अंगाची संतापानें लाही लाही झाली व तुला माझ्या पोटीं जन्म घ्यावयास लावीन व माझ्या पायां पडावयास लावीन अशी त्यांनीं प्रतिज्ञा करून देवास तंबी दिली.

५६ पद ( मागील पुढें चालू )

प्रसन्न करुनी घेइन श्रीहरि । दाविन तपशक्तीची थोरी ॥
तुरि देइन रे तव हस्तावरी । घेइन शि[1]शु जग ताराया ॥ कां शिण ॥४॥
[2]कारागृहिं तुज, [3]डांडिन जठरीं । कोंडिन गर्भा[4]शयं [5]तमकुहरीं ॥
पच[6]चिन मलमू[7]त्राग्नी भीत[8]रि । कृमि[9] येतिल तनु[10] तोडाया । कां शिण ॥५॥
शिक्षा देइन नव मासांची । मुंडी[11] घालिन करिं[12] पदिं[13] साची ॥
कबुली घेइन अपराधांची । बाहिर अणुनी पडविन पाया ॥ कां शिण ॥६॥

पूर्वीं दोन वेळां केलेल्या तपापेक्षां या वेळीं पुन्हा अति भयंकर तप करूं व तो देव औरस पुत्र कसा देत नाहीं तें पाहूं असें अनसूया माता अत्रींना म्हणाल्या.

---

१ मुलगा. २ कैदखान्यांत. ३ पोटांत. ४ गर्भाच्या पिशवींत. ५ अंधारकोठडी. ६ उकडून काढित. ७ विष्ठ, मूत्र व अग्नि. ८ आंत. ९ किडे. १० शरीर. ११ डोकें. १२ हातांत. १३ पायांत.

५७ दिंडी

एक पायावर देहभार[1] वाहूं। लोहपिष्टाशन[2] शरदिं[3] जलें राहूं ॥
ग्रीष्मि[4] पंचाग्नी,[5] प्रावृषीं[6] वृष्टि[7] साहूं। कसा नच दे हरि कृच्छ्रफला[8] पाहूं ॥

अनसूयामातांच्या म्हणण्यास रुकार देऊन अत्रि ऋषि आपल्या घरींच अत्यंत भयंकर तप करूं लागले.

५८ प्रहर्षिणी वृत्तम्

प्रारब्धं कठिनतरं तपः प्रतप्तुं। स्वागारे पुनरपि चर्षि दंपतीभ्याम् ।
उद्भूतो मुनिवर मस्तकेऽपि काले। कालाग्निः प्रखरतरोह्यसह्यतेजः ॥

**अर्थः**—त्या ऋषिदंपतींनी पुन्हा आपल्या पर्णकुटिकेंतच ( घरीं ) अत्यंत भयंकर तप ( तिसरे वेळीं ) करण्यास सुरवात केली. नंतर कांहीं कालांनीं मुनिश्रेष्ठ अत्रींच्या मस्तकांत सहन करण्यास अशक्य व अत्यंत दाहकारक असा कालाग्नी ( कालाचा, यमाचा नाश करणारा ) उत्पन्न झाला.

तपापासून उत्पन्न झालेल्या अग्नीचा परिणाम.
अत्रींच्या प्राणावर संकट.

५९ पद. ( होइल कलह म्हणोनी० या चालीवर )

कृच्छ्रे[9] सुचे नच कांते। सर्वांगाची लाही होते ॥ कृच्छ्र सुचे ॥ धृ० ॥
वृश्चिक[10] दंश प्रबल[11] वेदना[12]। प्रलयां[13]ग्नीच्या प्रखर[14] यातना ॥

---

१ शरीराचें ओझें. २ लोखंडाच्या पिठाचें भोजन. ३ हिंवाळ्यांत. ४ उन्हाळ्यांत. ५ चार बाजूस चार अग्निकुंडें पेटविलेलीं व डोक्यावर प्रखर सूर्य. ६ पावसाळ्यांत. ७ पाऊस. ८ तपफल=औरस पुत्र. ९ तप. १० विंचू. ११ कठीण. १२ शिणका. १३ जगाचा नाश होण्याच्या वेळचा अग्नि. १४ भयंकर दाहक.

होती मम जीवाते । साहूं कैशा ? वाटे आतां, जातिल प्राण लयांते[1]
॥ कृच्छ्र ॥ १ ॥

अनसूयामाता देवाचा धावा करतात.

६० पद. ( कवणे तुज गांजियलें० या चालीवर )

धाव धाव पवन[2] जवें[3] दत्त श्रीहरी । प्राणेश्वर प्राण रक्षि विघ्न
तूं हरी ॥ ध्रु० ॥

ताडियलें कटुकवचें[4] रोषें[5] ना धरी । केले अपराध बहू, तूं क्षमा
करी । धांव ॥ १ ॥

परमात्मा स्वतःच वायु व मेघ बनून अत्रींच्या शरीरांत
शिरून त्यांचा दाह शांत करतात व अत्रींच्या
नेत्रांतून एक दिव्य व भयंकर तेज
बाहेर पडतें.

पद ६१ ( जलभरन जात जमुनाके घाट० या ठुंबरीचे चालीवर )

शीतल, मंद, सुगंध समीरण[6], करुणामृत[7] घन[8] श्रीहरि बनले ॥ ध्रु० ॥
मुनितप[9] दावा[10]नल शमनार्थ[11] वृष्टी करण्या ऋषिहृदिं शिरले ॥ १ ॥
प्रशांत, प्रमुदित, प्रसन्न होउनी सकामतेनें अति अवलीलें[12] ॥ २ ॥
ऋतुमति, रूपवती, रुचिरा[13] गति कामिनी मुख मुनि अवलोकियले ३
तत्क्षणिं दिव्य सुतेज भयंकर मुनी नयनांतुनि बाहिर पडलें ॥ ४ ॥

तें तेज पाहिल्याबरोबर अनसूया मातांना अत्यानंद झाला. यांनीं तें तेज वरच्यावर झेलून आपल्या पोटांत सांठवून ठेविलें.

६२ पद ( उद्धवा शांतवन कर जा० या चालीवर )

तें तेज पाहुनी झाली । ऋषिसुंदरी[14] हर्षित[15] भारी ॥ ध्रु ॥
करि कोण सहन जगिं बोले । अत्यद्भुत याचीं थोरी[16] १

१ नाहींसे होतील. २ वारा. ३ वेग. ४ कडू, कठीण शब्दांनीं. ५ राग. ६ वारा. ७ पाणी. ८ मेघ. ९ दाह. १० वणवा. ११ विझवण्याकरितां. १२ सहज, लीलेनें. १३ सुंदर. १४ स्त्री. १५ आनंदित. १६ सामर्थ्य.

जाळील विश्व हें आतां । विश्वासी न दिसे त्राता[1] २
विधि[2] हरीहरांच्या कांता[3] । शकती त्या[4] स्पर्श न करतां ३
जाहल्या विगलित[5] अहंता[6] । भीत्या[7] निज[8] कवळिति कांता[9] ४
चालः—विश्वाची कींव[10] बहु आली । विश्वोदरि[11] जगदंबा उठली ।
तें तेज वरचेवर झेली
चालः—झेलूनि अनसूया साध्वि आपुल्या [12]जठरीं । आपुल्या जठरीं ।
जशी [13]नीलकंठ—अश्रु[14] ती [15]मयुरी ॥ तें तेज ॥ ५ ॥

त्या तेजापासून अनसूया माता गरोदर राहतात.

६३ शार्दूलविक्रीडित

अत्रींची [16]रमणी [17]अतर्क्य करणी[18] साध्वींत चूडामणी[19]
राहे गर्भिणि तत्क्षणीं [20]शिखरिणी नक्षत्रि तारामणी[21]
[22]तेजोगर्भ [23]विवर्धिनी [24]अनुदिनीं जी अत्रि कंठामणी[25]
होती [26]दोहद तीस जी प्रसविणी सद्भक्तचिंतामणी[27]

---

१ वाला, रक्षण करणार. २ ब्रह्मदेव, विष्णु, व शंकर. ३ बायका. ४ तेजाला. ५ गळालेला. ६ अभिमान, गर्व. ७ भयानें. ८ आपल्या. ९ नवऱ्यांना. १० दया. ११ विश्व हेंच पोट आहे जिचें. १२ पोटांत. १३ मोर. १४ आंसवें. १५ लांडोर. प्रभु रामरायांच्या शापामुळें मोरास नपुंसकत्व आलें; परंतु मोर व लांडोर यांच्या प्रार्थनेवरून त्यांना नेत्रवीर्यापासून म्हणजे डोळ्यांतील असवांपासून गर्भ राहून संतति होईल असा उश्शाप मिळाला; तो खालीलप्रमाणेः-मज दुःखिताते देखतां। दोघें नाचती उन्मत्तता । तुज येईल नपूंसकता । अंग संगता तुम्हां न घडे ॥ ८८ ॥ ऐकोनिया शाप वचन । मयूर विनवी अति दीन । मयुरीनें धरिले चरण । शापमोचन श्रीराम वदे ॥ ८९ ॥ सीतेचे वियोगे जाण दुःखी होसी तूं रघुनंदन । आम्हा पक्षियांचा पाड कोण । दुःख दारुण पहावयासी ॥ ९० ॥ ऐसें ऐकोन मयूर वचन । श्रीराम जाला सुप्रसन्न । नृत्यमान सुखसंपन्न । चक्षुवीर्यें पूर्ण सुख तुम्हा ॥ ९१ ॥ भावार्थरामायण अरण्यकाण्ड, अध्याय. २३ १६ स्त्री. १७ अलौकिक. १८ कृति. १९ सर्व पतिव्रता स्त्रियांत मुख्य. २० उत्तम स्त्री. २१ चंद्र. २२ तेजरूपि गर्भ. २३ वाढविणारी. २४ दररोज. २५ गळ्यांतील ताइत. २६ डोहाळे. २७ सद्भक्तांचे मनोरथ परविणारा परमात्मा.

## अनसूयामातांना डोहाळे लागतात.

६४ शिखारणी

नको वाटे वेणी, परि शिरीं जटाभार बरवा ॥
नको वस्त्रें सूत्र[1] त्रिगुण[2] कटि[3] कौपीन[4] भगवा
नको लेणीं[5] यज्ञोपवित[6] ग्रहणा[7] चित्त सरसें[8]
असावें वाटे कीं मजजवळि गोध्वानं[9] सरसे[10] ॥

## अनसूया मातांचे नऊ महिने पूर्ण भरून त्या प्रसूत होतात.

६५ ओंवी

भरले पूर्ण शुभ नव मास ॥ मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीस
रोहिणी नक्षत्र बुधवार दिवस ॥ चतुर्थ याम[11] ते वेळीं ॥

६६ ओंवी

द्वितीय मुहूर्त प्रदोषकाल[12] ॥ अनसूया माउली कुक्षि[13] प्रबळें[14] ॥
श्रीकालाग्निशमन चिद्रत्न[15] बाल ॥ जगदुद्धारा प्रसवली ॥

## पुत्ररत्नमुख पाहून अनसूया माता मोहित होतात. त्याचें चुंबन घेतात, त्याला स्तनपान करतात व त्याला निजविण्याकरितां पाळण्याकडे घेऊन जातात.

६७ पद ( मनमोहन मूर्ति तुझी० या चालीवर )

तव सुप्रभ[16] तनु शकुल्या । मोहित किति नयनाला । मोहित किति
नयनाला । मोहित किती नयनाला ॥ धृ० ॥

---

१ दोरी. २ तीन पदरीं. ३ कमरेला ४ लंगोटी. ५ दागिने. ७ धारण करण्यास. ८ धांवतें. ९ गाय व कुत्रें. १० सुंदर. ११ प्रहर. १२ सायंकाळ. १३ कूस १४ दांडगी १५ ज्ञानरत्न. १६ दैदीप्यमान.

312

तृप्त न मुख मम बारे । चुंबु किती तव गाला । चुंबु किती तव गाला
चुंबु किती । तव गाला ॥ १॥
वक्षोरुहं उचबळले[1] । करि करि स्तन पानाला[2] । करि करि
स्तन पानाला ॥ करि करि स्तन पानाला ॥
आद्य तत्वं[3] तूं पहिलें । परि मा[4] मज मानियले । परि मा मज
मानियले ॥ ३ ॥
पुरवी मम कोडँ[5] मुला । नेतें तुज शयनाला । नेतें तुज शयनाला ।
नेतें तुज । शयनाला ॥ ४ ॥

## प्रभुदोला ( पाळणा )

( अजि अक्रुर हा० या चालीवर )

### प्रभूला पाळण्यांत घालणें; पाळणा म्हणणें व हालविणें.

संविश संविश रे । बालशिशो परमात्मन् ।
आंदोलयामि दोल्यां त्वाम् ॥ध्रु०॥
मा मा मा रोदीः । गूहरत्न त्रिगुणात्मन् ।
इह तिष्ठति भीमो जटिलः ॥ १ ॥
मा मा मा भैषीः । कुलभूषण जगदात्मन् । गायामि स्वापसंगीतम् ॥२॥
कालानलशमनः । प्रियवत्सक ते संज्ञा । तुर्यस्ते शुचिरवतारः ॥३॥
तव वपुरतिकांतं । पेलवममलं दृष्ट्वा । रतिपति रपि जिन्हेत्यंतम् ॥४॥
सद्यः क्षयी शशी । भूतः संपूर्णस्ते । संदृश्याननरुचिमतुलाम् ॥ ५ ॥
त्रिगुणातीतः सन् । अवतरसि मम कुक्षौ । जाने मे सफलं जननम् ॥६॥
श्रुत्वा श्रुतिमधुरं । जगदंबा गीतं गीतं । वीक्ष्यत्वामीक्षणसुभगम् ॥७॥

---

१ स्तन. २ वाहूं लागलें. ३ मूळ वस्तु=परमात्मा. ४ आई. ५ कौतिक, लाड.

सच्चिन्मोदघनं । बालं कारुण्यार्द्रं । नवमंगलमंदिरनभसि ॥ ८ ॥
नृत्यति बालशिखी । दत्तगुरो सानंदं । बालेशं नत्वा सततम् ॥ ९ ॥

**अर्थः**—हे बालरूप धारण केलेल्या पुत्र परमात्मा, निज रे, निज, निज रे निज. तुला पाळण्यांत घालून झोके देतें. हें घर शोभिवंत करणाऱ्या सगुण बालरत्ना, रडूं नको, रडूं नको, रडूं नको बरं. इथं एक भयंकर झिज्या पसरलेला बागुलबुवा उभा आहे. हे कुळभूषण जगदात्मा, भिऊं नको, भिऊं नको, भिउं नको बरं, मी तुला झोंपेची सुंदर गाणीं म्हणतें. माझ्या लाडक्या बाळा, तुझा शुद्ध चवथा अवतार असून तुझें नांव कालाग्निशमन आहे. तुझे शरीर अति सुंदर, कोमल, व स्वच्छ पाहून रतिपति मदनाला सुद्धा अत्यंत लज्जेनें मान खालीं घालावी लागते. पौर्णिमेच्या (षोडश कलांनीं युक्त) चंद्रास तर तुझ्या मुखाची अद्वितीय कांति पाहून तावडतोब क्षयरोगच लागला ! तूं त्रिगुणाच्या पलीकडे असून माझ्या कुशींत (पोटीं) अवतार घेत-लास म्हणून माझें जन्माचें सार्थक झालें असें मी समजतें. याप्रमाणें जग दंबा अनसूयामातांनीं कानास गोड लागणारें गाइलेलें गाणें ऐकून व डोळ्यास आनंद होणाऱ्या अशा करुण रसानें ओथंबलेल्या सच्चिदानंद बाल मेघ, आपणांला या पुण्य, नवीन मंदिररूपि आकाशांत पाहून हे दत्तगुरो, आपण जें बालरूप धारण केलेले परमात्मा, त्या आपल्यास निरंतर नमन करून हा बालमयूर आनंदानें नाचत आहे. ( प्रसाद म्हणून पंचामृत वांटणें. )

उत्तररंग समाप्त.

आख्यान समाप्त.

## तात्पर्य, शेवटची प्रार्थना, आरती व कर्मब्रह्मार्पण.

ज्याप्रमाणें अनसूयामातांनीं तपःसामर्थ्यानें, पातिव्रत्यप्रभावानें, श्रद्धेनें, धैर्यानें, चिकाटीनें व दमानें प्रत्यक्ष परमात्मासही वठणीस आणून, त्यास आपल्या पोटीं अवतार घ्यावयास लावून जगदुद्धारक अद्वितीय औरस पुत्ररत्नाची प्राप्ति करून घेतली, त्याप्रमाणें आपल्या मायभगिनींनीं पातिव्रत्याचें संरक्षण करून निर्गुण परमात्माचे सगुणावतार चालतेबोलते संत सद्गुरु यांची निस्सीम व एकनिष्ठ सेवा केली, तर अपल्या समाजांत ही निःसंशय विश्वहितकारी अद्वितीय नररत्नें निर्माण होऊन स्वतःस, आपल्या मातापितरांस व आपल्या राष्ट्रास उद्धरून नेतील. म्हणून

६९ अभंग. ( प्रथम नमनांत म्हटलेला )

शरण साई चरणीं गेला। त्यानें भवबंध तोडीला॥ त्यानें॥ ध्रु० ॥
हाणि काळासी तो लाथा। काळ ठेवी तत्पदिं माथा॥ काळ॥ १॥
ऐसा संतांचा अधिकार। साइ संतांचें सरकार॥ साइ॥ २॥
करुं सरकारा मूजरे। आपण चरणाचे हूजरे॥ आपण॥ ३॥
नलगे गुप्त मुक्ती ठेवा। अन्य भक्तांना तो द्यावा॥ अन्य॥ ४॥
बाळ प्रार्थी नित्य मेवा। देई तव पद भक्ति सेवा॥ ५॥

७० अभंग

हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥
गुण गाईन आवडी। हेची माझी सर्व जोडी॥
नलगे मुक्ती धन संपदा। संत संग देई सदा॥
तुका म्हणे गर्भवासी। सुखें घालावें आम्हासी॥

७१ आरती साइबाबांची.

आरती साइबाबा । सौख्य दातार जीवा । चरण रजा तळीं निजदासा
विसावा ॥ दासा विसावा ॥ आरति ॥ धृ० ॥

जाळुनिया अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग । मुमूक्षुजनां दावी निज डोळा
श्रीरंग ॥ डोळा श्रीरंग ॥ आरति ॥ १ ॥

जया मनि जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना ।
ऐसी तुझी हि माव ॥ तुझी ही माव ॥ आरति ॥ २ ॥

तुमचें नाम ध्यातां । हरे संस्तृती व्यथा । अगाध तव करणी ।
मार्ग दाविशि अनाथा ॥ आरति ॥ ३ ॥

कलियुगिं अवतार । सगुणब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे ।
स्वामि दत्त दिगंबर ॥ दत्तदिगंबर ॥ आरति ४ ॥

आठा दिसा गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया ।
भवभय निवारी । भय निवारी ॥ आरति ॥ ५ ॥

माझा निज द्रव्य ठेवा । तव चरणरजसेवा । मागणें हेंचि असे ।
तुम्हा देवाधिदेवा । देवाधिदेवा ॥ आरति ॥ ६ ॥

इच्छीत दीन चातक । निर्मळ तोय निज सुख । पाजावें माधवा ।
संभाळ आपुली भाक । आपुली भाक ॥ आरति. ॥ ७ ॥

७२ आरति ज्ञानेश्वरमहाराजांची

आरती ज्ञान राजा । महा कैवल्य तेजा । सेविति साधुसंत । मनु
वेधला माझा । वेधला माझा । आरति ॥ धृ० ॥

लोपलें ज्ञान जगीं । हित नेणति कोणी । अवतार पांडुरंग ।
नांव ठेविलें ज्ञानीं । ठेविलें ज्ञानी ॥ आरति ॥ १ ॥ प्रगट गुह्य बोले ।

विश्व ब्रह्मचि केलें ॥ रामा जनार्दनी । पायिं मस्तक ठेविलें। मस्तक ठेविलें ॥ आरति ॥ २ ॥

### ७३ आरती श्रीदत्तप्रभूची

काषायांबर खंड सुनिर्मित कौपीनं। दंडकमंडलु मंडनमंडितमूर्धानम् रिपुमंडल मदखंडन पंडित विज्ञानम् । योग कला कलिताखिलत्वं पद महिमानम् । जयदेव जयदेव जय यतियूथपते । मामुद्धर नरसिंहसरस्वति विमलमते ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥ पद्मासन विजयश्री सेवित पादाग्रम् । अर्धोन्मीलितनयन निरीक्षित नासाग्रम् । प्रणवांत प्रतिपाद्य स्वानुभवैकाग्र्यम् । जगदुद्धामनिधामनि जगदीक्षाव्यग्रम् ॥ जयदेव ॥२॥ हरिकीर्तन समयाधृत वैकुंठ निवासम् ॥ पंचीकरण महावागुपदेशविलासम् । निजनैगम महिमामृतवंतं चिद्धासम् । वंदे रुक्म सुतार्चित पादुक भविनाशम् ॥ जयदेव ॥ ३ ॥

### ७४ अभंग

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनीं पाहिन रूप तुझें ॥
प्रेमें अलींगिन आनंदें पूजिन । भावें ओवाळिन म्हणे नामा ॥

### ७५ उपजाति

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मनावा प्रकृति स्वभावात् ॥
करोमि यद्यत्सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयामि ॥

### ७६ स्रग्विणी वृत्तम्

अच्युतं केशवं रामनारायणम् । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभम् । जानकी नायकं रामचंद्रं भजे ॥

### ७७ अनुष्टुभ् वृत्तम्

हरे राम हरे राम रामराम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्तमहाराज की जय
" " " ज्ञानेश्वर महाराज " "
" " " साइनाथ महाराज " "
" " " सर्व साधुसंत महाराज "

ही श्रीकालाग्निशमन साइ-दत्तजन्म-कथाख्यान पद्यसुमनावलि सद्भावाच्या ओंजळींत भरून विश्वरूप, विश्ववंद्य, श्रीसच्चिदानंद समर्थ सद्गुरु साइदत्तमाउलीच्या पुण्य-पवित्र पदयुगुलीं अंतःकरणपूर्वक अत्यादरानें, व अनन्यभावानें व नितांतप्रेमभक्तीनें सविनय अनंत प्रणिपातपुरस्सर समर्पण असो.

ठाणें,
मिति श्रावण कृ. ११, गुरुवार,
शके १८५६, भावनाम संवत्सरे

संतपदरज दासानुदास,
बाबांचें बाळ.

315

चतुर्थावतार दत्तगुरु श्रीकालाग्निशमन

श्रीसाईदत्तजन्म कीर्तनाख्यान समाप्त

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन र्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागद्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें वा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती गर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे हील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक, **श्रीसाईलीला** 36

श्रीसाईलीला

# चतुर्थावतार श्रीकालाग्निशमन

# साईदत्तजन्म कथाख्यान अंक



संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

किंमत २ आणे

317

## श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः

# श्रीदत्तजन्म कीर्तनाख्यान

श्रीयुत श्रीसाईलीला संपादक महाशय यांस सप्रेम कृ. शि. सा. न. वि. वि.

श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट्ट अन्या ऊर्फ बुवासाहेब मोने शिरवळकर यांचें त्रोटक चरित्र आपल्या श्रीसाईलीलेच्या चालू वर्षीच्या २–३–४ या जोड अंकांत प्रसिद्ध झालें आहे. अन्या समाधिस्थ झाल्यास ६३ वर्षे झालीं. त्यांचा फोटो किंवा हातानें काढलेली त्यांची तसबीर कोठें तरी उपलब्ध होईल म्हणून २--३ वर्षे मी सतत श्रम करीत होतों. परंतु व्यर्थ. शेवटीं शिरवळ गांवांतील व माझ्या घरांतील ज्या मंडळींनीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें होतें व जे त्यांच्या डोळ्यांसमोर अजूनही दिसत आहेत, अशा मंडळीकडून अन्यांच्या अंगयष्टीची, चेहऱ्याची, बैठकीची, रंगारूपाची जी विश्वसनीय माहिती मिळाली, त्यावरून त्यांचा फोटो तयार करावा असें मनांत आलें. विविध संत-वृंदापैकीं कोणत्या तरी संतविभूतींत अन्यांचें सादृश्य थोड्या तरी प्रमाणांत मिळेल, अशा समजूतीनें शें दीडशें फोटो जमा केले. परंतु फुकट. आपल्याच साहाय्यानें श्रीक्षेत्र शिर्डी येथील बाबांच्या भक्तांपैकीं थोडें साम्य दिसत असलेल्या कांहीं भक्तांचे फोटो घेतले. परंतु अस्सल वैराग्यशील, पूर्ण ज्ञानी संतास साधारण कोटींतील अज्ञानी यःकश्चित भक्ताचा पेहराव चढवून त्यांना अन्या म्हणणें ही कल्पना माझ्या व आपल्या मनास मुळींच पटेना. त्या-नंतर माझ्या घरीं श्रीपरमहंस भास्करानंद सरस्वतींचा फोटो आहे, त्यांत व तुम्ही वर्णन देतां यांत बरेंच साम्य असावें; करितां तो फोटो तुम्ही पाहा असें म्हणून आपण मला प्रेमाग्रहपूर्वक सांताक्रूझहून खार येथें आपल्या घरीं रात्रीं ८--९ वाजतां नेऊन अडगळीच्या सामानांत पडलेला फोटो महाप्रया-सानें शोधून काढून मला दाखविला. तो मला कांहीं अंशीं पटला. त्यांत कांहीं फेरकार करून त्याचा ब्लॉक तयार करवून घेऊन हल्लीं हयात अस-लेले ७०--८० वर्षे वयाचे अन्यांच्या शेजारीं राहणारे, अन्या निवर्तले तेव्हां १७ वर्षांचे असणारे, विनोदानें अन्यांच्या हातच्या डोक्यावर टापऱ्या खाणारे

सद्गृहस्थ अप्पाजी गोविंद ऊर्फ आपासाहेब देशपांडे यांना अन्यांच्या ब्लॉकचा लहान फोटो इतर फोटोंत मिसळून दाखविला. त्यांनीं बाकीचे फोटो बाजूस ठेवून भास्करानंदांच्या फोटोंत कांहीं साम्य आहे असें मला सांगून त्यांत कांहीं फेरफार सुचविले. त्याप्रमाणें श्री. वागळे फाटोग्राफर यांच्या खोलींत आपल्या समक्ष वागळ्यांना ते फेरफार सांगितले. विस्तृत फोटो ( Enlarged ) तयार झाल्यावर तो व दुसरे दोन विस्तृत फोटो घेऊन मी दत्तजयंतीकरितां शिरवळास ता. १३-१२-३४ रोजीं गेलों व तो फोटो त्याच दिवशीं आपासाहेब देशपांडे यांना दाखविला. त्यांनीं पसंत करून फोटोंत दिसणाऱ्या अन्यांच्या चेहऱ्याच्या, आजानुबाहु हातांच्या, योगासन घातलेल्या बैठकीच्या व दोन्ही बाजूच्या मोजतां येण्यासारख्या स्पष्ट दिसणाऱ्या बरगड्यांच्या व डोळ्यासमोर दिसणाऱ्या अन्यांच्या प्रत्यक्ष मूर्तीच्या विलक्षण साम्यतेची व अचानक साधलेल्या हुबेहुब पणाची फारच तारीफ केली व अत्यंत आश्चर्य प्रकट करून ते त्या फोटोकडे कांहीं काळपर्यंत पाहतच बसले व आपण केलेल्या श्रमांचें चीज झालें असें ते म्हणाले.

नंतर आम्ही बाबांचा, शिरवळदत्तप्रभूंचा व अन्यांचा असे तीन मोठे ( Enlarged ) विस्तृत सारख्या लांबीरुंदीचे फोटो मंदिरांतील गाभाऱ्याच्या दर्शनी भिंतीच्या दोन बाजूंच्या दोन गजांच्या मोठ्या खिडक्या व त्यांच्या मधील गजांचाच सुशोभित दरवाजा यांच्यावर आलेल्या तबकडीच्या भागाखालीं ( under the gallery part ) अनुक्रमानें बसविले.

ता. १९-१२-३५ पासून उत्सवाकरितां मंडळी येऊं लागली; त्यांत भोरजवळील विंगगांवचे श्रीयुत गंगाधर वामन ऊर्फ बाबा जोशी आचार्य,वय ७९-८० वर्षांचें,ज्यांच्या घरीं अन्या नेहमी जावयाचे व ज्यांचें वय अन्यांच्या मरणसमयीं १६-१७ वर्षांचें होतें.ते आपल्या चिरंजीव व पुतण्यासह शिरवळास उत्सवाकरतां आले होते. त्यांची नजर सहज अन्यांच्या फोटोकडे गेली आणि 'अरे,हा मोरूमामाचा (बाबा जोशी अन्यांना मोरूमामा म्हणून म्हणत) फोटो

येथें कसा व कोठून आला?' म्हणून ते एकदम आश्चर्यचकित व विस्मयापन्न झाले व मला येऊन विचारूं लागले कीं, हा मोरूमामांचा फोटो तुम्हांस कोठें मिळाला? मीं म्हटलें, 'अहो, हा तुम्ही व इतर मंडळींनीं दिलेल्या माहितीवरून मीं मुंबईहून तयार करून आणला.' ते म्हणाले, तुम्हीं अगदीं कमाल केलीत! अहो, यांत व मोरूमामांत इतकें आश्चर्यकारक साम्य व हुबेहुबपणा आहे कीं, आजच्या उत्सवांत प्रत्यक्ष मोरुमामा हजर आहेत व ते आपल्या देवळींत त्यांच्या नेहमीच्यापद्धतीप्रमाणें योगासन घालून जप करीत बसले आहेत असेंच मला वाटतें.काय हो हा अपूर्व व कपिलाषष्ठीचा योग! मोरूमामाच्या वेळीं या उत्सवांत श्रीदत्तमूर्तीची पूजा करण्याचें काम आमच्याकडे होतें. पुढें कांहीं कारणांनीं ती पूजा आमच्याकडून होईना म्हणून मोरूमामाच्या बंधूचें चिरंजीव श्री. पांडुरंगभटजी ती करूं लागले व हल्लीं पांडुरंग भटजींचे चिरंजीव दत्तात्रय उर्फ बगोबा मोने ती करतात; पण तो हक्क आमचा आहे व तो हक्क आतां (फोटो आल्यामुळें) आम्ही बजावणार असें बाबा जोशी उद्गारले. त्यांच्या उद्गारण्यास व तशी प्रत्यक्ष कृति होण्यास एकच गांठ पडली. चमत्कार असा कीं बाबा जोशांच्या कनिष्ठ बंधूच्या (श्रीयुत दिगंबरराव ऊर्फ भाऊसाहेब पेन्शनर पोलिस प्रॉसिक्यूटर चिरंजीवांची) आय. सी. एस्.ची परीक्षा गेल्या सालीं पास झाली. परीक्षा पास झाली म्हणजे आपण येथें दरसाल एक प्रयोजन घालीत जाऊं असा भाऊसाहेबांचा संकल्प. परंतु गुदस्तां तो योग न येता यंदा फोटो आल्याबरोबर मोरुमामा फार वर्षांनीं उत्सवांत दिसले व आतां ते कायमचेच येथें राहणार या उदात्त भावनेनें म्हणा, अगर इतर दुसऱ्या कोणत्याही इच्छेनें म्हणा, पण भाऊसाहेबांनीं या वर्षी उत्सवांतील एका दिवशी श्रीसाईदत्तप्रभुमूर्तीची स्वतः महान्यास व लघुरुद्र पूर्वक षोडशोपचारे पूजा करून दणदणीत व सुंदर प्रयोजन घातलें व पुढेंही दरवर्षी अशीच पूजा करण्याचें व प्रयोजन घालण्याचें आश्वासन दिलें. संतांच्या हुबेहुब फोटोंत किती तरी जोर व चित्ताकर्षक शक्ति असते! अन्यांच्या फोटोनें कित्ये-

३५

कांच्या अंतःकरणांत कर्तव्य विस्मृतीची जागृती, नवीन कर्तव्यबुद्धीची प्रेरणा उद्दीपित करून ज्यांनीं अन्यांना मुळींच पाहिले नाहींत, पण सत्पुरुष या नात्यानें ज्यांच्या अंतःकरणांत त्यांच्यासंबंधानें एक प्रकारची पूज्यबुद्धि वास करीत होती, अशा गांवांतील व परगावांतील शेंकडों स्त्रीपुरुषांच्या मनांतील अन्यांबद्दलचे कुतूहलपूर्ण धन्योद्गार बाहेर पाडिले.

याच उत्सवाकरतां सालाबादप्रमाणें या वर्षी भोरचे सधन सावकार व सद्गृहस्थ कोंडोपंत आण्णा धबडगांव आले होते. यांनीं ते फोटो पाहून एका गृहस्थास प्रश्न केला कीं, "कां हो हा नारायणभट्टांचा फोटो का ?" ते म्हणाले नाहीं;तो देव मामलतदारांनीं अन्यांचा फोटो तयार करून आणिला आहे. ते म्हणाले, मीं अन्यांना पाहिलें नाहीं; पण नारायणभट्टांना चांगले पाहिले आहेत व नारायणभट्टांचा तोंडावळा हुबेहुब अन्यांच्या तोंडावळ्या सारखाच होता. ते अन्यासारखेच उंच, काळे किडकिडीत होते. नंतर कोंडापंतअण्णांनीं मलाही हीच गोष्ट सांगितली व म्हणाले कीं, एके दिवशीं ते रस्त्यानें जात असतां त्यांना एका अनोळखी गृहस्थानें सहज विचारलें कीं, कां हो, आपण कुशाबानानांचे चिरंजीव का ? त्यांनीं म्हटलें होय. पण तुम्हीं मला हें कशावरून विचारलेंत असें अण्णांनीं त्या गृहस्थांना विचारलें, तेव्हां ते म्हणाले, 'अहो, तुमच्या तोंडवळयावरून. तुमचा चेहरा अगदीं हुबेहुब कुशाबा नानांच्या चेहऱ्यासारखा दिसतो. यावरून अन्यांचा फोटो किती हुबेहुब निघाला आहे याची कल्पना करतां येईल.

उत्सव संपल्यानंतर सुमारें १५–२० दिवसांनीं भोर संस्थानचे युवराज सरकार श्रीमंत भाऊसाहेब श्रीदत्तदर्शनाकरतां शिरवळास आले, व नवीन लावलेल्या फोटोकडे पाहतां पाहतां या फोटोकडे पाहून मला विचारलें कीं, हा फोटो कोणाचा ? मीं सांगितलें, हें मंदीर ज्या संतविभूतींच्या स्मरणार्थ बांधलें आहे त्या श्रीमोरभट्ट अन्या मोन्यांचा. हा तुम्हास कसा मिळाला म्हणून त्यांनीं पुन्हा प्रश्न केला. मिळालेल्या उपलब्ध माहितीवरून तयार करवून आणिला म्हणून मीं सांगितलें. फोटो फारच सुंदर साधला आहे म्हणून त्यांनीं त्याची तारीफ केली. नंतर युवराजसाहेब श्रीदत्तमूर्तीच्या

विस्तृत फोटोकडे वळले, व 'कां हो, मी जो ह्या दत्तमूर्तीचा काढलेला लहान फोटो तुम्हास दिला होता, त्यावरून हा विस्तृत (enlarged) केला आहे काय ?' असें त्यांनीं मला विचारलें. मीं म्हटलें होय, त्यावर श्रीमंत म्हणाले, 'अहो, माझ्या फोटोपेक्षां हा विस्तृत फोटो कितीतरी सुबक व सुंदर साधला आहे.' असें म्हणून त्यांनीं त्याची फार वाखाणणी केली. मुळापेक्षां हा विस्तृत फोटो फारच छान वठला आहे असे जे आपण उद्गार काढले होते, त्याची सत्यता पटली. असो. यावरून अन्यांचा फोटो व दत्तगुरुमूर्तीचा विस्तृत फोटो, हे किती हुबेहुब साधले आहेत याची कल्पना आपल्यास येईल.

ही पहिली महत्त्वाची गोष्ट झाली.

आतां दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या सातारच्या कनिष्ठ भगिनी कै. श्रीमती सुंदराताई किराणे यांनीं शिरवळास तिगस्त सालीं कांहीं महिने मुक्काम केला असल्या वेळीं ता. १५–१२–३२ उजेडता गुरुवार रोजीं पहाटें त्यांच्या स्वप्नांत अशाच बैठकीची, उंच, सडपातळ किड-किडीत, काळ्या रंगाची, सरळ नाकाची, मंदिराच्या गाभाऱ्यावरील पुढें आलेल्या तव्रकडीच्या भागाखालीं अधांतरी ध्यानस्थ हल्लींच्या आसना-सारखें आसन घालून बसलेली त्यांनीं पाहिली. आपण तेथून पडाल, आपण खाली जमीनीवर बसा, अशी त्यांनीं त्या मूर्तीची प्रार्थना करतांच, **माझी नेहमी बसण्याची हीच जागा आहे.** मी येथून खाली पडणार नाहीं, कोणतेंही शस्त्र माझी खांडोळी करूं शकणार नाहीं, पाणी मला बुडवूं शकणार नाहीं, व अग्नि मला जाळूं शकणार नाहीं, तुम्ही घाबरूं नका, **मी येथेंच बसणार,** असें त्या मूर्तीनी सुंदराताईस सांगितलें. नांव विचारतां माझें नांव आनंदराशि आहे. असें सांगितलें. ज्या अधान्तरी जागेवर सुंदराताईनीं ही मूर्ति बसलेली पाहिली, त्याच जागेवर हल्लींचा अन्यांचा फोटो सहजासहजीं व अचानक बसला आहे. हा तरी विलक्षण योग व चमत्कार नव्हे का ! कांहीं दिवसांनीं विवस्त्र परमहंस भास्करानंद

320

विग्रहांत सवस्त्र संसारी पण पूर्ण वैराग्यशील आनंदराशि मी याच ठिकाणीं येऊन बसणार आहें अशी अगाऊ सूचना अन्यानीं दृष्टांतरूपानें देऊन तिची सत्यता अन्यांच्या या फोटोनें प्रत्यक्ष पटविली नाहीं का ?

आतां तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण मला जो भास्करानंदाचा फोटो दाखविलात त्यांत त्यांची पार्श्वभूमिका( Back Ground ) काय होती याकडे त्या वेळीं आपलें किंवा माझें मुळींच लक्ष गेलें नव्हतें. परंतु श्री. वागळे यांनीं जेव्हां सर्व सुचविलेल्या फेरफारांसह अन्यांचा फोटो विस्तृत तयार केलेला मीं आपल्यासमक्ष त्यांच्या आलेख्यशाळेंत पाहिला, तेव्हां त्यांतील पार्श्वभूमिकेकडे माझें सहज लक्ष गेलें व या पार्श्वभूमिकेत शिरवळच्या दत्तमंदिरांतील अर्धगोलाकृति घुमटाचा भाग अचानक कसा उमटला याचें राहून राहून मला आश्चर्य वाटलें व खरोखरच बाबांच्या अगाध लीलेचें कौतुक वाटलें ! कारण वर्णनावरून तयार केलेल्या फोटोला पार्श्वभूमिका कसली तरी कल्पनेनेंच काढावयाची तर ती कोठली तरी निघेल. पण या ठिकाणीं ती शिरवळमंदिरांतील घुमटाचीच हुबेहुब कां निघावी ! नंतर न्हाहाळून पाहतां भास्करानंद कोठल्या तरी मंदिरात बसले असतांना हा त्यांचा फोटो घेतला आहे असें दिसलें. पण मंदिरांचीं शिखरें व घुमट नानाप्रकारचे व नाना आकाराचे असतात. मग भास्करानंदस्थित मंदिराचा घुमट व शिरवळदत्तमंदिराचा घुमट यांच्यांत तंतोतंत साम्य येऊन तीच पार्श्वभूमिका अन्यांचे फोटोस मिळाली कशी ?

हा काकतालीय न्याय का ! व हा जर काकतालीय न्याय असेल, तर वरील सर्व वर्णित गोष्टींतही काकतालीय न्यायच म्हणावा लागेल. खात्रीनें हा न्याय काकतालीय नव्हे. निःसंशय यांत श्रीसाइदत्तप्रभु बाबांची अतर्क्य व कल्पनातीत जादू भरलेली आहे !

हल्लींच्या पार्श्वभूमिकेमुळें अन्यांना जणूं हल्लीं नवीन बांधलेल्या शिरवळ दत्तमंदिरांत बसवून त्यांचा प्रत्यक्ष फोटो घेतला आहे कीं काय, असें भासतें. ही साईमाउलीची अगम्य करणी नव्हे तर काय !!!

असो. श्रीयुत वागळे फोटोग्राफर यांचा मीं या कामीं फारफार आभारी आहें. तथापि याचें श्रेय मुख्यतः आपल्याकडेच आहे. केवळ माझ्या मनीषेचे लाड पुरविण्याकरतां हा कपिलाषष्ठीचा योग जुळवून आणण्यांत आपल्यास अत्यंत मेहनत, श्रम व कष्ट पडले व साईलीलेचा २–३–४ हा जोडअंक काढण्यास विलंब लागला. त्यामुळें साईसद्भक्तांचा ठपका आपल्यास खावा लागला. पण याचा आपल्यास योग्य मोबदला मिळून, आपल्या प्रयत्नाचें चीज झालें; हें लिहिण्यास मला अत्यंत आनंद वाटतो "नहि कल्याण कृत्कश्चित् दुर्गतिंतात गच्छति" या श्रीमद्भगवद्गीतेंतील परमात्मवचनाप्रमाणें कोणतेंही सत्कृत्य ( फोटोरूपि संतसेवा ) केव्हांही फुकट जात नाहीं. शेवटीं "क्लेशः फलेनहि पुनर्नवतां विधत्ते" या पुराण गीर्वाण कविश्रेष्ठ कालिदासोक्तीप्रमाणें क्लेशाचें फल मिळालें म्हणजे पुन्हा तसेच नवीन श्रम करण्यास अधिक बळ येतें, त्याप्रमाणें आपल्यासही येवो अशी त्या साईदत्तमाउलीच्या पवित्र चरणीं नम्र प्रार्थना करून आपली रजा घेतों.

ठाणें, मिति माघ शु. ५ गुरुवार
शके १८५६. ता. ७–२–३५

आपला नम्र सेवक
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योन्नमः

# प्रस्तावना

परमात्मनिर्मित विश्वांत प्रत्येक जीवाची, जन्मापासून मरेपर्यंत, आत्यंतिक व अक्षय सुखाकरतां रात्रंदिवस धडपड चालू आहे. तें सुख, कोणी अलौकिक विद्यार्जनांत, कोणी प्रचंड द्रव्यार्जनांत, कोणी लोकोत्तर मल्लगिरींत, कोणी सौंदर्य व गुणसंपन्न कामिनीविलासांत, कोणी कुग्राम-निवासांत, कोणी नगरोपनगरांश्रयांत, कोणी निर्जन व गर्द तपोवनांतील शिवालयांत किंवा मठांत, कोणी पुण्यतटिनीतीरावर उभारलेल्या तृणकुटींत वा पर्णशाळेंत, कोणी गिरिगुहाविवरांत वा पर्वतदरीकंदरांत वा सह्य-विंध्य-हिमाचलादि नगाधिराज शिखरांवर मिळेल अशा समजुतीनें देशोधडी रानोमाळ भटकत हिंडत फिरत असतात. परंतु त्या त्या विषय किंवा वस्तु किंवा स्थानप्राप्तींत, त्या सुखाचा अभाव दिसून आल्यामुळें, त्यांना शेवटीं या सुखाकरितां, निर्गुण, निराकार, निरामय, निरंजन परमात्माचे प्रत्यक्ष सगुणावतार संतरत्न सद्गुरुरायांच्या दिव्य, पुण्य व पवित्र चरणकमलीं "सर्वधर्मान् परित्यज मामेकं शरणं व्रज" या श्रीमद्भगवद्गीतेंतील श्रीकृष्ण परमात्मोक्तीप्रमाणें त्यांनीं शरण जाऊन, त्यांच्यावर नितांत श्रद्धा ठेवून, त्यांची धैर्यानें शांततेनें, चिकाटीने व दमानें, अंतःकरणपूर्वक अनन्य भक्तिभावानें सतत सेवा करून त्यांची अनर्घ्य कृपा संपादन करून त्या सुखाचा लाभ करून घ्यावा लागतो, हें निश्चित.

ह्या सद्गुरुमणिमालिकेपैकींच श्रीदत्तप्रभु हे आद्य सद्गुरु चूडामणि आहेत, हें सर्वश्रुत आहे. सद्गुरुसेवा करण्याची जीं निरनिराळीं अनेक अंगें आहेत, त्यांपैकींच कीर्तन हें एक अंग आहे.

शिरडीचे श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा, शिरवळचे श्री मोरभट्ट अन्या माने, अक्कलकोटचे श्रीस्वामीमहाराज, केडगांवचे श्रीनारायणमहाराज,

गरुडेश्वरचे श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेमहाराज, आदिकरून ह्या सर्व एकमुखी दत्तावतार संतविभूति होत.

श्रीटेंबेस्वामीकृत श्रीदत्तात्रयषोडशावतारजयंतिकल्पनामक संस्कृत पुस्तकांत दत्ताच्या सोळा अवतारांचें वर्णन देऊन त्या त्या अवताराच्या जयंतीचा महिना, वार, तिथि, नक्षत्र, प्रहर, काल देऊन जयंतीकालीं प्रसाद म्हणून जो पदार्थ वांटावयाचा त्यांचीं नांवें दिलीं आहेत.

सोळा अवतारांपैकीं दुसऱ्या अवतारांत दत्तप्रभूंनीं तीन शिरें व सहा हात व तिसऱ्या अवतारांत तीन शिरें व चार हात व इतर १४ अवतारांत एक मुख व दोन हात धारण केले होते, असें त्याच जयंतिकल्पावरून दिसतें.

तसेंच सोळा अवतारांपैकीं १५ अवतार अयोनिसंभव व फक्त एकच कालाग्निशमन चवथा अवतार योनिज असा झाला व तो श्रीसाध्वी-चुडामणी अनसुया मातेच्या उदरांतून झाला, असेंही त्याच जयंतिकल्पा-वरून दिसतें.

हल्लीं सर्वत्र ठिकाणीं दत्तजयंतीच्या दिवशीं कीर्तनांत जें दत्त-जन्माख्यान लावण्यांत येतें, तें तृतीय अवताराचें कथानक आहे. या अव-तारी दत्तप्रभूंनीं अनसूयामातेच्या पोटीं प्रत्यक्ष जन्म घेतलेला नाहीं. फक्त पूर्वींच्या दोन अवतारांतील सवस्त्र षोडशवर्ष तरुण पुरुषाकृतिऐवजीं अतिबाळ म्हणजे सद्यः प्रसूत झालेल्या विवस्त्र तान्ह्या मुलाचें रूप धार केलें, इतकेंच.

दत्तभक्तांत दत्तभक्ति तीन प्रकारची आढळून येते. एकमुखी दत्ताच दत्तपादुकांची, व त्रिमुखी दत्ताची. एकमुखी दत्त फार क्वचित ठिक मिळतात. श्रीक्षेत्र काशी, पंढरपूर, नगर, खडकी व शिरवळ वगैरे ठिकाणीं एकमुखी दत्तमूर्ति आहेत. पादुका व त्रिमुखी दत्तमूर्तीच विशेषेंकरून

322

सर्वत्र आढळतात. त्यामुळें एकमुखी दत्ताचे भक्त कमी. पादुकांचे व त्रिमुखी दत्तांचे भक्त असंख्य.

त्रिमुखी अयोनिसंभव बालरूप दत्तजन्माचें आख्यान अनेकांनीं अनेक तऱ्हेनें रचलेलें आहे, व तेंच कथानक सर्वत्र ठिकाणीं दत्तजयंतीच्या दिवशीं लावण्यांत येतें. खरें उदरगर्भजन्माख्यान म्हणजे फक्त कालाग्निशमन एकमुखी दत्तजन्माख्यानच होय असें स्पष्ट दिसतें, व कालाग्निशमन जन्माख्यान आजपावेतों कोणी तयार केल्याचें माझ्या वाचनांत किंवा ऐकिवांत नाहीं. म्हणून प्रसंगास साजेल असा मुळांत थोडा फेरफार करून अत्यल्पबुद्धीनें व श्रीसमर्थसद्गुरु साईबाबांच्या प्रेरणेनें मीं हें आख्यान रचण्याचा प्रयत्न केला आहे. हें अख्यान श्रीदत्तावतार बाबांचेंच आहे.

दोन्हीं कथानकें रम्य, रसाळ व हृदयंगम असून एकाच दत्तप्रभूचीं असल्यामुळें व अखिल महाराष्ट्रांत दत्तजयंतीच्या तिथि फक्त दोनच म्हणजे मार्गशीर्ष शु. १४ व १५ असल्यामुळें ज्यांस जें कथानक रुचेल व मास, तिथि, काळ व प्रसाद म्हणून वांटण्याची वस्तु यांस अनुसरून जें युक्त दिसेल तें त्यांनीं लावावें. म्हणजे प्रसंग व आख्यान यांची विसंगतता भासणार नाहीं.

## आख्यानाचा सारांश

**पूर्वरंगः**—त्रित्वाची कल्पना विश्वारंभापासून आहे. नवी नाहीं. याच त्रित्वाची त्रिगुण, त्रिपुटी अशीं निरनिराळीं नांवें आहेत. प्रथम परमात्मा फक्त ऐनजिनसी एकटेच होते. मी एकटा आहें, मला पुष्कळ व्हावयाचें आहे असें त्या निर्गुण स्वरूपास स्फुरण झालें. स्फुरण झाल्याबरोबर प्रकृति ( माया, द्वैत, अज्ञान, अव्यक्त, आभास ) निर्माण झाली व प्रकृतीनें त्रिगुणान्वित विश्वखेळ निर्माण केला. कोणताही खेळ एकांत, किंवा दोघांत केव्हांही होतच नाहीं; त्यास तिघांची जरूर असते; खेळणारा, खेळगडी व खेळसामग्री.

त्रित्वाची कल्पना वेदांत आहे, व ती "एकोऽहं; बहुस्याम् नान्यदस्तीति," अशा वचनांनीं व ब्रम्हा, विष्णु, महेश या त्रिमूर्ति स्वरूपांनीं ठिकठिकाणीं दर्शविली आहे व त्यावरूनच ती आपल्या हिंदुस्थानांत हिंदुधर्मीय आर्य लोकांत रूढ झाली आहे. आतां ही त्रिमूर्तींची कल्पना आपल्याच देशांत व आपल्याच लोकांत आहे असें नव्हे. ती ज्या ज्या देशांत ( तिबेट, जपान वगैरे ) बुद्ध धर्म चालू आहे त्या त्या देशांत, तसेंच ख्रिस्तीधर्मीय युरोप व अमेरिका खंडांत, तसेंच चीन, इजिप्त, ( आफ्रिका ) असीरिया व पर्शिया या देशांतील तद्धर्मीय लोकांतही आढळते. त्याचप्रमाणें ही कल्पना केवळ भूलोकांतच आढळते असें नाहीं. ती स्वर्गलोकांत व तेजोमय खगोलांतील तारकापुंजांत ही दृक् प्रत्ययास येते व ही गोष्ट पनवेलचे श्रीयुत फडके यांचे श्रीदत्तभक्तरहस्य व मुंबईचे श्रीयुत ओगले यांनीं ओरायनच्या आधारें लिहिलेल्या वेदकालनिर्णय या पुस्तकावरून सिद्ध होते.

आतां त्रित्वाची कल्पना जशी नवी नाहीं, तशी या त्रित्वास जें "दत्त" हें सुंदर नांव मिळालें आहे, तेंही नवें नाहीं. श्रीदत्तगुरूंनीं तिसऱ्या अवतारांत आपण स्वत: होऊनच तें पुण्य नामाविधान धारण केलें आहे. भूगोलांतील दत्तमूर्तीपेक्षां खगोलांतील ( आकाशांतील ) गोश्वानयुक्त तारकामयी तेज:पुंज दत्तमूर्ति खरोखरच अत्यंत प्रेक्षणीय व मननीय असून सर्वव्यापी परमात्मा विश्वांत कोठकोठें कसकशीं स्वरूपें धारण करून वावरत आहेत, हें प्रत्यक्ष दर्शविणारी आहे, व हीच मूर्ति जगदुद्धारार्थ मानवरूप धारण करून खालीं आली आहे कीं काय असें वाटतें.

हा विश्वखेळ म्हणजे त्रित्वाचा किंवा त्रिमुखी दत्तमूर्तीचा खेळ ऊर्णनाभि ( म्हणजे कोळी spider ) याच्या खेळप्रमामाणें आहे. कोळी प्रथम आपल्याच उदरांतून काळसर तंतु काढून त्याचें जाळें विणतो. नंतर त्यांत जिवंत क्रिमी, कीटक माशा वगैरे लहान लहान जीवजंतु पकडून

323

शेवटीं त्या सर्वांसह त्या जाळ्याचा ग्रास करून टाकून फक्त आपण एकटाच उरतो. त्याचप्रमाणें निर्गुण वस्तूस स्फुरण होण्याबरोबर ती माया (प्रकृति) रूपि जाळें निर्माण करते व त्यांत विश्वांतील चराचर जीवजंतु पकडून कल्पांतीं विश्वरचनेसह मायेचा ग्रास (लय) करून टाकते. यावरून त्रिमुख हें परमात्माचें आभासिक अतएव मिथ्या स्वरूप आहे व एकमुख हें आभासशून्य अतएव सत्य स्वरूप आहे असें होतें, तथापि श्रीमद्भगवद्गीतेंत लिहिल्याप्रमाणें चतुर्भुज (अवतारसगुण) व विश्वरूप (अवतारशून्य मूळचें निर्गुण) हीं अनुक्रमें आभासिक व सत्य स्वरूपें त्याच परमात्म्याचीं असल्यामुळें (व आपण परमात्मसत्तेच्या उच्च कोटींतील माणसें नसल्यामुळें) जशी आपल्यास सारखीच सत्य व वंद्य, तशीच येथें ही त्रिमुख व एकमुख हीं त्याच दत्तगुरूंचीं स्वरूपें असल्यामुळें आपल्यास दोन्हींही सारखीच सत्य व वंदनीय आहेत.

या आकाशस्थ आपल्या मस्तकावर उभे असलेल्या हुबेहुब दत्तमाउलीच्या गोश्वानयुक्त त्रिमुखी दैवताचें नक्षत्रपुंजात्मक तेजःपुंज सौंदर्य पाहून त्या श्रीसाईदत्तचरण कमळांतील ब्राम्हानंदरूपि मधुर मकरंदाचा आस्वाद घेण्यांत बाल मधुकराचें मन त्यांच्या पुण्यचरणीं गुंग झालें आहे, असें विनम्रपणें व अत्यादरपूर्वक सांगून पूर्वरंग समाप्त केला आहे.

**उत्तररंग:**—विश्व निर्माण करण्याकरितां परमात्म्यांनी प्रथम जे सात मानसपुत्र निर्माण केले, त्यांपैकीं महर्षि अत्री हे एक होत. ह्या मानसपुत्रांना प्रजापति अशी संज्ञा आहे. सर्व प्रजापतींत अत्रि ऋषि हे एक महातेजस्वी व वन्हिप्रभावी विद्वद्रत्न होते. श्रीकर्दम महामुनि हेह एक प्रजापतीच होते. कर्दमऋषींचें लग्न प्रख्यात स्वायंभु मनूची कन्या श्रीदेवी देवहुती ह्यांच्याशीं झालें. ह्या जोडप्यास श्रीपरमात्म विभूति कपिल महामुनि व साध्वीचूडामणी जगदंबा अनसूयामाता आदिकरून अपत्यें झालीं. ह्या अनसूयामातेचा विवाह महर्षि अत्रींबरोबर झाला. हें ऋषिदंपत्य दंडका-

रण्यांत फार प्रेमानें व आनंदानें कालक्रमणा करीत असे. परंतु त्यांना संतति नसल्यामुळें पुत्रचिंतेनें त्यांचें चित्त नेहमीं जळत असे.

प्रत्यक्ष ब्रह्मदेवास सुद्धा तप केल्यावांचून सृष्टि निर्माण करतां येईना. करितां आपणही तप केल्यावांचून आपल्यास संतति होणार नाहीं अशी अनसूयामातेची पूर्ण खात्री झाल्यावरून त्यांनीं तुम्हास स्वतःलाच संतति नाहीं, तर तुम्ही प्रजापति कसले, असें आक्षेपगर्भ ( Taunting किंवा Sarcastic ) कटु-पण विनयशीलतेनें अत्रिऋषींजवळ भाषण करून हिमाचलावर घोर तपश्चर्या करून परमात्माला वश करून घेण्याचा हट्ट धरला. ऋषिवर्यांनीं आपल्या लाडक्या सहधर्मचारिणीच्या प्रेमाग्रहास मान देऊन तीं उभयतां हिमालयावरील ऋक्ष नांवाच्या शिखरावर गेलीं व तेथें घोर तप करूं लागलीं. त्यांच्या उग्र तपसामर्थ्यानें आदिमावतार दत्तगुरु **योगिराज** यांची रम्य १६ वर्षांची मूर्ति त्या ऋषिदंपतीसमोर प्रत्यक्ष उभी राहिली.

या प्रत्यक्ष दर्शनानें त्यांच्यापैकीं कोणाचेंच समाधान झालें नाहीं. अत्रिऋषींनीं योगिराजांना फार दूषण दिलें. अनसूयामातेला तर देवाच्या या मायावीपणाबद्दल फार राग येऊन त्यांनीं देवाची चांगलीच निर्भत्सना केली, व रागानें त्या उभयतांनीं त्याच पर्वतशिखरावरच्या परम नांवाच्या तीर्थावर पुन्हा शंभर वर्षे उग्रतर तपश्चर्या केली. त्या तपश्चर्येच्या योगानें अत्रिऋषींच्या मस्तकातून एक भयंकर तेज बाहेर पडलें. त्या तेजाची प्रखरता विश्वास सहन होईना. म्हणून सर्व चराचर विश्व ब्रम्हा विष्णु महेश या तीन देवांकडे आश्रयाकरितां गेलें. त्या त्रैमूर्तींनीं जगतास अभय देऊन ते तिघ देव अत्रिऋषींच्या आश्रमांत गेले. मी एकाच देवाचें ध्यान करीत असतां तुम्ही कोण व तिघे येथें कशाकरतां आलां म्हणून अत्रींनीं त्यांना सविस्मय प्रश्न केला. तूं ज्या एका देवाचें चिंतन करीत आहेस तोच एक देव आम्ही आहों. तूं आमच्यांत भेद न मानतां त्या एकाचेंच चिंतन करीत बैस. असें बोलून ते तिघे अंतर्धान पावले व पुन्हा

३२५

**अत्रिवरद** नामक दत्तगुरूंचा दुसरा अवतार घेऊन पूर्वीप्रमाणें दिव्य तरुण १६ वर्षांचा तीन शिरें व सहा हाताचा देह धारण करून त्या ऋषिदंपतीच्या पुढें येऊन उभे राहिले व त्रैलोक्यांत जो दुर्मिळ वर असेल तो मागा असें म्हणाले. या दर्शनानेंही त्या ऋषिदंपतीचें समाधान झालें नाहीं. तथापि वरच देत असाल, तर तुमच्यासारखें पुत्ररत्न द्या अशी अत्रींनीं त्यांच्याजवळ याचना केली. परंतु देवाच्या या जादुगिरीबद्दल अनसूयामातेनें देवाची सणसणीत कानउघाडणी करून त्याच्या या ऐंद्र-जालिक कृत्याबद्दल पूर्ण नापसंती, निराशा, क्रोध व तिटकारा दर्शविला. अत्रींनीं त्यांचें सांत्वन केलें. इतक्यांत परमात्मांनीं त्यांना आणखी एक हुलकावणी देऊन निसटून जाण्याची निराळीच युक्ती काढली.

तुमच्या कठिण व खडतर तपाला मी भुललों व आतां मी स्वतः-लाच तुम्हास देऊन टाकून तुमच्या अधीन होऊन तुमच्या इच्छेप्रमाणें बालरूप धारण करतों. असें म्हणून दत्तगुरूंनीं तृतीय अवतारांतील सद्यः प्रसूत असें बालस्वरूप धारण करून दत्त हें नामाभिधान धारण केलें. तें दिव्य मोहक बाळ दिगंबररूप पाहून अत्रि ऋषि इतके शांत तरी सुद्धा खिन्न झाले. मग अनसूया मातांच्या संतापाला तर विचारावयासच नको ! त्यांनीं देवाच्या या नटवेगिरी व फसवेगिरीबद्दल देवाचा खरपूस समाचार घेतला व पुन्हा उग्र व भयंकर तप करून मी आपल्या पातिव्रत्य तेजानें तुझ्या हातावर तुरी देऊन तुलाच माझ्या उदरांत जन्म घेण्यास लावून तुला चांगली शिक्षा करीन व आजवर केलेल्या अशा प्रकारच्या अपराधांची तुझ्याकडून कबुली घेऊन तुला पायां पडावयास लावीन अशी परमात्मास सणसणीत तंबी दिली.

आतां आपण पुन्हा अति उग्र तप करूं व तो देव आपल्यास कसा औरस पुत्र देत नाहीं तें पाहूं असें म्हणून त्या ऋषिदंपतीनें स्वतःच्याच आश्रमांत तिसऱ्या वेळीं तप करण्यास प्रारंभ केला. त्या तपाच्या उग्रतमते-मुळें अत्रिऋषींच्या मस्तकांत असह्य असा कालाग्नि उत्पन्न झाला व त्यांना तप करण्याचें सुचेना. त्यांच्या अंगाची लाही लाही झाली, व प्राण व्याकुळ

झाले. अनसूयामातेनें परमात्माचा धांवा केला. परमात्मास दया आली, नंतर लागलींच परमात्मा स्वतःच वायु व मेघ बनून अत्रींच्या शरीरांत करुणामृताची वृष्टि करण्याकरतां शिरले. तत्क्षणींच अत्रींचा दाह शांत झाला व त्यांनीं ऋतुमती अनसूया मातेकडे सकाम दृष्टीनें पाहिलें. त्याही सकाम झाल्या.इतक्यांत अत्रिऋषींच्या नयनांतून एक दिव्य भयंकर तेज बाहेर पडलें. तें तेज पाहून अनसूया मातेला अत्यानंद झाला. हें तेज सहन करण्यास आपल्यावांचून श्रीलक्ष्मी, पार्वती सावित्री आदिकरून कोणीही पतिव्रता समर्थ नाहींत व हें आतां सर्व विश्वाची राखरांगोळी करील असें समजून त्यांनीं तें विश्वदाहक तेज वरच्यावर झेलून आपल्या उदरांत सांठवून ठेविलें त्यापासून त्या तत्क्षणींच गरोदर राहिल्या. त्यांना वैराग्याचे डोहळे लागले. नऊ मास पूर्ण झाल्यावर त्या मार्गशीर्ष शु. १४ बुधवार, रोहिणी नक्षत्र प्रदोषकालीं प्रसूत झाल्या. त्यांना जगदुद्धारक चतुर्थावतार **कालाग्निशमन** नामक पुत्ररत्न झालें. तें दिव्य व अत्यंत सौंदर्यवान पुत्रमुख पाहून त्यांना अत्यानंद झाला. त्यांनीं त्या बालकाचें अमर्याद चुंबन घेतलें व त्याला स्तनपान दिलें व तूं जरी पहिलें आद्यतत्त्व आहेस, तरी मला तूं तुझी आई म्हणून मानिलें आहेस. करितां माझें सर्व कोडकौतुक पुरीव, असें सांगून त्यास पाळण्यांत घालून गाणें म्हणून झोंके देऊन निजविलें. याप्रमाणें वर्णन करून येथें आख्यान समाप्त केलें आहे.

मिति श्रावण कृ. १३<br>
गुरुवार शके १८५६<br>
टाणें

श्रीसाईपदरज दासनुदास

**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

325

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

# चतुर्थावतार दत्तगुरु श्रीकालाग्निशमन साईदत्तजन्म कीर्तनाख्यान

## नमन

श्रीगणेशायनमः । सजयति सिंदुरवदनो देवो यत्पाद पंकज
स्मरणं वासरमणिरिव तमसां राशिं नाशयति विघ्नानाम् ।

## नमन व प्रार्थना

१ पद

( रामदास माउली० या चालीवर )

दयाघन माउली गे । माय माझी दत्तराज माउली ॥
दत्तराज माउली गे । माय माझी ज्ञानराज माउली ॥
ज्ञानराज माउली गे । माय माझी साइराज माउली ॥
साइराज माउली गे । माय माझी दयाघन माउली ॥

लपुनी जगतीं सूत्र ओढिते । हलवि चराचर बाहुली ॥ गे माय माझी ॥१॥
भवभय तापें तप्त दास हा । करि करुणेची साउली ॥ गे माय माझी ॥२॥
काममदादिक गांजिति निशिदिनीं । दूर करी अहितावली[1] ॥
गे माय माझी ॥ ३ ॥
दीन बाळ तव, नमुनी विनवी । ठाव देइं तव पाउलीं ॥ गे माय माझी ॥४॥

---

१ अहित म्हणजे शत्रु, अरि, रिपु. आवलि म्हणजे पंक्ति, समुदाय, समूह. संघ, वृंद, अतएव अहितावलि म्हणजे काम-क्रोधरूपि शत्रूंचा समुदाय.

भूत्वा यःस्वयमेव नृत्यति सदा ब्रह्मांडरंगावनौ ।
नित्यं नौमि नमामि तं नटवरं श्रीसाइनं सद्गुरुम् ॥

**अर्थः**—नाटककंपन्या, पांच व सात अंकीं नाटकें, दोन किंवा तीन अंकीं नाटिका ( नाटकांत काम करणारीं ) पुरुष व स्त्रीपात्रें, गायन, वादन व नर्तन आदि करून ( नाटकांस लागणाऱ्या ) सर्व कला, नाटक शास्त्र, नाटकास लागणाऱ्या यच्चावत् इतर सर्व वस्तु, नाटकापासून प्राप्त करून घेण्याची वस्तु ( ध्येय) व नाटकास लागणारीं सामग्री, हीं सर्व आपणच होऊन ब्रह्मांडाच्या रंगभूमीवर रात्रंदिवस स्वतःच थैमान करणारे नटश्रेष्ठ श्रीसद्गुरु साइनाथमहाराजांचें मी निरंतर स्तवन व नमन करतों.

## आद्य कालापासूनच एकामध्यें त्रित्वाचा अंतर्भाव

श्रुतिः (समष्टिः)

आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् । नान्यत्किंचन मिषत् ।
स ईक्षत लोकान्नु सृजा इति । —ऐतरेयोपनिषद् प्रथम खंड मंत्र १

५. भुजंगप्रयात

आधी एकला एक आत्मा अरूपें[१] । तदिच्छोद्भवें[२] द्वैत माया स्वरूपें ।
तियेपासुनी[३] त्रित्वें[४] त्रैगुण्यें[५] झालें । अशी ऐतरेया श्रुती बोलं[६] बोले ।

## मूळ वस्तुलाच स्फुरण होऊन तिला तीन मुखें निघून त्यापासून तीन निरनिराळीं स्वरूपें म्हणजेच दत्त-त्रिमुखत्वाचें प्रगटीकरण.

---

१ कोणत्याही प्रकारचा आकार, वर्ण नसलेला. २ त्याच्या इच्छेनें उत्पन्न झालें. ३ मायेपासून. ४ तीनपणा. ५ तीन गुणपणा ( रज, सत्त्व, तम. ). ६ वचन.

३२६

श्रुतिः ( व्यष्टिः )

एकोऽहं बहुस्याम नान्यदस्तीति ॥

—तैत्तिरीयोपनिषद् ब्रह्मवल्ली ६, अनुवाक; बृहदारण्यकोपनिषद् अध्याय १, ब्राह्मण ४

६ दिंडी

अहा " एकोऽहं " एकमुख मुकेचें । द्वितीयानन[1] तें " बहुस्याम "त्यांचें,
" नान्यदस्तीति " तृतीयास्य[2] साचें[3] । दत्तत्रिमुखत्व श्रुतिमुखीं कसें नाचे ॥

७ स्रग्धरा

मी एकोऽनेक होणें मज बहु, पहिली निर्गुणी स्फूर्ति[4] आली ।
सद्रूपा स्फूर्ति दोंनीं[5] प्रकृति गुण अशा द्वैत[6] भासांस व्याली[7] ।
आभासें आत्मरूपी धवलसुभगदा[8] विश्वखेळासि खेळे ।
खेळीं ना लिप्त, तीचें एकत्व[9] ! कधि कदा अद्वितीयत्व मळे[10] ॥

दत्तभक्तांची दत्तभक्ति प्रायः तीन प्रकारची आढळते. एकमुखी दत्तांची ( मूर्ती, प्रतिमा, संतावतार सगुण परमात्मा ) दत्त पादुकांची व त्रिमुखी दत्ताची. पैकीं एकमुखी दत्त क्वचित् , तसेंच त्याचे भक्तही विरळा. दत्तपादुकांचीं स्थानें बरींच, तसे त्यांचे भक्तही पुष्कळ. त्रिमुखी दत्तमूर्ति व प्रतिमा असंख्य तसे त्यांचे भक्तही अगणित.

कोणत्याही खेळास तिघांची जरूर लागते. खेळणारा, खेळगडी व खेळसामग्री. खेळ एकांत कधींच होत नाहीं. परमेश्वराच्या जगद्रूपि खेळास ही, त्रित्वाची, त्रिपुटीची त्रैमूर्तीची म्हणजे दत्त-त्रिमुखत्वाची आवश्यकता आहे.

१ दुसरें मुख. द्वितीय=दुसरें, आनन=मुख. २ आस्य=मुख. ३ खरोखर. ४ स्फुरण Inspiration. ५ दोन. ६ मिथ्यात्व, खोटेपणा. ७ निर्माण केलें. ८ डोळ्यास सुंदर दिसणारा. ९ एकपण. १० मलिन होत नाहीं, बिघडत नाहीं; नाहींसें होत नाहीं.

अद्वैत हें खेळास नालायक, द्वैत हें लंगडे, फक्तत्रिपुटी मात्र समर्थ. सृष्टि निर्माण करणें, तिचें पालन करणें व तिचा संहार करणें हाच परमात्म्याचा खेळ. हीं तीन स्वरूपें सृष्टि निर्माण करण्याच्या पूर्वीपासून त्यांच्या ठिकाणीं स्वत:सिद्ध आहेत.

विश्व प्रारंभाचे वेळीं विश्वकार्यार्थ परमात्मांनीं स्वतःचेच
तीन भाग पाडून त्यांस तीन निरनिराळीं नांवें दिलीं.

८ अनुष्टुभ्

अस्य त्रैलोक्यवृक्षस्य । भूमौ विटप शाखिनः ।
अग्रं मध्यं तथा मूलं । विष्णुर्ब्रह्मा महेश्वरः ॥ —रुद्रहृदयोपनिषद्

एकाचे तीन विभाग करण्याचें प्रयोजन व त्यांचीं कार्यें

९ अनुष्टुभ्

कार्यं विष्णुः क्रिया ब्रह्मा । कारणं तु महेश्वरः ।
प्रयोजनार्थं रुद्रेण । मूर्तिरेका त्रिधाकृता ॥ —रुद्रहृदयोपनिषद्

## विश्वांतील पंचतत्त्वात्मक प्रत्येक वस्तूंत गुप्त त्रित्व म्हणजे गुप्त दत्तस्वरूप

१० आर्या

[१]कांचन, कंज[२], कृशानु[३], कल[४]कल[५]कंठि कृत्तिका[६] कांता[७] ।
इति पंच भूतजात[८] त्रिगुणान्वित[९] दत्त, चिंति एकांता ॥

( वर वर्णन केल्याशिवाय अ, ऊ, म ॐकार, ऋग्, यजु, साम, ब्रह्मा,

१ सोनें. २ कमळ. ३ अग्नि. ४ अस्पष्ट मधुर शब्द. ५ मधुर शब्द करणारी कोकिला. ६ कृत्तिका नक्षत्र. ७ रमणीय. ८ पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश यांपासून निर्माण झालेले पदार्थ. ९ सत्त्व-रज-तम गुणांनीं युक्त.

327

विष्णु, महेश, अधिभूत, अधिदैव, अध्यात्म, क्षर, अक्षर, पुरुषोत्तम, गंगा, यमुना, सरस्वती, गार्हस्पत्य, आहवनीय दक्षिणाग्नि, ध्याता, ध्येय, ध्यान, उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा, सकाळ, दुपार संध्याकाळ, वगैरे वगैरे ह्या सर्व त्रिपुट्यांत दत्त स्वरूपच सामावलेलें आहे.

## इतर देशांतील व धर्मांतील त्रिमूर्तींची

## म्हणजे दत्त-कल्पना

११ शार्दुलविक्रीडित

मंजुश्री, अवलोकितेश्वर तथाऽसीमप्रकाशा[1] बुधां[2]।
ख्रिस्तांची[3] त्रिनिटी पिता, सुत, पवित्रात्मा च एवं विधा[4]।
चीनांच्या शुभ फो, सनो समपॅ समपओ, प्राचीन, ह्या देवता।
आसीरीस इसीस होरस अशा ईजिप्त मूर्ती मता[6]॥

१२ द्रुतविलंबित

ॲसिरिया अनु, चेल हिया इति[7]। अहुरमझ्झद मिथ्रऽ सभा इति।
ॲनल[8] अमृत[9] अर्क[10] तथैव वा। भजति पारसिका तिन्हि या शिवा[11]॥

आतांपर्यंत त्रित्वाची, त्रिमूर्तींची किंवा त्रिमुखी दत्तकल्पना अति पुरातन म्हणजे आद्य काळापासून स्वर्गात, वेदांत, मृत्युलोकांत, हिंदुस्थानांत व ज्ञात (माहित असलेल्या) जगांतील बहुतेक सर्व देशांत कशी रूढ झाली आहे, याचें संक्षिप्त विवेचन केलें. म्हणजे आतांपर्यंतचें विवेचन भूगोलांतील

---

१ असीम प्रकाश. २ बुद्धांच्या मंजुश्री, अवलोकितेश्वर व असीमप्रकाश ह्या तीन देवता. ३ त्रिनिटी Trinity त्रिमूर्ति Father, son & the holy Ghost; (पिता पुत्र व पवित्र आत्मा सैतान). ४ याप्रमाणें. ५ अस्माइति हें देवतेचें नांव आहे. ६ मानल्या गेल्या आहेत. ७ असीरिया देशांतील त्रिमूर्ति अनु, चेल व हिया. ८ अग्नि. ९ पाणी. १० सूर्य. ११ कल्याणकारक.

झालें. आतां ह्या त्रित्वास म्हणजे त्रिमुखी दत्तकल्पनेस खगोलांतही मूर्तिमंत दृक्प्रत्यय मिळतो व तो अत्यंत आल्हादकारक, प्रेक्षणीय व अनुभवसिद्ध आहे.

## खगोलांतील म्हणजे आकाशांतील नक्षत्र-स्वरूप त्रिमूर्तित्व म्हणज गोश्वानयुक्त अभिनंदनीय, प्रेक्षणीय, वंदनीय मननीय दत्तमूर्ति

मार्गशीर्ष महिन्यांत येत असलेला वसंत ऋतु व मार्गशीर्षापासून होत असलेला वर्ष-प्रारंभ.

१३ आर्या

प्राचीन वेदकाळीं एके वेळीं वसंत संपातें
मृगनक्षत्रीं होता वर्षप्रारंभ ही तसा त्यांत॥

---

१ क्रांतिवृत्त व विषुव वृत्त (The ecliptic & the Sun's equinoctia passage) हीं दोन वर्तुळें (circles) ज्या दोन बिंदूंत (points) एकमेकांस छेदतात, (cut) त्या प्रत्येक छेदनबिंदूस संपात (meeting together) म्हणतात. हीं दोन वृत्तें किंवा वर्तुळें म्हणजे सूर्याचे (वस्तुतः पृथ्वीचे) नक्षत्रांतून फिरण्याचे मार्ग आहेत. या दोन वृत्तांवरच सत्तावीस (हल्लीं अठ्ठावीस) नक्षत्रांचीं स्थाने आहेत. हे संपात दोन आहेत. वसंतसंपात व शरत्संपात. यांपैकीं ज्या नक्षत्राजवळ सूर्य आला म्हणजे वसंत ऋतुला आरंभ होतो, तो वसंतसंपात, व दुसरा शरत्संपात. या बिंदूपासून ९० अंशांवर असलेले जे दुसरे बिंदु, त्यांस अयनबिंदु म्हणतात. त्यांपैकीं एकास उत्तरायण व दुसऱ्यास दक्षिणायन बिंदु असें म्हणतात. क्रांतिवृत्त स्थिर आहे. विषुववृत्त चल आहे. त्यामुळें त्यांना छेणदणारे संपातबिंदूही चल आहेत व अयनबिंदूही चल आहेत.

328

१४ लावणी ( जाउं नको रे विषयारविंची० या चालीवर )

त्रिभुवनसुंदर विश्वमंदिरीं नीलांबर[1] हें वितान[2] ॥
त्यावरि तारागण-हंड्यामधि रत्नदीप[3] जणु छान ॥
तयांत मणिमय झुंबर सदृश तीन पुंजे[4] शोभती ॥
ज्यातें रोहिणी मृग आरद्रा ज्योतिर्विद बोलती ॥

## दत्त–त्रिमुखांपैकीं पहिलें नक्षत्र–मुख

### ब्रह्मदेव

१५ साकी

ह्या तार्‍यांच्या तीन देवता वसंत समयीं दिसती ॥
पहिली यज्ञाब्दारंभाची[5] रोहिणि[6] रजः[7] प्रजापती[8] ॥
दृष्टी नभिं फेंका । प्रभुची लीला अवलोका ॥

## दुसरें नक्षत्र–मुख

### विष्णु

१६ साकी

क्षीरोदधि जणु नभगंगा[9] ही मृगशिर[10] सन्निध वाहे ॥

१ नील=निळें अंबर=आकाश=निळ्या रंगाचें आकाश. २ छत, चांदवा. ३ ( नक्षत्र किंवा तारा ह्या हंड्या ) त्यांत नक्षत्रांचें तेज हेच रत्नांचे दिवे. ४ राशि-समूह. ५ पूर्वी नव्या वर्षास सुरवात झाली कीं, यज्ञ करण्यास सुरवात होत असे; म्हणून वर्षप्रारंभाला यज्ञ-वर्षारंभ म्हणत. ६ रोहिणी नक्षत्राचा पुंजका. ७ रजोगुणी. ८ ब्रह्मदेव. ९ आकाशगंगा. याच आकाशगंगेला इंग्रजींत milky way असें म्हणतात. आकाशगंगा म्हणजेच क्षीरसागर व वैतरणा नदी. १० मृग नक्षत्राचा पुंजका.

मृगशिर सात्विक विष्णु देवता क्षीरसागरीं राहे ॥
दृष्टी नभिं फेंका। प्रभुची लीला अवलोका ॥

## तिसरें नक्षत्र–मुख

## शंकर

१७ साकी

तमोगुणी जी रुद्र देवता आर्द्रापुंजीं विलसे ॥
नवल पहा हें त्रिमुखी दैवत नभिं कैसें तें शोभतसे ॥
दृष्टी नभिं फेका। प्रभुची लीला अवलोका ॥

## वरील आकाशस्थ नक्षत्ररूप दत्तगुरुजवळ असलेले वेदरूप कुत्र्यांचे दोन नक्षत्रपुंज व त्यांचें कार्य

१८ दिंडी

तीन पुंजासन्नीध दोन श्वानें। पुंज दिसती रक्षिती देवयान ॥

---

१ कुत्र्यांच्या आकृतीचे दोन नक्षत्रपुंजके. ह्या दोन कुत्र्यांस संस्कृतांत श्वन् व प्रश्वन् म्हणजे लहान कुत्रा व मोठा कुत्रा असें म्हणतात. ग्रीक भाषेंत क्वान, प्रोक्वान व इंग्रजींत कॅनिस मायनॉर व कॅनिस मेजॉर असें म्हणतात. (अथर्ववेद ६–८०–३). २ देवयान व पितृयान हीं देवलोकांत व पितृलोकांत जाण्याचीं दोन द्वारें आहेत. देवयान ( देवलोक ) ( देव=अमर, यान=मार्ग ) म्हणजे आकाशाच्या वरचा भाग. तो प्रकाशित व ज्ञात प्रदेश आहे व तेथें इंद्राचें राज्य आहे. पितृयान ( पितरलोक ) ( पितृ=पितर, यान=मार्ग ) म्हणजे आकाशाच्या खालचा भाग. हा अंधःकारमय व जलमय प्रदेश आहे, व तेथें यमाचें राज्य आहे.

देवयान ऊर्फ देवलोक व पितृयान ऊर्फ पितरलोक या दोन गोलार्धांना जोडण्याचें काम वसंत व शरत्संपात करतात. म्हणजे हीं संपातस्थानें देवयानाचीं ऊर्फ स्वर्गाचीं द्वारें होत.

हीं दोन द्वारें संरक्षण करण्याकरतां दोन द्वारांवर म्हणजे वसंत व शरत्संपात बिंदूजवळ वरील दोन कुत्रे ( श्वानपुंज ) आहेत.

३५

एक मोठा लघु दुजा अनुपमेय[1] । वेदरायांचें चिन्ह सारमेयं[2] ॥

## त्याचप्रमाणें दत्तगुरुजवळ असलेली गाय

१९ इंद्रवज्रा

गंगा[3] नभीं वैतरणा[4] तराया । नौका[5] तिथें ठेविलि देवराया ॥
गोरूप[6] नौभार[7] पडे भराया । मर्त्यां[8] वदे तार्क्ष्य[9] पुराण राया ॥

२० पद. राग धनाश्री, ताल दादरा

( मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली, या चालीवर )

मूर्तिमंत भासत ही मज शिराधरी नभीं[10] ॥

---

१ आसामान्य, अलौकिक. २ कुत्रा.

३–४ वेदांत व पुराणांत वर्णिलेली आकाशगंगा व क्षीरसागर गरुडपुराणांत सांगितलेली वैतरणा नदी व इंग्रजींत म्हटला जात असलेला Milky way ( दुग्धमार्ग, दुधाचा रस्ता ) हीं एकाच आकाशगंगेचीं निरनिराळीं नांवें आहेत. ५ नाव ( दैवी नावम् ऋग्वेद १०–६३–१०). ६ गाईच्या रूपानें. ७ नावेचें भाडें. ८ मेलेल्या मनुष्यास. ९ तार्क्ष्य=गरुड. पुराणराया=पुराणाचे राजे,कर्ते, व्यास. मृत मनुष्यास यमलोकांत जाण्याकरतां वैतरणा नदी तरून जावी लागते. ती तरून जाण्याकरतां तेथें देवानें एक नौका ठेविली आहे, तिला संस्कृतांत दैवीं नावम् असें म्हणतात व ग्रीक लोकांत आर्गोनेव्हिस असें म्हणतात व हा नावेचा तारा मोठया कुत्र्याच्या ताऱ्याजवळ अगदीं हुबेहुब नावेच्या किंवा जहाजाच्या आकाराचा आहे. ह्या नावेंत बसून जाण्याचें भाडें गाईच्या रूपानें द्यावें लागतें, म्हणून मृताच्या नांवानें एक गाय द्यावी म्हणजे त्याला या नदीपलीकडे जाण्याचा नावेचा खर्च देतां येतो, असें गरुड-पुराणांत सांगितलें आहे. १० आकाशांत.

तारकामयी[1] सुरम्य[2] *दत्तमाउली उभी ॥
उद्धरावयासि जगा मनुजरूप[3] घेउनी ॥
मेदिनी तलीं आली, भक्त-सुरभि सौरभी[4-5] ॥ मूर्तिमंत० ॥

## त्रित्वाचें पुन्हा एकत्व किंवा तीन मुखांचें पुन्हा एक मुख अथवा त्रिमूर्तीची पुन्हा एक मूर्ति

२१ स्वागता

ऊर्णनाभि[6] उदरांतुनि काळें । सूत्रें[7] काढुनि विणी मग जाळें ॥
त्यांत तो धरि क्रिमी[8] जित[9] माशा । ग्रासि[10] त्यासकट दावि तमाशा[11] ॥

---

१ नक्षत्रस्वरूप. २ सुंदर. ३ मनुष्याचें रूप. ४–५ भक्तांची आवडती कामधेनु. ६ कोळी Spider. ७ सूत. ८ सूक्ष्म जीवजंतु. ९ जिवंत. १० गिळून टाकतो.

* याप्रमाणें रोहिणी, मृग, आर्द्रा,नक्षत्रपुंजांच्या तीन देवता ब्रह्मा,विष्णु,महेश,देवयानाचीं दोन द्वारें राखणारे दोन कुत्रे,वैतरणा नदी उतरून पलीकडे घेऊन जाणाऱ्या नावेस नौर किंवा भाडें (freight) भरण्याकरितां मृतांना द्यावी लागणारी गाय,या सर्व चिन्हांनीं अंकित असें आकाशस्थ तारकापुंजात्मक श्रीदत्तगुरूंचे हुबेहुब अत्यंत मोहक मूर्तिमंत स्वरूप पूर्णपणें दृक्प्रत्ययास येतें. यावरून त्रिमुखी दत्तगुरु हे केवळ भूगोलांतील सर्व प्रदेशांत व्याप्त आहेत असें नाहीं; ते खगोलांत अतएव अखिल विश्वांत व्याप्त आहेत असें सिद्ध होतें. " ओरायन " च्या अभावीं खगोलांतील या रम्य दत्तगुरुमूर्तीच्या अलौकिक प्रभुलीलेचा पत्ताही लागला नसता व ही मूर्ति आकाशाच्या कुशींत आणखी किती असंख्य कालपर्यंत अडकून पडली असती कोण जाणे ! ! ! ओरायनकारांनीं या बाबतींत सर्व ज्ञात जगास निःसंशय अत्यंत ऋणी करुन ठेविलें आहे. ११ तमाशा=खेळ व खेळास ग्रासून टाकणें म्हणजे प्रलयकाळीं त्रिमुखाचें पुन्हा एकच मुख धारण करून बसणें =खेळ संपविणें.

330

टाळी महाराजः—

दत्तचिदीश्वर साईराज। विरिंचि हरिहर श्रीगणराज.

( त्याप्रमाणें नामघोष १० वेळ करावा )

श्रीसच्चिदानंद सद्गुरु दत्तमहाराज की जय।

" " " ज्ञानेश्वर महाराज " "

" " " साईनाथ महाराज " "

" " " सर्व साधुसंतमहाराज " "

श्रीकालाग्निशमन दत्तप्रभूस हार घालणें व बुका लावणें.

## आकाशस्थ दत्तगुरुचरणकमलांतील मकरंद खाण्यांत बालभृंगाचें लौलुप्य

( बुका लावण्याच्या वेळीं म्हणण्याचें पद. )

२२ पद. राग हमीर-कल्याण: ताल त्रिवट

( ब्रम्ह पाहिलें० या चालीवर )

ओरायन[1] बोलें। अहाहा ओरायन बोलें ॥
अगणित निशिदिनिं कुशिं[2] सांकडली[3]। प्रणवरूप[4] दत्तगुरु मूर्ति ही।
नीलांबरें[5] खोलें[6] ॥ अहाहा ॥ ध्रु. ॥
वेदराशि हे बहुवस भाग्यें। नक्षत्रोदरिं शिरुनी धैर्यें। श्वंङ्गो[7] होउनि

---

१ ओरायन हा ग्रीक शब्द आहे. हा मूळ आग्रहयण या संस्कृत शब्दावरून झाला आहे. आग्रयण हें मृगशीर्ष नक्षत्रपुंजाच्या आग्रहायण या नांवाचें मूळ स्वरूप आहे. आग्रहायण हें मार्गशीष महिन्याचें नांव आहे. २ पोटांत. ३ अडकून राहिली. ४ ओंकाररूप म्हणजे अ, उ, म रूप म्हणजे अ=तमोगुण, उ म्हणजे रजोगुण व म=सत्व गुण. तमाची देवता शंकर, रजाची ब्रह्मदेव, व सत्त्वाची विष्णु म्हणजे प्रणवरूप ओंकारांत दत्तरूप भरलेलें आहे. ५ निळे रंगाचें आकाश. ६ प्रकट केले. ७ श्वन् कुत्रा व गो=गाय.

अति चातुर्यें। सन्निध त्यां[1] ठेले। प्रभूच्या, सन्निध त्या ठेले हरीच्या,।
देवाच्या अगणित निशिदिनिं० ॥ १ ॥

नैसर्गिकि ही अगम्य लीला। दावित साई-शंकर भोला। निरखुनि
वाटे मोद मनाला। विद्वज्जन डोले ज्योतिर्विद, डोले
प्रेक्षकजन, साधूजन। अगणित निशिदिनिं ॥ २ ॥

आकाशाच्या ब्रह्मानंदीं। साई[1]दत्तांघ्रीं[2] अरविंदीं[3]। बालाली[4] मन मधु[5]
म[6]करंदीं। गुंगचि हो झालें। लुब्धचि हो झालें
मग्नचि, दंगचि। अगणित निशिदिनीं ॥ ३ ॥

पूर्वरंग समाप्त

---

१ त्या दत्तप्रभूजवळ. २ दत्तचरण. ३ कमलीं. ४ बालभृंग, मधुकर, षट्पद=भुंगा५ गोड. ६ मध.

331

# उत्तररंग-आख्यान प्रारंभ

## श्रीसाईदत्तगुरुचरित्र लीला वर्णन करण्यांत बालाचा अनधिकार

२३ मंदाक्रांता

क्वाऽसौ श्रीमानतुल भगवान्साइचिच्चक्रवर्ती
क्व श्रीसाईचरितजलधि दुंस्तरोऽनंतपारः ॥
क्व श्रीलीला गहनमधुरास्तस्य कल्लोल मालाः ॥
क्वाऽयं बालः प्रकृतविषये दीन शून्याधिकारः

**अर्थः**—ज्ञानसम्राट् (बादशहा) श्रीमंत, अनुपमेय, षड्गुणैश्वर्य भगवान श्रीसाईदत्तगुरु कोणीकडे ! अमर्याद व तरून जाण्यास कठीण असा श्रीसाईदत्तगुरुचा चरित्ररूपि समुद्र कोणीकडे ! त्याच समुद्राच्या श्रीसाइदत्तगुरूंच्या गूढ व गोड रसाळ लीलारूपि लाटांचा समुदाय कोणीकडे ! व श्रीसाईदत्तगुरूंचें जन्माख्यान वर्णन करण्याचा जो हल्लींचा प्रसंग त्यांत दरिद्री व अनधिकारी हा बाल कोणीकडे !

परंतु परमात्माचेच मनांत आल्यावर काय होत नाहीं !

२४ अभंग

आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना

(तु. गाथा ३१०६)

विश्वखेळास प्रारंभ करितें वेळीं प्रथम चार लोक व आठ लोकपाल (दिक्पाल) निर्माण केले.

## श्रुति : मंत्र २-३

सइमाँल्लोकान सृजत । अंभो मरीची मर मापोऽदोंऽभः
परेण दिवं द्यौ प्रतिष्ठांतरिक्षं मरीचयः । पृथिवी मरो या
अधस्तात्ता आपः ॥ २ ॥

सइक्षतेमेनु लोका लोकपालानु सृजाइति । सोऽद्भयः
एव पुरुषं समुद्धृत्या मूर्छयत् ॥ ३ ॥

—ऐतरेयोपनिषद् प्र. अध्याय, प्र. खंड

२५ अनुष्टुभ्

इंद्रो वन्हिः पितृपतिः । नैऋतो वरुणो मरुत् ॥
कुबेर ईशः पतयः । पूर्वादीनां दिशां क्रमात् ॥

—अमरकोश प्र. कांड, श्लोक ८५

नंतर मानसपुत्र, सात ऋषि व चार मनु निर्माण केले.

२६ अनुष्टुभ्

महर्षयः सप्त पूर्वे । चत्वारो मनवस्तथा ॥
मद्भावा मानसा जाता । एषां लोक इमाः प्रजाः॥

—श्री. भ. गी. अ. १०, श्लो. ५

## अत्रींचा जन्म योग्यता शक्ति व विद्वत्ता

२७ स्रग्धरा

पूर्वी सप्तर्षि, चारी मनु मग सृजिले, मानसापासुनीया[1] ॥
निर्माया विश्व ईशें, निज, अतुलें[2] बलैश्वर्य[3] ही दाउनीया, ॥

१ मनापासून (परमात्माचा) यांनाच मानसपुत्र किंवा प्रजापती म्हणतात. २ विलक्षण, अलौकिक. ३ शक्ति व मोठेपणा.

332

सप्तर्षींमाजि अत्री, ग्रहिं[1] जणु रवि जे, वन्हि[2] जन्म प्रदाते ॥
ऋग्वेदाथर्व [3]सूक्त, [4]स्मृति इति विविध, ग्रंथराज[5] प्रणेते[6] ॥

२८ पृथ्वी

ऋषीवर मरीचि, अंगिरस, रत्न अत्रि, क्रतु, ॥
वशिष्ठ, हि पुलस्त्य, वै पुलह, सप्त नाँमांकितु ॥
प्रसिद्ध[7] मनु चार त्या मधिल [8]आद्य [9]स्वायंभुवा ॥
[10]स्वरोचिष हि औत्तमी विबुध[11] तामसा[12] भैरवा ॥

## अनसूया मातांचें कुल, जन्म व योग्यता.

२९ दिंडी

मनूमाजी स्वायंभु मनु विराजे । देवहूती कन्यका तया साजे ॥
देवहूती [13]परिणिली कर्दमासी[14] । कपिल[15] अनसूया [16]अपत्यें तयासी॥

३० आर्या

श्री रुक्मिणि मातुःश्री, चूडालांबा[17] अरुन्धती[18] जननी
सम[19] अनसूया माता [20]यन्नामैव [21]क्षमाघ-अरि-हननीं ॥

---

१ ग्रहांमध्यें म्हणजे रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु, केतु, य नवग्रहांत. २ अग्नीला जन्म देणारे. ३ वेदमंत्र. ४ परंपरागत कायद्याचें पुस्तक किंवा कायद्यांच्या नियमाचें पुस्तक. ५ विश्ववंद्य नाना कारचे राष्ट्रधर्मग्रंथ. ६ करणारे, रचणारे. ७ प्रख्यात. ८ पहिले. ९ स्वायंभू. १० स्वारोचिष. ११ ज्ञानी, सुज्ञ. १२ तामस नांवाचे परंतु अ=नाहीं. भैरव=रागीट, क्रोधी. रागीट नाहींत म्हणजे शांत. १३ लग्न लागलें. १४ प्रजापति कर्दम महामुनी १५ कपिल महामुनी ( सिद्धानां कपिलो मुनिः—श्री. भ. गी. अ. १० श्लो. २६) १६ मुलें. १७ शिखीध्वज राजाची राणी. १८ वशिष्ठ ऋषींची पत्नी. १९ सारख्या. २० ज्यांचें फक्त नांव. २१ क्षम=समर्थ; अघ=पातक, अरि=शत्रु; हननीं=नाहींसें करण्यास=पातकरूपि शत्रूंचें निर्दालन करण्यास ांचें केवळ नाव समर्थ.

३१ आर्या

सुगुणा, सुजना, सुभगा, सति साध्वी सुंदरा सुशीलाऽर्या[1] ॥
अचला[2], अनघा[3], अमला[4], अनसूया अत्रि अंगना[5]ऽचार्या[6] ॥

## अत्रि व अनसूया यांच्या लग्न-पत्रिकेचें अद्वितीयत्व

३२ मालिनी

घँटित वधुवरांचें अद्वितीयं त्रिलोकीं[9] ॥
मिळति सुगुण छत्तीसैकराशी[10] विलोकीं[11] ॥
[12]म्हणुनिरत सदा जीं[13] प्रेम आनंदजाळीं[14] ।
परि हृदिं[15] शिशुचिंता[16] नित्य चित्तास जाळी[17] ॥

## अनसूयामातांची उद्विग्नता; दुःखनिर्वेदनश्लेषगर्भ भाषण, व तपश्चर्येकरितां पर्वतावर जाण्यास अत्रिऋषींना प्रेमाची विनंती

३३ पद ( उद्धवा शांतवन० या चालीवर )

वल्लभा शांत मन करुनी । परिसावी माझी विनती ॥
प्रार्थिते हस्त जोडोनी । दासीची चरणीं प्रणती[18] ॥ ध्रु० ॥
तुम्हि प्रजापति[19] ऐसी ख्याति[20] । परि संज्ञा[21] सार्थ[22] न दिसती ॥१॥

---

१ श्रेष्ठ. २ स्थिरबुद्धीची. ३ निष्पाप. ४ निर्मळ. ५ स्त्री. ६ उपदेश करण्यास योग्य. ७ लग्नपत्रिका. ८ असाधारण. ९ त्रैलोक्यांत. १० एक राशि. ११ पहा. १२ मग्न. १३ तीं दोघें. १४ जाळ्यांत. १५ अंतःकरणांत. १६ पुत्र. १७ जाळीत असे. १८ नमस्कार. १९ प्रजा उत्पन्न करणारे. २० कीर्ति. २१ पदवी, नाव. २२ खरे, अर्थपूर्ण.

संततीविण तुमची युवती[1] । जन सारे तुम्हा हसती ॥ २ ॥
ज्या पुत्रवती कीं युवती । त्या मजला वंध्या[2] म्हणती ॥ ३ ॥
हे बोल शल्यासम[3] खुपती । परि खंति न तुमचे चित्तीं ॥४॥
चालः—हे बोल कितीतरी साहूं[4] । प्रियकरा हिमाचलिं[5] जाऊं ॥
दृढ[6] तपें प्रभूला आळवूं
चालः—करुणाघन[7] विभु तैं[8] सन्मुख[9] येती वर्षति[10] येती वर्षति॥
मग [11]कलंक-मल धुवुनी जाती ॥ ५ ॥ वल्लभा शांत ॥

## अनसूया माता तपश्चर्येस जाण्याचें कारण सांगतात

३४ ओंवी

पैं सृष्टीचिया उपक्रमा[12] । पूर्वीं गा वीरोत्तमा[13] ।
वेडा ऐसा ब्रह्मा[14] । एकला होता ॥ ३२६ ॥

३५ ओंवी

मज ईश्वरातें नोळखे । ना सृष्टी हीं करूं न शके
तो थोरू केला एकें । नामें[15] येणें ॥ ३२७ ॥

श्रीज्ञानेश्वरी अ. १७ ओं. ३२६-३७

## अनसूया मातांची समजूत व त्यांच्या म्हणण्यास अत्रींची संमति.

३६ दिंडी

प्रिये प्राणेश्वरि खिन्न नको होऊं । अद्रि राजें[16]च्या उच्च शिखरिं जाऊं ॥

१ बायको. २ वांझ. ३ काट्याप्रमाणें. ४ सहन करूं. ५ हिमालयावर. ६ घोर. ७ करुणारूपि पाण्यानें भरलेला मेघ. ८ त्या वेळीं. ९ समोर. १० वर्षाव करील. ११ कलंक=डाग; मल चिखल. आपल्या कपाळावरील डागरूपि चिखल. १२ प्रारंभाचे वेळीं. १३ अर्जुना वीरश्रेष्ठा. १४ ब्रह्मदेव. १५ फक्त देवाच्या एका नांवानें म्हणजे तपश्चर्येनें. १६ हिमालयाच्या.

वृक्षमूलीं पाषाणं[1]तली राहूं । तॉप,[2] [3]वृष्टी, अति शीतं[4] सुखें साहूं ॥

३७ दिंडी

पिऊं निर्झर[5] जल कंदमुळें खाऊं । तपाचरणें जगदीश चरण सेवूं ॥
[6]ईशाविस्मृत्यपराध पदरिं[7] घेऊं । देवकृपया लोकां[8]ना धुवुनि दावूं ॥

उभयतां अत्री व अनसूया माता तपश्चर्येस जातात

२८ घनाक्षरी

उभयहि गेलीं ऋक्षशृंगा[9] । आळवूनी श्री रुक्मिणिरंगा[10]
असंगसंगा,[11] भवभयभंगा[12] । वश करुनी घेती ॥

दत्तगुरूंचा योगिराजनामक प्रथमावतार.

३९ आर्या

तपसामर्थ्यें [13]आदिम दत्तगुरूयोगिराज अवतरले
सन्मुख दोघांपरी ते स्त्रीगर्भजशिशुसुखासि[14] अंतरले[15] ॥

## दर्शनापासून आनंदाऐवजीं अत्रींस असमाधान मात्र वाटलें.

४० शार्दूलविक्रीडित

[16]स्फाटीकी तव रम्य मूर्ति बघुनीवाटे समाधान ना ॥
राहे मच्छुभ पुण्य पत्नि जठरीं[17] यावत्[18] सुताधान[19] ना ॥

---

१ दगड. २ ऊन. ३ पाऊस. ४ थंडी. ५ झऱ्याचें पाणी. ६ ईश्वरास विसरण्याचा अपराध गुन्हा, प्रमाद. ७ कबूल करूं. ८ जगाला. ९ ऋक्ष नांवाच्या शिखरावर. १० पांडुरंग, विष्णु. ११ असंग=वैराग्य; संग=संगती=वैराग्य आहे संगतीला ज्याच्या, अशा वैराग्यशील पुरुषाचा सोबती. १२ भव=संसारभय=भीति, भंग=नाश=संसार भयाचा नाश करणारा. १३ प्रथम. १४ स्त्री=बायको, गर्भज=गर्भापासून उत्पन्न झालेला; शिशु=मुलगा=स्वतःच्या बायकोच्या गर्भापासून झालेल्या पुत्रसुखास. १५ मुकले=या दर्शनाने त्यांना प्रत्यक्ष पुत्रसुख मिळालें नाहीं. १६ स्फटिका प्रमाणें तेजस्वी. १७ पोटीं. १८ जोंपर्यंत. १९ पुत्रगर्भ.

३३५

दुग्धेछा कशि तृप्त होईल वदे अप्[1]पिष्ट संमिश्रणें[2] ॥
किंवा कांच करील काय मनिषा[3] पूर्ती[4] मण्यो[5] कारणें ॥

## अनसूया मातेला आनंदाऐवजी संताप

### ४१ पद

किति किति किति कपट करिशि कुटिल[6] केशवा ॥
मधु मधु मधु मधुर मुखर[7] मलिनें[8] माधवा ॥
रम रम रम रमसि रहसि[9] रुदसि[10] राघवा ॥
वद वद वद विमल[11] वचन विफलवैभवा[12] ॥

## दोघेंही रागावून पण निराश न होतां पुन्हा अति घोर तप करितात.

### ४२ पद. ठुमरी ( जलभरन जात या चालीवर )

जाणुन देत, न सत्फल केशव[13] कल्पतरू किल कल्पित[14] काले ॥
त्या रुषिता ऋषिदंपतिनीं मुहु[15] वर्षशतोग्र[16] तपा तपियेले[17] ॥
त्याच गिरिवर[18] त्याच शिखावरि[19] पुण्यजलें परमाख्य[20] सुतीर्थी ।
कृच्छ्रबलें[21] मग अत्रि शिरांतुनि[22] भीषण तेज निघे परमार्थी[23] ॥

## घोर तपाचा परिणाम

### ४३ शालिनी

ना त्रैलोक्या चंड[24] तें तेज साहे । त्रैमूर्तींच्या[25] संश्रया[26] विश्व पाहे ॥

---

१ अप्=पाणी, पिष्ठ=पीठ. २ उत्तम मिश्रण. ३ इच्छा. ४ पूर्ण. ५ रत्नाची. ६ अप्रामाणिक. ७ बोलका, वाचाळ. ८ दुरात्मा, पातकी. ९ एकांतांत. १० रडतोस. ११ खरे. १२ व्यर्थ ऐश्वर्य. १३ परमात्मा कल्पवृक्ष. १४ निश्चित. १५ पुन्हा. १६ शंभर वर्षे उग्र तप. १७ केले. १८ पर्वतावर. १९ शिखरावर. २० परम नांवाच्या. २१ तपाच्या शक्तीनें. २२ भयंकर. २३ परमात्मप्राप्ति करून देणारे, परमात्मरूप पुत्रप्राप्ति करून देणारे. २४ भयंकर. २५ ब्रम्हा, विष्णु, महेश. २६ आश्रयाकरितां.

[1]नामोकारा देउनी [2]त्यासि, गेले । [3]ब्रम्हाजेशा अत्रिच्या [4]पर्णशाले ॥

## अत्रींचा त्रैमूर्तीस प्रश्न

### ४४ साकी

करीत असतां ध्यान निरंतर मी एकचि देवाचें ॥
कोण तुम्ही कां तिघे आला ? हें सांगा आपुल्या शुभ वाचें ॥
विस्मित होउनी, अत्री पुसती कर जोडुनी ॥

## अत्रींच्या प्रश्नास त्रैमूर्तींचें उत्तर

### ४५ पद ( प्रीति जी दुजावर मोठी० या चालीवर );

ज्यों एका चिंतिसि[6] चित्तीं । तोचि एक आम्ही निश्चांतीं[7] ॥ मुनिवरा ॥ धृ.
जगिं एकचि वायु असतो । परि देहीं दशविध[8] बनतो ॥ मुनिवरा ॥ १ ॥
उत्पत्ति[9] स्थिति[10] लय[11] [12]कार्या। आम्हि एकचि त्रित्वें[13] नटतों॥ मुनिवरा ॥२
चाल–आम्हि जरी तिघे । भेद[14] ना दिघे । द्वैत[15] तूं न घे । धरुनि मनिं शांती ।
धरुनि मनिं शांति । तूं ध्यायि एकचि एक एकांतीं ॥ मुनिवरा ॥ ज्या ॥ ३

नंतर ह्या त्रिमूर्ति अत्रीवरद नामक दत्तगुरूंचा दुसरा
अवतार घेऊन अत्रि व अनसूया माता यांच्यापुढें
उभें राहून वर मागा म्हणून सांगतात.

### ४६ कटाव

ऐसें देवत्रय तें वदलें, वदुनी अंतर्धान पावलें, पावुनि मग त्या त्रै तींनी एकामाजी विलीन होउनि पुनरपि बनुनी एकचि मूर्ती, तप्त[16]

---

१ अभयाला. २ विश्वाला. ३ ब्रम्हदेव. अज=विष्णु, ईश=महादेव. ४ पानांची झोपडी. ५ एका देवाचें. ६ चिंतन करतास. ७ निसंशय. ८ दहा प्रकार. ९ उत्पन्न करणें १० पालन करणें. ११ संहार करणें. १२ कामाकरितां. १३ तीन प्रकारें. १४ फरक. १५ दुजाभाव. १६ तापलेल्या सोन्याच्या कांतीप्रमाणें.

335

कनकरुचि, नील माणिश्री[1] नक्षत्रासम कायाकांती[2] शश्वच्छांती[3] सत्सं-पत्ती,[4] मंदस्मितमुखें[5] विश्वविरक्ती, माणिकमाला[6] कांतकमंडलु[7] डाम,[8] डमरू, त्रिशूल त्रिगुणी[9] चक्र चकाकी,[10] कंबु[11] केतकी, एवंगुण अयुधान्वित[12] षडभुज,[13] जगसंरक्षक मंडित दक्षिण[14] अंग विलक्षण. विमोह विभ्रम, विध्वंसक[15] वर,[16] वामांग[17] विमल[18] विभु[19] साक्षाद्दत्तगुरु श्री अत्रीवरद द्वितीय, अवतार घेउनी, प्रगट होउनी ऋषिदंपतिच्या येउनी पुढती, उभे राहती, म्हणती रे रे दंपति सिंहा, प्रचंड तुमची तप संपत्ती पाहुनि भुललों, प्रसन्न झालों, त्रैलोक्यामधि, दुर्लभ वर जो मागा मागा, देत तुम्हां तो ॥ प्रेमें वंदावा ॥ जगवंचक तो, जगदुद्धारक तो, अत्रीवरद प्रभु तो ॥१॥

अत्रीवरदांच्या दर्शनानें अत्रींचें समाधान झालें नाहीं, पण दत्तगुरूंच्या आग्रहास्तव त्यांनीं वर मागून घेतला.

४७ मंदाक्रांता

[20]देवोक्तीला, परिसुनि मुनी, पाहुनी आदरानें ॥
[21]वामांगीच्या [22]वदन विधुला, प्रेम उत्सुकतेनें ॥
प्रार्थी ईशा[23] जरि तुम्हि वरा देतसा हो आम्हानें ॥
द्यावा तुम्हांसम[24] सुतम[25]णी उद्धरी जो जगानें ॥

---

१ नील रत्नाचे शोभेप्रमाणें. २ शरीर ३ अखंड शांती. ४ सत्य हेंच धन. ५ गालांतल्या गालांत हसणें. ६ माणिक रत्नाची माळ. ७ सुंदर. ८ सुरेख. ९ सत्व-रज-तम दाखविणारा. १० चकाकणारें. ११ शंख. १२ शस्त्रांसहित १३ सहा हात. १४ उजवा. १५ नाश करणारा. १६ श्रेष्ठ. १७ डावे अंग. १८ शुद्ध. १९ परमात्मा. २० अत्रीवरदांच्या मुखांतून निघालेल्या वाणीला. २१ अर्धांगी, स्त्री. वाम=सुंदर आहे अंग=शरीर जिचें ती=स्त्री. २२ वदन=मुख, तोंड, चेहरा; विधु=चंद्र=चंद्रासारखें मुख आहे जिचें तिजकडे. २३ अत्रीवरद प्रभुला. २४ तुमच्यासारखा. ५२ पुत्ररत्न.

अत्रीवरदांच्या दर्शनानें अनसूयामातेला उलट जास्त संताप झाला.

४८ पद (व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं० या चालीवर)

निष्फल जाहलीं चंड[1] तपें ॥ ध्रु० ॥

कवणासाठीं षड्भुज रुपडें ? । कपट तुझें न छुपे । अरे देवा कपट० ॥१॥
भरलें मंदस्मित तव जेहरें[2] । जगिं न कदापि लपे । अरे देवा जगिं ॥ २ ॥
नटनें[3] शाठ्य[4] शीलें[5] तुझें हें । मम हृदिं[6] फार खुपें । अरे देवा मम ॥ ३ ॥

अत्री अनसूयामातेची पुन्हा समजूत करतात.

४९ दिन्डी

परुष[7] वचनें[8] भामिनी[9] त्या[10] न [11]ताडी । [12]दैन्य रोषा[13] नच घे न [14]आस सोडी ॥
इष्ट वर तो[15] देत कीं कसें पाहूं । तपः सिद्ध्यै[16] अतिकाल[17] अधिक साहूं ॥

दत्तगुरूंनीं तृतीय दत्त अवतार घेऊन बालरूप धारण केलें.

५० घनाक्षरी

[18]कठोर [19]तपसा मोहुनि गेलों । मी मज तुम्हा स्वयं[20]च दिधलों[21] ॥
अधीन[22] होउनि बाल जहालों । इच्छेस्तव तुमच्या ॥

या बालरूप दत्तदर्शनानें समाधान न होतां इतके जरी शांत तरी अत्रींना फारच वाईट वाटलें व तेही रागावले.

---

१ घोर, भयंकर. २ विषानें. ३ नटणें. अवतार घेणें. ४ शठपणा, लुच्चेगिरी करणें. ५ स्वभाव, धंदा. ६ अंतःकरणांत. ७ कठीण. ८ शब्दांनीं. ९ रागानें लाल झालेले स्त्रिये. १० त्या परमात्माला. ११ प्रहार करूं नको, मारूं नको. १२ विचार-दारिद्र्य, खिन्नता. १३ राग. १४ आशा. १५ तो परमात्मा. १६ तपाची सिद्धि होण्या-करतां. १७ उशीर, जास्त उशीर. १८ घोर, भयंकर. १९ तपानें. २० स्वतःलाच २१ देऊन टाकलें आहे. २२ तुमच्या स्वाधीन.

५१ साकी

पाहुनि मोहक बाल [1]दिगंबर दत्तरूप मुनि शिणला
म्हणे न घेसा औरस सुत जंव मिळे, न सोडूं[3] कृच्छ्राला[4] ॥
चल उठि प्रिय दयिते[5] । आचरुं[6] भीम तपा परतें[7] ॥

या बालरूप दत्तदर्शन हुलकावणीनें अनुसूया मातांच्या संतापाची तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली.

**५२ पद** (आतां बघ जाते, आतां बघ जाते० या चालीवर)

ठका[8] यदुराया, ठका यदुराया । कां शिणविशि माझी काया ॥धृ
ठकविशि अनुदिनि[9] कितीतरि बाया। शिशुविण सुकविशि त्यांची काया
धाडिसि त्यांना वन सेवाया । मिरविशि प्रभुपण वाया ॥ कां शिण ॥१
ब्रं[10]ह्मा तव पद सेवक देवा । निर्मित निशिदिनिं अगणित जीवा
लक्षवरी तव गृहिं शिशू ठेवा[11]।शिशु दुष्काळ आम्हा खाया ॥कां शिण॥२
मुनिवर अत्रिऋषींची जाया । कर्दम देवहुतींची तनया ॥
कपिल महामुनि बंधूराया । मी पतिव्रता अनसूया ॥ कां शिणविशि ॥३

तुझ्यासारख्या शिफारसी आमच्याजवळ पुष्कळ आहेत; प
त्यांना विचारतो कोण ? असें यदुरायप्रभु अनसूयामातेला म्हणाले.

५३ ओवी

घरीं चाले ज्ञानेश्वरी । [12]गृहिणी संसार चिन्ता करी ॥
अ[13]मर-सिंह मरणाघरीं[14] । लक्ष्मी[15] वेंचीत गोंवऱ्या॥

---

१ नग्न, नागवें. २ वाईट वाटलें व राग आला. ३ आम्ही सोडणार नाहीं. ४ तपा, तप करण्याचें ( सोडणार नाहीं ). ५ स्त्रिये. ६ भयंकर ७ पुन्हा. ८ लुच्चा, फसव्य दुष्टबुद्धे, दुरात्मा, खला. ९ दररोज. १० ब्रह्मदेव. ११ संचय, सांठा. १२ बायको. १ अमर=देव; सिंह=श्रेष्ठ=इंद्र किंवा मरण नाहीं ज्याला, त्यांत श्रेष्ठ असें नुसतें नांव. १ यमाच्या घरीं=मरतो, यमसदनास जातो. १५ फक्त लक्ष्मी हें नांव. नांवाची लक्ष्मी-ख नाहीं.=असल्या नुसत्या नांवाच्या शिफारसी काय कामाच्या ?

७४ अनुष्टुभ्

यस्य माता पिता सिंधुः । बंधुर्यस्य सुधाकरः
इंदिरा भगिनी यस्य । आवुत्तः कमलापतिः ॥

७५ अनुष्टुभ्

कामधेनोः पयः पानं । नित्यं पीयूष भोजनम् ॥
तथापि भ्राम्यति पृष्ठे । जंगमस्य सदा दरः

वरील दृष्टांत देऊन देवांनीं आपली थट्टा केली असें पाहून
नसूया मातेच्या अंगाची संतापानें लाही लाही झाली व तुला
ाझ्या पोटीं जन्म घ्यावयास लावीन व माझ्या पायां पडावयास
ावीन अशी त्यांनीं प्रतिज्ञा करून देवास तंबी दिली.

५६ पद ( मागील पुढें चालू )

प्रसन्न करुनी घेइन श्रीहरि । दाविन तपशक्तीची थोरी ॥
ुरि देइन रे तव हस्तावरी । घेइन शिशु[1] जग ताराया ॥ कां शिण ॥४॥
कारागृहिं[2] तुज, धाडिन जठरीं[3] । कोंडिन गर्भाशयं[4] तमकुहरीं[5] ॥
चिविन[6] मलमू[7]त्राग्नी भीतरि[8] । कृमि[9] येतिल तनु[10] तोडाया । कां शिण ॥५॥
शिक्षा देइन नव मासांची । मुंडी[11] घालिन करिं[12] पदिं[13] साची ॥
कबुली घेइन अपराधांची । बाहिर अणुनी पडविन पाया ॥ कां शिण ॥६॥

पूर्वीं दोन वेळां केलेल्या तपापेक्षां या वेळीं पुन्हा अति भयंकर
तप करूं व तो देव औरस पुत्र कसा देत नाहीं तें पाहूं असें अनसूया
माता अत्रींना म्हणाल्या.

१ मुलगा. २ कैदखान्यांत. ३ पाटांत. ४ गर्भाच्या ।पशर्वीत. ५ अंधारकाळ्या.
६ उकडून काढित. ७ विष्ठ, मूत्र व अग्नि. ८ आंत. ९ किडे. १० शरीर. ११ डोकें. १२
हातांत. १३ पायांत.

३३७

५७ दिंडी

एक पायावर देहभार[1] वाहूं। [2]लोहपिष्टाशन शरदिं[3] जलें राहूं।
ग्रीष्मि[4] पंचाग्नी,[5] प्रावृषीं वृष्टि[6] साहूं। [7]कसा नच दे हरि कुछफला[8] पाहूं

अनसूयामातांच्या म्हणण्यास रुकार देऊन अत्रि ऋषि
आपल्या घरींच अत्यंत भयंकर तप करूं लागले.

५८ प्रहर्षिणी वृत्तम्

प्रारब्धं कठिनतरं तपः प्रतप्तुं। स्वागारे पुनरपि चर्दि दंपतीभ्याम्।
उद्भूतो मुनिवर मस्तकेऽपि काले। कालाग्निः प्रखरतरोऽह्यसह्यतेजः॥

**अर्थः**—त्या ऋषिदंपतींनीं पुन्हा आपल्या पर्णकुटिकेंतच ( घरीं ) अत्यंत भयंकर तप ( तिसरे वेळीं ) करण्यास सुरवात केली. नंतर कांहीं कालांनीं मुनिश्रेष्ठ अत्रींच्या मस्तकांत सहन करण्यास अशक्य व अत्यंत दाहकारक असा कालाग्नी ( काळाचा, यमाचा नाश करणारा ) उत्पन्न झाला.

तपापासून उत्पन्न झालेल्या अग्नीचा परिणाम.
अत्रींच्या प्राणावर संकट.

५९ पद. ( होइल कलह म्हणोनी० या चालीवर )

कृच्छ्रें सुचे नच कांते। सर्वांगाची लाही होते॥ कृच्छ्र सुचे॥ धृ०॥
वृश्चिक[10] दंश प्रबल[11] वेद[12]ना। प्रलय[13]ाग्नीच्या प्रखर[14] यातना॥

---

१ शरीराचें ओझें. २ लोखंडाच्या पिठाचें भोजन. ३ हिंवाळ्यांत. ४ उन्हाळ्यांत. ५ चार बाजूस चार आग्निकुंडें पेटविलेलीं व डोक्यावर प्रखर सूर्य. ६ पावसाळ्यांत. ७ पाऊस. ८ तपफल=औरस पुत्र. ९ तप. १० विंचू. ११ कठीण. १२ शिणका. १३ जगाचा नाश होण्याच्या वेळचा अग्नि. १४ भयंकर दाहक.

होतो मम जीवाते । साहूं कैशा ? वाटे आतां, जातिल प्राण लयाते
॥ कृच्छ्र ॥ १ ॥

अनसूयामाता देवाचा धावा करतात.

६० पद. ( कवणे तुज गांजियलें० या चालीवर )

धाव धाव पवन जैवें दत्त श्रीहरी । प्राणेश्वर प्राण रक्षि विघ्न
तूं हरी ॥ धृ० ॥

ताडियलें कटुकवँचें रोषें ना धरी । केले अपराध बहू, तूं क्षमा
करी । धांव ॥ १ ॥

परमात्मा स्वतःच वायु व मेघ बनून अत्रींच्या शरीरांत
शिरून त्यांचा दाह शांत करतात व अत्रींच्या
नेत्रांतून एक दिव्य व भयंकर तेज
बाहेर पडतें.

पद ६१ ( जलभरन जात जमुनाके घाट० या ठुंबरीचे चालीवर )

शीतल, मंद, सुगंध समीरण, करुणामृत घन श्रीहरि बनले ॥ धृ० ॥
मुनितप दावानल शमनार्थ[11] वृष्टी करण्या ऋषिहृदिं शिरले ॥ १ ॥
प्रशांत, प्रमुदित, प्रसन्न होउनी सकामतेनें अति अवलीलें[12] ॥ २ ॥
ऋतुमति, रूपवती, रुचिरा[13] सति कामिनी मुख मुनि अवलोकियले ३
तत्क्षणिं दिव्य सुतेज भयंकर मुनी नयनांतुनि बाहिर पडलें ॥ ४ ॥

तें तेज पाहिल्याबरोबर अनसूया मातांना अत्यानंद झाला. त्यांनीं तें तेज वरच्यावर झेलून आपल्या पोटांत सांठवून ठेविलें.

६२ पद ( उद्धवा शांतवन कर जा० या चालीवर )

तें तेज पाहुनी झाली । ऋषिसुंदरी[14] हर्षित[15] भारी ॥ धृ ॥
करि कोण सहन जगिं बोले । अत्यद्भुत याची थोरी[16] १

---

१ नाहींसे होतील. २ वारा. ३ वेग. ४ कडू, कठीण शब्दांनीं. ५ राग. ६ वारा. ७ पाणी. ८ मेघ. ९ दाह. १० वणवा. ११ विझवण्याकरितां. १२ सहज, लीलेनें. १३ सुंदर. १४ स्त्री. १५ आनंदित. १६ सामर्थ्य.

३३४

जाळील विश्व हें आतां । विश्वासी न दिसे त्राता[1] २
विधि[2] हरीहरांच्या कांता[3] । शकती त्या[4] स्पर्श न करतां ३
जाहल्या विगलित[5] अहंता[6] । भीत्या[7] निज[8] कवळिति कांता[9] ४
चालः—विश्वाची कींव[10] बहु आली । विश्वोदरि[11] जगदंबा उठली ।
तें तेज वरचेवर झेली
चालः—झेलूनि अनसूया साठवि आपुल्या [12]जठरीं । आपुल्या जठरीं ।
जशी [13]नीलकंठ—अश्रु[14] ती [15]मयुरी ॥ तें तेज ॥ ५ ॥

त्या तेजापासून अनसूया माता गरोदर राहतात.

६३ शार्दूलविक्रीडित

अत्रींची [16]रमणी [17]अतर्क्य करणी[18] साध्वींत चूडामणी[19]
राहे गर्भिणि तत्क्षणीं [20]शिखरिणी नक्षत्रि तारामणी[21]
[22]तेजोगर्भ [23]विवर्धिनी [24]अनुदिनीं जी अत्रि कंठामणी[25]
होती [26]दोहद तीस जी प्रसविणी सद्भक्तचिंतामणी[27]

---

१ त्राता, रक्षण करणार. २ ब्रह्मदेव, विष्णु, व शंकर. ३ बायका. ४ तेजाला. ५ गळालेला. ६ अभिमान, गर्व. ७ भयानें. ८ आपल्या. ९ नवऱ्यांना. १० दया. ११ विश्व हेंच पोट आहे जिचें. १२ पोटांत. १३ मोर. १४ आंसवें. १५ लांडोर. प्रभु रामरायांच्या शापामुळें मोरास नपुसकत्व आलें; परंतु मोर व लांडोर यांच्या प्रार्थनेवरून त्यांना नेत्रवीर्यापासून म्हणजे डोळ्यांतील असवांपासून गर्भ राहून संतति होईल असा उश्शाप मिळाला; तो खालीलप्रमाणेः-मज दुःखितातें देखतां । दोघें नाचती उन्मत्तता । तुज येईल नपूंसकता । अंग संगता तुम्हां न घडे ॥ ८८ ॥ ऐकोनिया शाप वचन । मयूर विनवी अति दीन । मयूरीनें धरिले चरण । शापमोचन श्रीराम वदे ॥ ८९ ॥ सीतेचे वियोगें जाण दुःखी होसी तूं रघुनंदन । आम्हा पक्षियांचा पाड कोण । दुःख दारुण पहावयासी ॥ ९० ॥ ऐसें ऐकोन मयूर वचन । श्रीराम जाला सुप्रसन्न । नृत्यमान सुखसंपन्न । चक्षुवीर्यें पूर्ण सुख तुम्हा ॥ ९१ ॥ भावार्थरामायण अरण्यकाण्ड, अध्याय. २३ १६ स्त्री. १७ अलौकिक. १८ कृति. १९ सर्व पतिव्रता स्त्रियांत मुख्य. २० उत्तम स्त्री. २१ चंद्र. २२ तेजरूपि गर्भ. २३ वाढविणारी. २४ दररोज. २५ गळ्यांतील ताइत. २६ डोहाळे. २७ सद्भक्तांचे मनोरथ परविणारा परमात्मा.

## अनसूयामातांना डोहाळे लागतात.

### ६४ शिखारणी

नको वाटे वेणी, परि शिरीं जटाभार बरवा ॥
नको वस्त्रें सूत्रें[1] त्रिगुणें[2] कटि[3] कौपीन[4] भगवा
नको लेणीं;[5] यज्ञोपवित[6] ग्रहणा[7] चित्त सरसें
असावें[8] वाटे कीं भजजवळि गोश्वानं[9] सरसें[10] ॥

## अनसूया मातांचे नऊ महिने पूर्ण भरून त्या प्रसूत होतात.

### ६५ ओंवी

भरले पूर्ण शुभ नव मास ॥ मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीस
रोहिणी नक्षत्र बुधवार दिवस ॥ चतुर्थ याम[11] ते वेळीं ॥

### ६६ ओंवी

द्वितीय मुहूर्त प्रदोषकाल[12] ॥ अनसूया माउली कुक्षि[13] प्रबल[14] ॥
श्रीकालाग्निशमन चिद्रत्न[15] बाल ॥ जगदुद्धारा प्रसवली ॥

## पुत्ररत्नमुख पाहून अनसूया माता मोहित होतात. त्याचें चुंबन घेतात, त्याला स्तनपान करतात व त्याला निजविण्याकरितां पाळण्याकडे घेऊन जातात.

### ६७ पद ( मनमोहन मूर्ति तुझी० या चालीवर )

तव सुप्रभ[16] तनु शकुल्या । मोहित किति नयनाला । मोहित किति
नयनाला । मोहित किती नयनाला ॥ धृ० ॥

---

१ दोरी. २ तीन पदरी. ३ कमरेला ४ लंगोटी. ५ दागिने. ७ धारण करण्यास. ८ धांवतें. ९ गाय व कुत्रें. १० सुंदर. ११ प्रहर. १२ सायंकाळ. १३ कूस १४ दांडगी १५ ज्ञानरत्न. १६ देदीप्यमान.

तुस न मुख मम बारे । चुंबु किती तव गाला । चुंबु किती तव गाला
चुंबु किती । तव गाला ॥१॥
वक्षोरुहे[1] उच्चवळले[2] । करि करि स्तन पानाला । करि करि
स्तन पानाला ॥ करि करि स्तन पानाला ॥
आद्य तत्वे[3] तूं पहिलें । परि मा[4] मज मानियले । परि मा मज
मानियले ॥ ३ ॥
परवी मम कोडें मुला । नेते तुज शयनाला । नेते तुज शयनाला ।
नेते तुज । शयनाला ॥ ४ ॥

## प्रभुदोला ( पाळणा )

( अजि अक्रुर हा० या चालीवर )

प्रभूला पाळण्यांत घालणें; पाळणा म्हणणें व हालविणें.

संविश संविश रे । बालशिशो परमात्मन् ।
आंदोलयामि दोल्यां त्वाम् ॥ध्रु०॥
मा मा मा रोदीः । गृहरत्न त्रिगुणात्मन् ।
इह तिष्ठन्ति भीमो जटिलः ॥ १ ॥
मा मा मा भैषीः । कुलभूषण जगदात्मन् । गायामि स्वापसंगीतम् ॥२॥
कालानलशमनः । प्रियवत्सक ते संज्ञा । तुर्यस्ते शुचिरवतारः ॥३॥
तव वपुरतिकांतं । पेलवममलं दृष्ट्वा । रतिपति रपि जिन्हेत्यंतम् ॥४॥
सद्यः क्षयी शशी । भूतः संपूर्णस्ते । संदृश्याननरुचिमतुलाम् ॥ ५ ॥
त्रिगुणातीतः सन् । अवतरसि मम कुक्षौ । जाने मे सफलं जननम् ॥६॥
श्रुत्वा श्रुतिमधुरं । जगदंबा गीतं गीतं । वीक्ष्यत्वामीक्षणसुभगम् ॥७॥

---

१ स्तन. २ वाहूं लागलें. ३ मूळ वस्तु=परमात्मा. ४ आई. ५ कौतिक, लाड.

सच्चिन्मोदघनं । बालं कारुण्यार्द्रं । नवमंगलमंदिरनभसि ॥ ८ ॥
नृत्यति बालशिखी । दत्तगुरो सानंदं । बालेशं नत्वा सततम् ॥ ९ ॥

**अर्थः**—हे बालरूप धारण केलेल्या पुत्र परमात्मा, निज रे,निज, निज रे निज. तुला पाळण्यांत घालून झोके देतें.हें घर शोभिवंत करणाऱ्या सगुण बालरत्ना, रडूं नको, रडूं नको, रडूं नको बरं. इथं एक भयंकर झिंज्या पसरलेला बागुलबुवा उभा आहे. हे कुळभूषण जगदात्मा, भिऊं नको, भिऊं नको, भिउं नको बरं, मी तुला झोंपेचीं सुंदर गाणीं म्हणतें. माझ्या लाडक्या बाळा, तुझा शुद्ध चवथा अवतार असून तुझें नांव कालाग्निशमन आहे. तुझें शरीर अति सुंदर, कोमल, व स्वच्छ पाहून रतिपति मदनाला सुद्धा अत्यंत लज्जेनें मान खालीं घालावी लागते.पौर्णिमेच्या (षोडश कलांनीं युक्त) चंद्रास तर तुझ्या मुखाची अद्वितीय कांति पाहून ताबडतोब क्षयरोगच लागला ! तूं त्रिगुणाच्या पलीकडे असून माझ्या कुशींत (पोटीं) अवतार घेतलास म्हणून माझें जन्माचें सार्थक झालें असें मी समजतें. याप्रमाणें जग दंबा अनसूयामातांनीं कानास गोड लागणारें गाइलेलें गाणें ऐकून व डोळ्यास आनंद होणाऱ्या अशा करुण रसानें ओथंबलेल्या सच्चिदानंद बाल मेघ आपणाला या पुण्य,नवीन मंदिररूपि आकाशांत पाहून हे दत्तगुरो, आपण जें बाळरूप धारण केलेले परमात्मा, त्या आपल्यास निरंतर नमन करुन हा बालमयूर आनंदानें नाचत आहे. ( प्रसाद म्हणून पंचामृत वांटणें. )

उत्तररंग समाप्त.

आख्यान समाप्त.

३५०

## तात्पर्य, शेवटची प्रार्थना, आरती व कर्मब्रह्मार्पण.

ज्याप्रमाणें अनसूयामातांनीं तपःसामर्थ्यानें, पातिव्रत्यप्रभावानें, श्रद्धेनें, धैर्यानें, चिकाटीनें व दमानें प्रत्यक्ष परमात्मासही वठणीस आणून, त्यास आपल्या पोटीं अवतार घ्यावयास लावून जगदुद्धारक अद्वितीय औरस पुत्ररत्नाची प्राप्ति करून घेतली, त्याप्रमाणें आपल्या मायभगिनींनीं पातिव्रत्याचें संरक्षण करून निर्गुण परमात्माचे सगुणावतार चालतेबोलते संत सद्गुरु यांची निस्सीम व एकनिष्ठ सेवा केली, तर आपल्या समाजांत ही निःसंशय विश्वहितकारी अद्वितीय नररत्नें निर्माण होऊन स्वतःस, आपल्या मातापितरांस व आपल्या राष्ट्रास उद्धरून नेतील. म्हणून

६९ अभंग. ( प्रथम नमनांत म्हटलेला )

शरण साई चरणीं गेला। त्यानें भवबंध तोडीला॥ त्यानें॥ ध्रु० ॥
हाणि काळासी तो लाथा। काळ ठेवी तत्पदिं माथा॥ काळ॥ १॥
ऐसा संतांचा अधिकार। साइ संतांचें सरकार॥ साइ॥ २॥
करुं सरकारा मूजरे। आपण चरणाचे हूजरे॥ आपण॥ ३॥
नलगे गुप्त मुक्ती ठेवा। अन्य भक्तांना तो द्यावा॥ अन्य॥ ४॥
बाळ प्रार्थी नित्य मेवा। देई तव पद भक्ति सेवा॥ ५॥

७० अभंग

हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥
गुण गाईन आवडी। हेची माझी सर्व जोडी॥
नलगे मुक्ती धन संपदा। संत संग देई सदा॥
तुका म्हणे गर्भवासी। सुखें घालावें आम्हासी॥

## ७१ आरती साइबाबांची.

आरती साइबाबा । सौख्य दातार जीवा । चरण रजा तळीं निजदासा विसावा ॥ दासा विसावा ॥ आरति ॥ धृ० ॥

जाळुनिया अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग । मुमूक्षुजनां दावी निज डोळा श्रीरंग ॥ डोळा श्रीरंग ॥ आरति ॥ १ ॥

जया मनिं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना । ऐसी तुझी हि माव ॥ तुझी ही माव ॥ आरति ॥ २ ॥

तुमचें नाम ध्यातां । हरे संस्मृती व्यथा । अगाध तव करणी । मार्ग दाविशि अनाथा ॥ आरति ॥ ३ ॥

कलियुगिं अवतार । सगुणब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामि दत्त दिगंबर ॥ दत्तदिगंबर ॥ आरति ४ ॥

आठा दिसा गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया । भवभय निवारी । भय निवारी ॥ आरति ॥ ५ ॥

माझा निज द्रव्य ठेवा । तव चरणरजसेवा । मागणें हेंचि असे । तुम्हा देवाधिदेवा । देवाधिदेवा ॥ आरति ॥ ६ ॥

इछीत दीन चातक । निर्मळ तोय निज सुख । पाजावें माधवा । संभाळ आपुली भाक । आपुली भाक ॥ आरति. ॥ ७ ॥

## ७२ आरति ज्ञानेश्वरमहाराजांची

आरती ज्ञान राजा । महा कैवल्य तेजा । सेविति साधुसंत । मनु वेधला माझा । वेधला माझा ॥ आरति ॥ धृ० ॥

लोपलें ज्ञान जगीं । हित नेणति कोणी । अवतार पांडुरंग । नांव ठविल ज्ञानी । ठविल ज्ञानी ॥ आरति ॥ १ ॥ प्रगट गुह्य बोले ।

विश्व ब्रह्मचि केलें ॥ रामा जनार्दनी । पायिं मस्तक ठेविलें । मस्तक ठेविलें ॥ आरति ॥ २ ॥

## ७३ आरती श्रीदत्तप्रभूंची

काषायांवर खंड सुनिर्मित कौपीनं । दंडकमंडलु मंडनमंडितमूर्धानम् रिपुमंडल मदखंडन पंडित विज्ञानम् । योग कला कलिताखिलत्वं पद महिमानम् । जयदेव जयदेव जय यतियूथपते । मामुद्धर नरसिंहसरस्वति विमलमते ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥ पद्मासन विजयश्री सेवित पादाग्रम् । अर्धोन्मीलितनयन निरीक्षित नासाग्रम् । प्रणवांत प्रतिपाद्य स्वानुभवैकाग्र्यम् । जगदुद्धामनिधामनि जगदीक्षाव्यग्रम् ॥ जयदेव ॥२॥ हरिकीर्तन समयाधुत वैकुंठ निवासम् ॥ पंचीकरण महावागुपदेशविलासम् । निजनैगम महिमामृतवंतं चिद्धासम् । वंदे रुक्म सुताचित पादुक भविनाशम् ॥ जयदेव ॥ ३ ॥

## ७४ अभंग

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनीं पाहिन रूप तुझें ॥
प्रेमें आलींगिन आनंदें पूजिन । भावें ओंवाळिन म्हणे नामा ॥

## ७५ उपजाति

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मनावा प्रकृति स्वभावात् ॥
करोमि यद्यत्सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयामि ॥

## ७६ स्रग्विणी वृत्तम्

अच्युतं केशवं रामनारायणम् । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभम् । जानकी नायकं रामचंद्रं भजे ॥

## ७७ अनुष्टुभ् वृत्तम्

हरे राम हरे राम रामराम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्तमहाराज की जय
" " " ज्ञानेश्वर महाराज " "
" " " साइनाथ महाराज " "
" " " सर्व साधुसंत महाराज "

ही श्रीकालाग्निशमन साइ-दत्तजन्म-कथाख्यान पद्यसुमनावलि सद्भावाच्या ओंजळींत भरून विश्वरूप, विश्ववंद्य, श्रीसच्चिदानंद समर्थ सद्गुरु साइदत्तमाउलीच्या पुण्य-पवित्र पदयुगुलीं अंतःकरणपूर्वक अत्यादरानें, व अनन्यभावानें व नितांतप्रेमभक्तीनें सविनय अनंत प्रणिपातपुरस्सर समर्पण असो.

ठाणें,
मिति श्रावण कृ. १३, गुरुवार,
शके १८५६, भावनाम संवत्सरे

संतपदरज दासानुदास,
**बाबांचें बाळ.**

342

चतुर्थावतार दत्तगुरु श्रीकालाग्निशमन

श्रीसाईदत्तजन्म कीर्तनाख्यान समाप्त